म. ग्र. सं ठाणे
विषय भू प्रवास
सं. क्र. E-4
REFBK-0023034


CUSTOMS
नवलाई

# बाळ सामन्त ह्यांचे प्रकाशित साहित्य

**विनोदी लेखसंग्रह**

मस्करी

नसता उपद्व्याप

गोंधळ

खिरापत

नवरा-बायको

हात दाखवून अवलक्षण

ताराबळ

करामत

बाळ लीला

हास्यकल्लोळ

खुषमस्करी

**विनोदी कथा–कादंबरी**

उसने अवसान

हात पडावा पोरीचा

चकमक

प्रेम करावे जपून

धावपळ

हिंदु कॉलनी तिसरी गल्ली

**संपादित**

हितगुज

निवडक अत्रे

मराठी नाट्यसंगीत

मोठी माणसे

मेमसाहेब

९८०८
२३०३८


# न व ला ई

बाळ सामन्त

REFBK-0023034

परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४

प्रकाशक
सौ शुभदा विष्णु परचुरे
परचुरे प्रकाशन मन्दिर
मेहता भवन, २ रा मजला
२११ राजा राममोहन रॉय मार्ग
गिरगाव, मुबंई ४

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ, पुणे ३०

प्रकाशन क्रमांक ५०४

आवृत्ती पहिली
विजयादशमी
१९ ऑक्टोबर १९८०

सर्वाधिकार
सौ कला सामन्त
१९८०

मूल्य वीस रुपये

मुखपृष्ठ सजावट
नि आतील रेखाचित्रे
श्याम जोशी

**कै. ती. तात्या**

प्रवास, संगीत आणि ग्रंथ
याची आवड— हा तुमचा
वारसा मी जपून ठेवलाय

**बाळ**

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १ | परदेशी पाहावे जाऊन | १ |
| २ | अपूर्व तयारी | ८ |
| ३ | नव्या दिल्लीत | १४ |
| ४ | तमसेच्या तीरावर | १९ |
| ५ | कोहिनूर हिरा आमचा आहे | २८ |
| ६ | मोहमयी जत्रा | ३० |
| ७ | युरोपच्या राजधानीत | ३६ |
| ८ | मुला-फुलांचा देश | ४३ |
| ९ | जर्मनीत | ५० |
| १० | ब्लॅक फॉरेस्ट | ५६ |
| ११ | आल्प्स पर्वतावर | ६२ |
| १२ | ऑस्ट्रियात | ६८ |
| १३ | व्हेनिसमध्ये | ७४ |
| १४ | व्हेनिस दर्शन | ८० |
| १५ | मायकेल अँजेलोच्या जन्मभूमीत | ८५ |
| १६ | जन्मा यावे रोम पाहावे | ९० |
| १७ | रोम ते नेपल्स | ९८ |
| १८ | काप्री | १०४ |
| १९ | पिझा ते नीसा | ११० |
| २० | पॅरिसच्या मार्गावर | ११८ |
| २१ | पॅरिसची नवलाई | १२३ |
| २२ | निरोप | १३३ |

. १ .

# परदेशी पाहावे जाऊन

मी सहकुटुंब युरोप-अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार ही बातमी अगदी विमानवेगाने पसरली. आता ही माझी तिसरी खेप. पण या वेळी बायको बरोबर. त्यामुळे अनेकाना नवल, कित्येकाना कौतुक आणि काहींना आश्चर्य वाटले.

'काय, तुम्ही युरोपात जाणार म्हणे!' एका मित्राचा फोन.

माझ्या फोनवर सौची सतत पाळत असते. पण प्रवासाला जायचे ठरल्यावर हा पहारा अधिकच कडक झाला. त्यामुळे असला फोन येताच मी फार बडबड करू नये असा तिने खुणेने इशारा केला.

मी त्या प्रेमळ मित्राला म्हटले, 'जायचा विचार आहे. पण अजून नक्की नाही.' माझे हे डिप्लोमॅटिक उत्तर ऐकून तो मित्र नाराज झाला असला तरी सौभाग्यवती खूष झाली. अजून नक्की नाही हे वाक्य तिने अगदी डॉ. लागूंच्या थाटात आणि स्वरात माझ्याकडून पाठ करून घेतल होत. त्यामुळे 'अजून नक्की नाही' हे वाक्य मी ठाशीव स्वरात उच्चारताच तिचा चेहेरा विजया मेहतासारखा खुलला.

'कोण होत ते?'

मी म्हणालो, 'नारायणराव.'

ती म्हणाली, 'बर केलत. जळू आहे मेला.'

'तो कसा काय?'

'परवा त्यांची शेजारीण भेटली होती. ती म्हणत होती, 'आमचे नारायणराव म्हणतात, सामत युरोपला चाललेत– आताशा गवडीसुद्धा रोज फॉरिनला जातात. तर हे गेले तर त्याच कौतुक ते काय?'

लागलीच दुसरा फोन. मी जास्त बडबडेन म्हणून बायकोने फोन माझ्या हातातून हिसकावून घेतला.

‘ हॅलो, कोण बोलतंय ? आहेत आहेत— ’ तिने फोन माझ्याकडे दिला. ‘ तुमचे विश्वासराव बोलताहेत.’



मी फोन हाती घेतला. ‘हॅलो, कोण — हा बोला — जायचा विचार आहे, पण नक्की नाही काय म्हणता — पार्सल घेऊन जाऊ ? तुमच्या

... साठी कुळथाची पिठी — आणि लेकीसाठी पोह्याचे पापड. .. '
(' अहो, त्याना सागा वजनाची भानगड असते — ' सौ. चा कानात इशारा. )
' अहो— पण वजनाची भानगड असते.'
तो सागतो—' वजनाची भानगड नसते. तुम्ही चागल्या चार बॅगा घेऊन जाऊ शकता— आणि तुमचा काय, वशिला आहे ! '
त्याचा फोन चालू असता बायकोचा चेहेरा क्रुद्ध झालेला असतो. जणू काय विश्वासरावाच्या जावयाला कुळथाची पिठी आवडते हा माझा अपराध !
' मुलीसुद्धा पिठी नि पापड घेऊन जायचे नाही.' सौ. कडाडली— ' मेल्याने मुलीच्या लग्नाची पोस्टाने पत्रिका पाठवली— अक्षत नाही, पण निदान फोन तरी—'
साराश, मी युरोप—अमेरिकेला जाणार हे कळताच माझ्या अनेक नातेवाइकाना व मित्राना एकाएकी प्रेमाचे भरते आले. आमच्या कॉलनीतील शेजारी मत्सराने, असूयेने, आदराने तर काही कौतुकाने मी जाता—येता दिसलो तर माना हालवू लागले शेजारच्या सरदारजीच्या मित्राच्या पुतणीचा चुलत दीर कोलॅरेडोला असतो त्याच्यासाठी गाजर हलवा घेऊन जाण्याची त्याने विनती केली. मी म्हटले, ' गाजर हलवा कसा काय नेणार ? कस्टमची भानगड.'
सौ. म्हणाली, ' जाऊ द्या हो— एवढासा तो मेला गाजर हलवा— आणि गाजर हलवा म्हणजे काय अफू नव्हे. म्हणे अमेरिकन कस्टम. शेजारधर्म आहे. अडीअडचणीला उपयोगी पडतो. परवा पार्टीला आइस कमी पडला तर तिने दोन्ही ट्रे विनतक्रार आणून दिले.' शेवटी सौ. च्या शेजारधर्माचा विजय होऊन आम्ही गाजर हलवा घेऊन जाण्याचे मान्य केले.
मी गाजर हलवा घेऊन जाणार याची बातमी आमच्या कॉलनीत वाऱ्यासारखी पसरली. याचे कारण बायकोचा धूर्तपणा. तिने पचवीस लोकाना तरी सागितल असाव. ' काय तरी लोकाचा छळवाद ! आम्ही काय मिरजेला चाललोय आमच्या लेकीकडे ? त्या नाडकर्णी बाईचा जावई आहे पॅरिसला— त्याच्यासाठी म्हणे तळलेले वागडे, तर कोपीकराचा पुतण्या ब्रुसेल्सला — त्याच्यासाठी घरगुती लिंबाचं लोणचं, तळवलकराच्या लेकीसाठी म्हणे चकल्या— मी म्हटल ते जमणार नाही. सरदारजींचा गाजर हलवा फक्त

घेऊन जाणार.'

या गाजर हल्ल्यामुळे प्रवासाला निघण्यापूर्वीच आमच्या घराला गृहवस्तू भांडाराची अवकळा प्राप्त झाली. आमच्या एका मित्राच्या बायकोने शिकागोला राहणाऱ्या आपल्या लेकीसाठी 'काही नाही – आपलं एवढंस–' म्हणून आपलं एक गाठोडं पाठवलं. पण अमेरिकेत चार दिवस तिच्याकडे राहता येईल या आशेने तिने ते स्वीकारले. आमच्या या विलायत यात्रेच्या वार्तेने आम्ही सर्व धर्मांतील जनतेत प्रिय झालो. आमच्या मुलाच्या ख्रिश्चन मित्राच्या वडिलांनी, वॉशिंग्टन येथे राहणाऱ्या आपल्या मुलासाठी बाटाचे बूट दिले. तर एका बोहारी मित्राने ह्यूस्टनला राहणाऱ्या आपल्या मुलीसाठी एक पॅकबंद बोचकं दिलं. त्यात एक किसणी, दोन ॲल्युमिनि-यमच्या कढया, परकर, शेवयाचं बंडल, एवढा माल्मसाला निघाला. आमच्या एका मित्राला मी आपण होऊन फोन करण्याचा मूर्खपणा केला. म्हटलं तुझा मुलगा आहे अमेरिकेत, काय द्यायचं असेल तर दे. माझे औदार्य पाहून त्याला प्रेमाचे भरते आले. तसं काही विशेष द्यायचं नाही– फक्त औषध– म्हणून तो एक बोचकं घेऊन आला. ते फोडलं तर त्यात औषधाची एक छोटी बाटली, दोन लोणची (ठाकूर यांची) आणि एक आंबरसाचा डबा निघाला

आणि युरोपात आणि अमेरिकेत कुठे कुठे जाणार याची लोक एवढ्या प्रेमाने का चौकशी करतात याचा मला उलगडा झाला. अमेरिका हा भारताच्या तिप्पट मोठा देश आहे हे आमच्या सौ. च्या खिजगणतीत नव्हतं. तिच्या समजुतीप्रमाणे अमेरिका म्हणजे जेमतेम महाराष्ट्र– आणि न्यूयॉर्क-पासून लॉस एंजेलिस म्हणजे मुंबई ते कोल्हापूर हे अंतर. अमेरिकेत आम्ही वेस्ट कोस्टला जाणार असे गृहीत धरून आमच्या एका जिवलग मित्राने आपल्या लॉस एंजेलिसच्या मित्रासाठी चक्क आंबेपोळीचं पार्सल पाठवून दिलं. वर मधाचं बोट काय तर 'आमच्या शामरावांनी वॉशिंग्टनला बंगला बांधलाय– अवश्य जा.' अमेरिकेत आणि स्वतःचा बंगला हे ऐकून सौ. ला आश्चर्य वाटले. (अमेरिकेत कामगारलोकही बंगले विकत घेतात हे तिला तोवर ठाऊक नव्हतं. त्यामुळे त्यांच्याकडे आंबेपोळीच काय पण पुरण पोळी– फणस पोळी– काय वाटेल ते घेऊन जायची तिची तयारी होती.

आम्ही अमेरिकेत जाणार यामुळे काही मंडळी जशी आनंदित झाली तशी

काही मंडळी भयभीत झाली. आमच्या काही मराठी माणसांचे नातलग आणि मुलेबाळे अमेरिकेत स्थायिक झाली होती. त्यातल्या काही लोकांनी आम्हाला भेटायचं किंवा फोन करायचं टाळलं. का तर आम्ही त्यांच्याकडे ठिय्या देऊ. त्यातले काही लोक वाटेत भेटले तर 'या, अवश्य जा, सगळं काही पाहून घ्या' असा सल्ला सौ. ला देत. अमेरिकेत स्थायिक झालेल्या एका मुलीच्या प्रेमळ मातोश्रींने तर अमेरिकेत पाहण्यासारखं काही नाही, जायचे असेल तर युरोपात जा, असं सांगितलं;— आम्ही त्यांच्या मुलीकडे जाऊ या भयाने एका पित्याने मला इंग्लंडमधील वांशिक तेढ आणि भारतीयांचा छळवाद यावर एक तासभर लेक्चर देऊन इंग्लंडमध्ये जाण्यापासून मला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला.

न्यूयॉर्कमध्ये डॉक्टरकी करणाऱ्या एका मुलाच्या बापाने मला न्यूयॉर्कमध्ये दिवसा ढवळ्या खून कसे होतात याचे रोमांचकारी वर्णन केले. पण न्यूयॉर्कला मी माझ्या मुलाकडे जाणार असे कळताच त्याने आनंदाने मला न्यूयॉर्कला गेलात तर ब्रॉडवेला 'ओ— कलकता' किंवा निल सीमॉन्सचे फार्स पाहा— चायना टाऊन बघून घ्या असा सल्ला दिला.

युरोपला मी जाणार आणि प्रवासवर्णन लिहिणार म्हणून आमचे काही लेखक आणि संपादक मित्र भयभीत झाले. एक संपादक म्हणाले, 'अलीकडे जो तो उठतो आणि अमेरिकेला जातो. तीच तीच वर्णनं— काही थ्रिल नाही. एक म्हणाला 'पुलंची व्यक्तिचित्रे म्हणजे जाम वैताग असला तरी अपूर्वाई बेस्ट. तुम्ही त्याच्यावर ताण करा.' एक समीक्षक गंभीरपणे म्हणाला,' 'तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे— ॲट टाईम्स पु. ल. चं प्रवासवर्णनही रेडीमेड गार्मेंटसारखं वाटतं.' एकाने मला जॉर्ज मिकेशची प्रवासवर्णने वाचा आणि मगच काही लिहायचं तर लिहा असा सल्ला दिला.

मी परदेशी जाणार यामुळे आनंदित झालेल्या काही लोकांनी मला अन्य प्रकारे छळले. यातले काही याचक 'अहो, तुम्ही अमेरिकेला जाताय, तर ब्रॉनचा मिक्सर आणा, माझी मुलगी सारखी मागे लागलीय. केनवुडचा बरा असतो. पण हा कॉम्पॅक्ट— आणायला बरा. मी म्हटलं 'आपले इंडियन मिक्सर असताना—' त्यावर तो म्हणतो, 'आपल्या इंडियन मिक्सरपेक्षा आपला पाटा वरवंटा बरा.' ( हा पाटा वरवंटा त्याच्या कपाळावर हाणावा. )

कॅमेराबाबतच्या डिमांड फार होत्या. त्यामुळे कॅमेराविषयक माझ्या

ज्ञानात फार भर पडली. जर्मन आणि जपानी कॅमेरे— त्याचे नाना प्रकार, किमती, पॉकेट कॅमेरा— लपवून कसा आणावा याचेही शिक्षण मला देण्यात आले. कॅल्क्युलेटर्स, टेप-रेकॉर्डस्, कॅसेट प्लेअर, मूव्ही प्रोजेक्टर याच्या मागण्या होत्याच. प्रत्येकजण ड्यूटी भरायला तयार होताच. पातळाची मागणी बायकोच्या बहिणी, भावजया आणि माच्या याची. अमेरिकन जॉर्जेट— आणि फ्रेंच चिफॉन, पॅरिसला जाताय तर फ्रेंच चिफॉन घेऊन या— न्यूयॉर्कला कॅनॉल स्ट्रीटला या वस्तू स्वस्त मिळतात असा सल्ला एकाने दिला. माझ्या मुलीने हेअर ड्रायर, इस्त्री, कॅमेरा, बॅटरी, ऑपरेटेड टॉईज, रेबॉन गॉगल्स, पातळे, नाईट गाऊन, फ्रेंच परफ्यूम्स— अॅव्हॉनचे कॉस्मेटिक्स, चार्ली, थ्री चॅनेल यांची यादी सादर केली. मेव्हण्याने विल्किनसन ब्लेडस्, बायकोसाठी फोल्डिंग छत्री— एकूण नातेवाइकाच्या पाच डझन मुलांचे कपडे, जीन्स—रेकॉर्डस्.

मद्यपी मित्रानी पॅरिसहून शापेन, लंडनहून शिवास रीगलपेक्षा ग्लेन फिडिक ही व्हिस्की, जमल्यास 'कटी सार्क किंवा जमेइकन रम' या याद्या दिल्या. शिवाय सुऱ्या, कात्र्या, नेल कटर्स, पीलर्स, एग बीटर्स, ब्रेसिअर्स, अंडर वेअर्स याची डिमांड होतीच.

अशा तऱ्हेने भेटवस्तूंच्या याद्या लिहून माझी डायरी भरून गेली. पण



त्याआधी अमेरिकेला न्यायच्या भेटवस्तूंनी माझे घर भरून गेले. कुळथाची पिठी, लोणच्याचे सर्व प्रकार, पाडगावकरांच्या कवितेसह पापड, अंगडी

टोपडी, गाजर हलवा, परकर, मॅक्सी, गोधड्या, कढया, मोरबे, फेणीच्या दोन बाटल्या, महामंजिष्ठादि काढा, माकडछाप दूथ पावडर, गधाच्या बाटल्या, तंबाकूची मशेरी इत्यादी वस्तू त्यात होत्या. इंपोर्ट करण्याच्या वस्तूची एक यादीच तयार झाली. अमेरिकेत राहणारे भारतीय– त्यांचे पत्ते आणि त्यांचे लांबलचक टेलिफोन नंबर यानी एक डायरी भरली.

. २ .

# अपूर्व तयारी

मी युरोपला जाणार हे कळताच माझ्याकडे अनेक अनुभवी प्रवाश्याची ये-जा वाढली. यातल्या अनेकानी त्रेतायुगातील लंडनची वारी केली होती. तर काहींनी नुकतीच न्यूयॉर्कची यात्रा केली होती. सौ. च्या अनेक मैत्रिणी सुनेच्या किंवा लेकीच्या बाळतपणाच्या निमित्ताने परदेशी जाऊन आल्या होत्या तर अनेक जणी एअर इंडियातील जवळच्या नातेवाइकामुळे मिळालेल्या फुकटच्या पासामुळे अमेरिकेत वायुप्रदूषण वाढवून आल्या होत्या.

"बाबासाहेब, तुम्ही इटलीला जाणार म्हणता तर काप्री मुळीच चुकवू नका." एकाचा प्रेमळ सल्ला.

"लॉस एंजेलिसला जाणार तर डिस्ने लॅंडला जाच जा." यावर मी म्हणतो, "अवश्य जाईन." त्यावर तो म्हणतो, "पण लक्षात ठेवा, डिस्ने लॅंड एका दिवसात पाहून येणे शक्य नाही. वन मस्ट स्टे देअर फॉर ॲटलिस्ट थ्री डेज !" हे सागत असताना मी जणू काही लक्षाधीश आहे असा भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता.

नायगारा फॉल्स पाहिल्याशिवाय तुमचा जन्म व्यर्थ आहे असे एकाने समजावून दिले. तर लंडनला टॉवर ऑफ लंडनमधील हिऱ्याचा मुकुट पाहिल्याशिवाय तुम्ही येऊ नका असा सल्ला एका मैत्रिणीने माझ्या पत्नीला दिला.

मी डिस्ने लॅंडला जाणार हे कळताच एक अनुभवी प्रवासी मला म्हणाला, "मिआमीचे म्हणजे फ्लॉरिडातले डिस्ने वर्ल्ड हे डिस्ने लॅंडपेक्षा सरस आहे. यू मस्ट सी इट !"

"सॅनफ्रान्सिस्कोसारखे शहर जगात नाही. पी एल. चा त्यावरचा लेख वाचा" असे एकाने मला फोनवरून कळवले. वाशिंगटनला काय काय पाहण्यासारखे आहे याचे चऱ्हाट लावून एकाने मला अर्धा तास छळले.

आमच्या सौ. च्या मैत्रिणीने न्यू जर्सीला असणाऱ्या तिच्या मैत्रिणीच्या घराचे वर्णन करण्यासाठी आमच्याकडचे एक जेवण मटकावले. मला फिश करी पाहिजे असा निरोप दिल्यामुळे मला स्वत:ला मार्केटात जाऊन मासे आणावे लागले. ती संध्याकाळी सात वाजता आली आणि तिने महिला मंडळात केलेल्या भाषणाचा मसुदा आम्हाला वाचून दाखवला. या वर्णनात तिच्या मैत्रिणीच्या घराचे वर्णन— डिश वॉशर, कलर टी. व्ही.' तिच्या बेबी-सीटरचा पगार याचे डीटेल वर्णन होते. नंतर न्यूयॉर्कमध्ये एकट्या-दुकट्याला गाठून 'मग' कसे करतात ( मग करणे म्हणजे ठोसे मारून




लुबाडणे ) आणि तिच्या माहितीच्या किती मंडळींना हा 'मग 'प्रसाद मिळाला याचे चित्तथरारक वर्णन तिने केले.

' वहिनी, युरोप इज अ कॉस्टली अफेअर. वहिनी, युरोपात पाणी पीत नाहीत, बीअर पितात. तुम्ही पण बीअर प्यायला सुरुवात करा ' असा उपदेश एका रसिकाने केला. युरोपात माझ्या बायकोच्या संकष्टी चतुर्थी, शनिवार आदी उपासाचे काय आणि कसे होणार याची एका गणेश-

भक्ताला काळजी लागली.

आम्ही प्रवासाला निघताना बरोबर काय काय उपयोगी वस्तू घ्याव्यात याची एक यादी एका मित्राने तयार करून दिली. अमेरिकेतले जेवण तुम्हाला मानवणार नाही, आणि युरोपात बटाट्याखेरीज काहीच खात नाहीत; करिता बरोबर लोणच्याच्या बाटल्या बाळगा असा सल्ला एकाने दिला. परदेशात आजारी पडणे हा मोठा गुन्हा आहे, अॅस्प्रो मागायला गेलात की तुम्हाला इस्पितळात कोंबतात, असेही एका अनुभवी प्रवाश्याने सांगितले. एक वेळ आजारी पडलात तरी आम्ही समजू शकतो. पण कृपा करून देहत्याग करू नका, कारण परदेशात अंत्यसंस्कार ही एक कॉस्टली गोष्ट आहे असे एका मित्राने पुरेपूर समजावून दिले. यामुळे आमच्या सौ.ने वर्षभर पुरतील एवढ्या अॅस्प्रोच्या बाटल्या, मेक्साफॉर्म, नोव्हे-लाजिन, अॅस्पीरिन, व्हिक्स, ग्लायकोडिन आदी औषधांचा साठा तयार केला. तिकडे नवऱ्याला ग्राईप वॉटर देतात असे सांगितले असते तर तिने ग्राईप वॉटरच्या बाटल्याही खरेदी केल्या असत्या.

आता अमेरिकेला जातोय तर आमच्या रिकाम्या ब्लॉकचे काय होणार याची अनेकांना काळजी पडली. आम्ही भारत सोडून कायमचे जात नाही असे सांगूनही काहींचा विश्वास बसेना. तुमचा मुलगा अमेरिकेत आहे, काही नेम नाही. तुम्हाला नाही सोडायचा. या शंन्यामुळे शेवटी शेवटी तुमचा ब्लॉक विकायचाय काय असे विचारणारे गरजू निर्वासित आणि इस्टेट-एजंट यांचीही वर्दळ वाढली. माझ्या एका सॉलिसिटर मित्राने जाताना विमा उतरा आणि मृत्युपत्र केल्यास बरे, असे गंभीरपणे सुचविले. या हृदयस्पर्शी सल्ल्यामुळे पूर्वीच्या काळी काशीयात्रेला जाताना यात्रेकरू मंडळी शेवटची निरवानिरव करून जात असत त्याची मला आठवण झाली. मात्र फरक एवढाच की, याबाबत माझ्यापेक्षा माझ्या सन्मित्रांचाच पुढाकार जास्त होता.

## अपूर्व तयारी

सारांश, पंधरा दिवसांत मी युरोप आणि अमेरिकेबाबतच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक ज्ञानाने पुरेपूर संपन्न झालो. मी अमेरिकेला जातोय तर जिमी कार्टरला भेटून या, असा सल्ला एका मित्राने दिला. तो म्हणाला भारत अमेरिकेचे संबंध आता पूर्वीसारखे राहिलेले नाहीत.

त्यामुळे तुमच्यासारख्या लोकानी या कार्यात हातभार लावला पाहिजे. मी त्याचा गंभीरपणे विचार करीन असे त्याला आश्वासन दिले.


आता प्रवासाची तयारी म्हणजे प्रथम कोणते कपडे घ्यावेत, यावर आम्ही दोघानी दोन तास चर्चा केली. अर्थात याबाबतही स्वयस्फूर्त सल्लागाराचा तुटवडा नव्हता. एका चाणाक्ष प्रवासिनीचे मत— ' कमलाताई, तुम्ही जाताना नेसल्या पातळानिशी जा आणि येताना तुमची बॅग इंपोर्टेड पातळानी भरून आणा. मात्र कस्टमला वनवण्यासाठी पदराना टीप मारली म्हणजे झाले.' आता या स्त्रीचा रोख मजकडे वळून मी केवळ लुंगी नेसून जावे असा सल्ला ती मला देत्येय की काय असे मला भय पडले. पण नशीब, तिने तेवढे धैर्य दाखविले नाही. परदेशात धुलाईचा खर्च फार असतो, पण तुम्ही युरोपात सगळीकडे हिंडणार आहात तर तुमच्या कपड्याचे सहा-सहा सेटस् तरी घ्या असा एक सल्ला. त्यात चड्डया, बॉड्या, परकर, गंजी ही मंडळी आली. सौ. ने फॉरिन मंडळींवर इम्प्रेशन पाडण्यासाठी सहा सिल्क साड्या बरोबर घेतल्या. माझ्यासाठी पॅन्ट, बुशशर्ट, तसेच गधाच्या बाटल्या, औषधे, लोणची, पापड, पोहे, साबुदाणा, लिमलेट गोळ्या, कुटलेली सुपारी आदी वस्तूंची खरेदी झाली.

आता तुम्ही डायरेक्ट अमेरिकेला जाणार असाल तर वजनाचा प्रश्न नाही. तुमच्या बॅगा फक्त अमुक अमुक इंच लांबी—रुंदीच्या हव्यात; त्यामुळे अगदी इंच इंच लढवू या ईर्षेने आम्ही फुटपट्टी घेऊन बॅगाची दुकाने धुंडाळण्यास प्रारंभ केला. काही दर्दी म्हणाले, इथून जाताना फाटक्या बॅगा घेऊन जा, आणि येताना सॅमसोनाईट बॅगा घेऊन या असे सुचविले. या सर्वांना माझ्याकडे पैशाचं झाड लागलय असंच वाटत होत. युरोप-अमेरिकेत पोर्टर लोकाचा तुटवडा असल्यामुळे आयत्या वेळी अशी एक सूचना आली की चाक असलेल्या बॅगा घेऊन जा. मोटारीप्रमाणे बॅगाना चाक असतात हे ऐकून या बॅगा विकत घेण्याचा निर्णय घेतला. शिवाय जुनकट बॅगा घेतल्या आणि त्या बॅगाच्या आदळ-आपटीत लोणची-मुरबे या द्रव पदार्थांच्या बाटल्याचा भंग झाला तर अनेक घोटाळे निर्माण होतील असेही तिने मला समजावून दिले. त्यामुळे अखेर आम्ही सतराशे पन्नास दुकानात हिंडून चाकवाल्या बॅगा खरेदी केल्या. या बॅगाखेरीज माणशी एकेक हँडबॅग नेण्याची परवानगी होती. युरोपात बटाट्याशिवाय काहीच मिळत नसल्यामुळे सौ. ने आपल्या हँडबॅगेत सर्व मराठी कडधान्ये, आंबेमोहर तांदूळ, चण्याचे पीठ,

चकलीची भाजणी, साबुदाणा, पोहे हा सर्व मध्यमवर्गीय खाद्यपदार्थांचा कच्चा माल बरोबर घेतला.

युरोप-अमेरिकेची ही माझी तिसरी खेप असली तरी सौ. या सदर्भात पहिलटकरीण असल्यामुळे अनेक मित्रानी आणि नातेवाइकानी आमच्या-साठी केळवणाचे कार्यक्रम आयोजित केले. या केळवणात आम्हाला आहेराच्या वस्तूही मिळाल्या. एका बालमित्राने मला लखनऊ कुडता आणि सौ.ला पोतडीवजा पर्स दिली. रागोळ्या आणि उदबत्त्या याचा थाट काय तो नव्हता. तुमचा प्रवास सुखाचा होवो असे फोनावर फोन येऊ लागले. तुमचा हनीमूनचा कार्यक्रम मजेने पार पडा असाही विनोद कित्येकानी केला. जाण्याच्या दिवशी तर नातेवाइकाची नुसती झुम्बड उडाली. आमच्या घराला जनतापार्टीच्या कचेरीचे रगरूप प्राप्त झाले. आमच्या जाण्याच्या तयारीपेक्षा त्याच जेवणखाण, चहा यातच आमची त्रेधातिरपीट उडाली. अमेरिकेचा शोध लावणाऱ्या कोलबसाकडे ज्या कौतुकाने पाहिल जाईल त्या स्टाईलन माझ कौतुक चालल होत. आपली बहीण ऑलिंपिक सामन्यात भाग घेण्यासाठीच जणू चाललीय अशा भावनेन माझ्या मेव्हण्या माझ्या पत्नीकडे मोठ्या आदराने पाहात होत्या. जायच्या दिवशी आमचा पहिला बेत असा होता की, मुम्बई ते लडन असे डायरेक्ट पण तेहरान-द्वारे जायचे. आमची विमान कम्पनी पॅनॲम. त्याची पूर्वीची फ्लाइट दिल्ली, तेहरान, लडन अशी होती. पण या वेळी त्यानी मुम्बईकर प्रवाश्यांसाठी असे डायरेक्ट उड्डाण योजिले होते. पण आयत्या वेळी तात्रिक अडचण निघून आम्ही इडियन एअर लाइन्सच्या विमानाने दिल्लीला जायचे आणि तिथून रात्री १-०० च्या विमानाने लंडनला जायचे असे ठरले. त्यामुळे रात्री जेवून खाऊन मुबईहूनच लडनला जायचा बेत फिसकटला आणि दिल्लीमार्गे जाणे भाग आले. इडियन एअर लाइन्सचे विमान सहाला निघणार म्हणून एअरपोर्टवर पाचला पोचणे भाग पडले. त्यामुळे आमची निष्कारण धावाधाव. त्यात बॅगा भरणे हे काम अवघड. त्यात आमच्या सामानापेक्षा इतराच्या भेटवस्तूच फार. इतराच्या बोचकी जशीच्या तशी भरणे अवघड म्हणून ती खोलून भरावी लागली. त्यानतर पासपोर्ट, तिकिटे घेणे आणि जिवापलीकडे साभाळणे आलेच. सौ. ची पर्स ही अशीच गारुड्याच्या पोतडीसारखी भरली होती. पासपोर्ट, तिकिटे याच्या वजनाने माझ्या कोटाचे बॅलन्स ढळले होते. डॉलर्स साभाळा, अमेरिकेत लाईफ डेंजरमध्ये

असते यामुळे डॉलर्स सुरक्षित आहेत की नाहीत हे पाच पाच मिनिटांनी पाहणे आले. 'मी पण आम्रिकेला जाणार' म्हणून आमच्या चार वर्षांच्या नातवाने–शतनूने–आपली बॅग अगोदरच मोटरीच्या खिडकीत ठेवून दिली होती. शेवटी सर्व बांधकाम. आम्ही गेल्यानंतर घरावर लक्ष ठेवा हे शेजारच्या सरदारणीला सांगणे. बॉन व्हायेज, हॅव ए गुड टाइम, मजा करा, या घोषणा ऐकत आम्ही विमानतळावर आलो. आमचा मित्र दादा अभ्यंकर माझ्या वजनाला साजेसा एक मोठा हार घेऊन आला होता. या साऱ्यांचे निरोप घेऊन आम्ही लंडनच्या मार्गावर म्हणून दिल्लीला जाणाऱ्या इंडियन एअर लाइन्सच्या विमानात चढलो. त्या दिवशी जुलैची चार तारीख होती.



. ३ .

# नव्या दिल्लीत


नेहमीचा ' सुरक्षा जाच ' आटपून आम्ही दिल्लीला जाणाऱ्या विमानात प्रवेश केला. मुंबई ते दिल्ली या प्रवासात मी एखादी रहस्यमय कादंबरी हातावेगळी करतो. पण या वेळी तेवढी मानसिक स्वस्थता नव्हती. लंडनला पोचेपर्यंत पासपोर्ट, बायको आणि बॅगेज या तीन वस्तू सांभाळून न्यायची जबाबदारी. शिवाय दिल्लीला उतरल्यावर तीनएक तास वेळ कसा घालवायचा याचे मनाशी प्लॅनिंग चालू होते. विमानात विश्वासराव चौगुले भेटले. त्यांनी विचारले ' कुठे चाललात? ' मी म्हटल, ' युरोपला. दोन महिन्यांसाठी— ' त्यावर ते म्हणाले, ' मजा आहे बुवा तुमची. मला एक दिवस कुठं जाईन तर फुरसत नाही ' मी म्हटल, ' ही तुम्हा मोठ्या माणसांची व्यथा— ' त्यावर ते खळाळून मनःपूर्वक हसले.

साडेआठला आम्ही पालम विमानतळावर उतरलो. विमानतळावर आमच्या अभ्यंकरांचा दिल्लीचा प्रतिनिधी सुरजितसिंग हजर होता. त्याने आमच्या हातातल्या बॅगा आम्ही नको नको म्हणत असताना हातात घेतल्या. आमच्या बॅगा येईपर्यंत पॅन ॲमचं विमान किती वाजता सुटणार आहे याची त्याला चौकशी करायला सांगितली. त्याने तत्परतेने आम्हाला माहिती दिली की, तुमची फ्लाइट चार तास ' डिले ' आहे. आता प्रश्न असा की, चार तास कुठे काढायचे? सुरजितसिंगच्या गाडीतून आम्ही अर्धा डझन हॉटेलांना प्रदक्षिणा घातल्या; पण सगळीकडे ' जागा नाही 'चा पाढा. यात तास गेला. मग कॅनॉट प्लेसमधल्या एका रेस्टॉरॉमध्ये जेवलो आणि अकराच्या सुमारास एअरपोर्टला आलो. बॅगा ढकलत पॅन ॲमच्या काउंटरवर आलो तर तिथं शुकशुकाट. म्हणजे प्रवासी हजर पण कर्मचारी बेपत्ता. मात्र पाटी लागलेली— उड्डाण बेमुदत पुढे ढकलले आहे. शेवटी परत बॅगा ढकलत ढकलत आम्ही लाउंजमध्ये दोन खुर्च्या पटकावल्या.

दिल्लीचा आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हणजे पुण्याच्या एस. टी. तळापेक्षा भयानक. जमिनीवरच लंडनला जाऊ इच्छिणाऱ्या कळकट पण अवाढव्य सरदारणी अस्ताव्यस्त झोपल्या होत्या. रातकिडे इतके की त्यांना आवरता आवरता नाकी नऊ आले. पधरा पधरा मिनिटांनी मी पॅन ॲमच्या काउंटर-वर जाऊन तपास करीत असे. शेवटी साडेअकराच्या सुमारास काउंटरवर पॅन ॲमचे कर्मचारी हजर झाले. त्यांनी आम्हाला सांगितले की, विमान आज रात्री सुटणार नाही. ते कदाचित उद्या सकाळी नऊ वाजता सुटेल. आता काय करायचे असा प्रश्न निर्माण झाला. मी पॅन ॲमच्या त्या अधिकाऱ्याला म्हटले, 'आता आम्ही काय करावं असं तुझं म्हणणं आहे ?' तो म्हणाला, 'मी काय सांगू ?' 'थांबा—' मी म्हटलं. 'आम्ही या विमानतळावर रात्र काढावी असं तुझं म्हणणं आहे काय ?' माझ्या स्वरातील थोडी जरब पाहून तो नरमला. तो म्हणाला, 'मी तुमची अशोका हॉटेलमध्ये सोय' करतो. माझ्यामागे असलेल्या क्यूतील इतर प्रवासी माझ्यावर खूष झाले. आम्ही व्हाउचर फॉर्म्स घेऊन पॅन ॲमच्या खर्चाने रात्री १२ वाजता अशोका हॉटेलमध्ये येऊन पोचलो.

अशोका हॉटेलमध्ये आलो खरे, पण दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठायची चिंता. शिवाय लंडनला आम्ही उशीराच्या फ्लाइटने येणार हे कळवण्याचे काम. बेल कॅप्टनला सकाळी सहा वाजता उठवण्याचा आदेश दिला. पण त्याची बेल वाजायच्या आत साडेपाचलाच उठलो. प्रथम पॅन ॲमला फोन केला. त्यांनी शांतपणे सांगितलं, ' विमान संध्याकाळी सुटेल— व केव्हा ते तुम्हाला चार वाजता कळवू.' म्हणजे आमचा दिल्लीतला मुक्काम वाढला. लागलीच घरी फोन केला. आम्ही अजून भारतातच याचं सर्वांना आश्चर्य वाटलं. मी अजून भारतातच आहे आणि अशोकातच आहे ही बातमी तात्काळ मित्रमंडळीत पसरली. त्यामुळे आमच्या सुशीलकुमार शिंदापासून सर्वांचे फोन. नंतर न्याहरी करून— अशोकात इडलीला पाच रुपये आणि मसाला डोशाला तेवढेच पैसे पडतात. पण खर्च पॅन ॲमचा असल्यामुळे आम्ही पदार्थांच्या किंमतीकडे प्रथमच डोळे झाकून त्यांचा स्वाद घेतला. त्यानंतर दिल्लीत एक फेरफटका मारला आणि दीडच्या सुमारास हॉटेलात परतलो आणि ' मयूर ' या अशोकातील उपाहारगृहात भारतीय पद्धतीचे जेवण घेतलं. दुपारी परत फोनाफोनी करून संध्याकाळी परत एक पॅन ॲमला फोन लावला. ते म्हणाले, रात्री ११ ला प्लेन सुटेल,

तर तुम्ही ९ ला विमानतळावर या. त्याप्रमाणे सध्याकाळी साडेसातला जेवणाची ऑर्डर दिली— पण या मोठ्या हॉटेलांतून ऑर्डर दिल्यानतर



लवकर कधी जेवण आल्य असा माझा गेल्या पधरा वर्षांतला अनुभव नाही. त्यामुळे साडेआठपर्यंत जेवण आले नाही हे पाहताच जेवणावर पाणी सोडून आम्ही नऊ वाजता विमानतळावर आलो.

विमानतळावर आमच्यासारखे कायदेकानू ठाऊक नसणारे काही प्रवासी रात्रभर विमानतळावर मच्छराच्या सगतीत राहिले होते. त्याना आमचा पराक्रम कळताच त्यानी पॅन ॲमच्या लोकाना शेकडो शिव्या मोजल्या. अर्थात अशा शिव्याचा काही उपयोग नसतोच. शेवटी आम्ही कस्टममध्ये प्रवेश केला. तिकडे एवढी गर्दी होती की काही विचारू नका. त्या गर्दीत काही लोकानी त्याच्या बॅगा उघडाव्या लागल्या. कस्टम ऑफिसरने माझ्या चेहऱ्याकडे पाहिल— कदाचित मी एक निरुपद्रवी लेखक आहे हे त्याला कळल असाव. त्याने माझा पासपोर्ट चेक करून माझी आणि सौ. ची तात्काळ सुटका केली. पण ' सुरक्षा जाच 'च्या लोकानी आमच्या हँडबॅगा अगदी कसून तपासल्या. आम्ही बॉम्ब, पिस्तूल आणल असेल या संशयाने आमच्या कपड्याची झडती घेतली. त्यात अर्धा तास गेला आणि अखेर आम्ही आमच्या विमानात शिरलो.


पॅन ॲमच्या सेविकानी आमचे परीटघडी हास्याने स्वागत केले. एकूण

चार-पाच मुलींपैकी पाहण्यालायक अशी एकच मुलगी आहे असे सौ.चे मत पडले. स्त्रियांच्या सौंदर्याच्या तुलनेत युरोपियन स्त्रिया अमेरिकन बाया-पेक्षा शतपटीने सुंदर. त्यामानाने अमेरिकन हे कुरूपातच मोडतील. पॅन ॲमचे हे विमान जुनाट आणि फालतू. त्यामानाने आमचे एअर इंडियाचे विमान फारच देखणे आणि अलीशान. पण एअर इंडियाच्या सेविका भारतीय प्रवाशाकडे ढुंकूनही पाहात नाहीत. त्या परदेशी प्रवाश्याच्या हाकेला धावून जातात तर भारतीय प्रवाश्याशी त्यामानाने उद्धटपणे किंवा उदासीन वृत्तीने वागतात. आम्ही आमच्या जागेवर बसलो. 'कुर्सीकी पेटी' बांधली आणि विमानाने आकाशात झेप घेतली.

मुम्बई ते लंडन हा प्रवास तसा कंटाळवाणा. वाटेत सकाळी सहा वाजता विमान तेहेरानला आलं. विमानतळावर जाण्याची आम्हाला मुभा नव्हती. पण विमान साफ करायला इराणी नोकर आत आले. काही इराणी उतारू पण आत चढले. आमचे विमान सुरुवातीला निम्मे रिकामे होते ते तीन-चतुर्थांश भरले. माझ्या समोरच्या सीटवर एक गुजराती जोडप बसलं होत. परदेशात भारतीय माणूस भेटला तर तुमच्याशी बोला-यला मागत नाही. अमेरिकेत तर स्वस्त कपड्यांच्या दुकानात मेंढरासारखी गर्दी करणारे चिकट भारतीय रस्त्यात आडवे आले तर हसणार पण नाहीत. ते स्वतःला प्रति अमेरिकनच समजतात. पण समोरच्या गुजरात्याने मला आपणहून मी अहमदाबादचा, आपण कोठले, असा प्रश्न केला. तेहेरानला विमान चांगलं दोन तास थांबलं.

रात्री विमानात 'पिंक पॅंथर' हा चित्रपट दाखवला. अर्थात विमानातला चित्रपट पाहण्यात कुणाला मुळीच इन्टरेस्ट नसतो. सकाळी आठ वाजता ब्रेक फास्ट आला तो सर्वत्र ठरीव ठशाचा. ब्रेड—बटर—आम्लेट. अकरा वाजता सेविका ढकलगाडीतून बिअर, वाइन, व्हिस्की फिरवू लागल्या. सिंगापूर एअर लाइन सोडल्यास इतर कोणत्याही विमानात इकॉनॉमी क्लासमधील उतारूंना मद्य फुकट दिले जात नाही. पण एका सेविकेने माझ्या कानात येऊन सांगितले की, आमच्या विलंबाचे प्रायश्चित्त म्हणून आज आम्ही मद्य फुकट देणार आहोत. आमच्या गुजराती मित्राने स्कॉच मागवल्याचे पाहून मला बरे वाटले आणि थोडा नैतिक धीर आला. त्यामुळे सौ.च्या क्रुद्ध चेहेऱ्याकडे दुर्लक्ष करून मी थोडे सौम्य मद्य—म्हणजे 'जीन' मागवली. सौ.ने 'कोक' मागवला. पण बरोबर शेंगदाणे

मागवले. विमानात वाचण्यासाठी भरपूर मासिके असतात. त्यामुळे वेळ घालवायचा कसा असा प्रश्न उरत नाही. ज्याना कुणाला संगीत हवय



त्याना कानाला नळ्या अडकवून गाणं ऐकण्याची सोय आहे. एअर इंडियात शास्त्रीय हिंदी संगीतही ऐकायला मिळते. पॅन ॲमध्ये ही भारतीय संगीताची सोय नाही.

दुपारी जेवण झाल्यावर आम्ही तासभर डुलकी काढली. अधूनमधून कॅप्टन आपण कोणत्या प्रदेशावरून जात आहोत याची माहिती देत होता. त्याच्या अस्पष्ट स्वरोच्चारावरून तो काय बोलतोय ते संपूर्ण कळत नव्हते. अखेर चारच्या सुमारास एका सेविकेने जाहीर केले की, कमरपट्टे आवळा— लंडनच्या हीथ्रो एअरपोर्टवर आपण उतरत आहोत.

आणि अर्ध्या तासात आमचं विमान लंडनच्या हीथ्रो विमानतळावर येऊन दाखल झालं.

लंडनच्या या ख्यातनाम एअरपोर्टवर येण्याची ही माझी तिसरी वेळ. जगातला हा एक प्रचंड गर्दीचा अवाढव्य एअरपोर्ट. सांताक्रूझ एअरपोर्टला पन्नासानी गुणा — म्हणजे तुमच्या ध्यानात येईल हीथ्रो एअरपोर्ट केवढा मोठा आहे ते !..

. ४ .

# तमसेच्या तीरावर

भारतीय प्रवाश्याना आता दिवसेंदिवस ब्रिटनमध्ये प्रवास करणे फारच कठीण होत चालले आहे. इथे तुम्हाला ब्रिटिश हायकमिशनच्या कचेरीत तासन् तास तातकळत राहावे लागते. व्हिसाचा अर्ज करण्यापूर्वी तुमच्याकडे परतीचे तिकीट आणि ब्रिटनमधील स्थायिक नागरिकातर्फे 'स्पॉन्सरशिप' म्हणजे तेथल्या नागरिकाने तुमच्या ब्रिटन-मधील वास्तव्यात तुमचा खर्च सोसण्याचे प्रतिज्ञापत्रक आणि तसा सगळा खर्च सोसण्याची असलेली आर्थिक पात्रता सिद्ध करणारे कागद तुमच्याकडे पाठविले पाहिजेत. अशा सर्व कागदपत्राच्या तयारी-निशी गेल्यावर, हायकमिशनच्या कचेरीतील सरकारी अधिकारी एखाद्या गुन्हेगाराची उलटतपासणी करावी तशी तुमची उलटतपासणी करतात. या सगळ्या प्रकरणात एक दिवस मोडतो. बरे, एवढे कागदपत्र असून तुम्हाला 'व्हिसा' मिळेलच याची गॅरंटी नाही. या व्हिसासाठी मी सह-कुटुंब ब्रिटिश हायकमिशनरच्या कचेरीत गेलो. तिथे मासळी बाजाराएवढी ब्रिटन-प्रवेश--इच्छुकाची गर्दी झालेली होती. मला प्रश्नोत्तराना तोंड द्यावे लागले; पण मी यापूर्वी लंडनला दोनदा जाऊन आलेला असल्यामुळे मी ब्रिटनमध्ये कायम राहण्यासाठी जाणारा आगतुक प्राणी नाही याची त्याला खात्री पटली आणि मला लागलीच व्हिसा मिळाला.

पण हा व्हिसा मिळाला याचा अर्थ तुम्हाला बिनतक्रार ब्रिटनमध्ये प्रवेश करता येईल असे नाही, असा इशारा अगोदरच दिलेला असतो. त्यामुळे विमानतळावर मला इमिग्रेशन अधिकाऱ्याने बरेच प्रश्न विचारले. मी लेखक आहे असे कळताच त्याने भिवया वक्र करून मजकडे पाहिले आणि मला मोकळे केले. आम्ही हँड-बॅगा, पासपोर्टादी कागद सावरीत इमिग्रेशनमधून आमच्या बॅगेज काउंटरवर आलो. बॅगेज काउंटर

हा एक तापदायक प्रकार. मुंबईहून दिल्लीला यायला दोन तास लागतात, पण विमानतळावर तुमची बॅग हाती यायला पाऊण तास




लागतो. माझी बॅग सर्वांत शेवटी येणार हा आजपर्यंतचा अनुभव. लंडन एअरपोर्टवर पण तोच अनुभव येणार ही खात्री होती. अर्ध्या तासाने माझी बॅग आली. आणि दुसऱ्या बॅगेचा पत्ताच नाही! शेवटी पॅन ॲमच्या कर्मचाऱ्याकडे मी गेलो. तिथे माझ्यासारखे इतर आपल्या बॅगेजच्या काळजीत होते. पॅन ॲमच्या लोकानी आम्हाला सांगितलं की, 'तुम्ही काही काळजी करू नका. तुमचं सामान दोन तासांनी येणाऱ्या विमानातून येतय आणि ते आम्ही तुम्हाला घरपोच पाठवून देऊ.' त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून आम्ही कस्टमच्या आवारात आलो. पण आमच्या चेहऱ्याकडे पाहून आम्ही इंग्लंडमध्ये चोरटा माल आणणाऱ्यापैकी नव्हे हे ओळखूनच की काय त्याने आम्हाला खुणेने इशारा केला की, 'आता पळा. इथे गर्दी करू नका.'

लंडनचा हीथ्रो एअरपोर्ट हा अवाढव्य आहे. न्यूयॉर्कचा जॉन एफ.

केनेडी, रोम, फ्रँकफर्ट, ब्रसेल्स या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जातीचा. कोणाही सराईत माणसाने गोंधळून जावा असा. युरोप–अमेरिकेत विमानातून बाहेर पडल्यावर विमानतळावर जायला बसेसचा वापर केला जात नाही. विमान भिडते ते विमानतळालाच. लंडन विमानतळावर प्रथमच भारतीयांना दिसणारे लाजिरवाणे दृश्य म्हणजे पंजाबी झाडूवाल्या. या कळाहीन दरिद्री सरदारणी तुमच्या देशाची अब्रू आंतरराष्ट्रीय पातळीवर झाडीत असतात. आम्ही बॅगा ढकलीत अनेक चक्रव्यूह, माणसे, ढकल-गाड्या, दुकाने, एस्केलेटर्स ओलांडून मुख्य प्रवेशद्वाराशी आलो. तेथे चक्क मि. आणि मिसेस ' बॅला सामान ' यांनी इन्क्वायरी काउंटरवर यावे असा संदेश ऐकू आला. याचा अर्थ आमची पुतणी आपल्या काकाला न्यायला आलीय असा मी तर्क केला, आणि माझा जीव भांड्यात पडला.

थोड्याच वेळात त्या प्रचंड गर्दीला तोंड देत मी इन्क्वायरी काउंटरवर आलो आणि आमची डॉ. रेखा पड्या म्हणजे पूर्वीची रेखा सामंत हिची गाठ पडली. तिने सुहास्य वदनाने आमचे स्वागत केले असा माझा अंदाज; कारण जे सदैव सुहास्य वदनाचे असतात त्यांचा अंदाज घेणे कठीण. पण रेखा नुसती सुहास्यवदना नव्हे तर बडबडी. याला संस्कृतात बहुवदना म्हणतात की काय कोण जाणे! रेखाने आम्हाला मोटरीत बसवले. डिकीत बॅग ठेवली. मोटार चालवीत होते तिचे एक सहकारी डॉक्टर. त्यामुळे आम्ही निर्धास्त झालो. कारण रेखा मुंबईत गाडी चालवताना दादरची जनता आणि तिचे वडील सदैव चिंतेत असत हे मी ऐकले होते.

लंडनला आम्ही पोचलो ४ जुलैला. पण लंडनमध्ये आम्हांला कुडकुडा यावा एवढी मस्त थंडी होती. इंग्लंडमध्ये ' समर ' असतो असे जाणकार प्रवाश्यांनी सांगितल्यामुळे मी स्वेटर घेतला नाही. म्हणजे बाहेर काढून ठेवलेला विसरलो. त्यामुळे आमची थोडी पंचाईत झाली. रेखाचे घर हे इप्सम या गावी. लंडनपासून चक्क चाळीस मैल. हे सरे परगण्यात आहे. या गावाने लंडनमध्ये सामील व्हावे अशी लंडनकरांची इच्छा. पण इप्सम ( हा उच्चार एप्सम पण असू शकेल. ) गावाने आपली अस्मिता टिकवून ठेवण्यासाठी हे आमंत्रण नाकारले. उद्या ठाण्याच्या लोकांना मुंबईत सामील व्हायला सांगितले तर ठाणेकरही मुंबईकरांना वेड्यात काढतील. येथील नैसर्गिक पाण्याचे झरे व जगातील एक उत्कृष्ट रेसकोर्स प्रसिद्ध. १७९० पासून इथे डर्बी रेस खेळली जाते. ही रेस जूनमध्ये होऊन गेली असल्यामुळे

ती पाहणे आमच्या नशिबी नव्हते. ( प्रत्यक्ष नव्हे टी व्ही.वर ) या इप्समच्या झऱ्यातच ते ख्यातनाम इप्सम सॉल्ट सापडले म्हणे. अशा या ख्यातनाम गावी एका इस्पितळात आमची पुतणी डॉक्टर म्हणून काम करीत असल्याने आम्ही तेथे येण्याचा योग त्या गावाला लाभला. आमच्या पुतणीने मी लेखक आहे हे त्या डॉक्टरला समजावून दिले आणि त्यानीही यथामती आनंद, आश्चर्य, कौतुक आणि आदर या भावना व्यक्त करणारे उद्गार तोंडाबाहेर काढले. लंडनमध्ये वाटेत आमच्या बेस्ट बसेससारख्या दुमजली तांबड्या ' बशी ' दिसतात, तसेच आपल्या फोर्ट विभागात ज्या तऱ्हेच्या ' गॉथिक ' पद्धतीच्या इमारती दिसतात तशा इमारती लंडनमध्ये पुष्कळ असल्यामुळे आपण जणू काय मुंबईतच वावरतोय असे वाटले. लंडनमध्ये भारतीयाची गर्दी जागोजाग दिसते. त्यामुळे आपण परदेशात आलो आहोत असे वाटले नाही.

इप्सम हे गाव मोठे छान, टुमदार. ब्रिटिश खेडी—त्याना खेडी म्हणणे म्हणजे त्याचा अपमान; टुमदार, स्वच्छ आणि नीटनेटकी. कुठ घाण नाही, कचरा नाही. परदेशी कॅलेंडरात आपण बघतो तशी चकचकीत घर, समोर छान लॉज, मागे पोहण्याचा तलाव. रस्त्यावर विडी— म्हणजे सिगरेटच थोटुकही शोधून सापडायचं नाही. रेखा इप्समच्या हॉर्टन हॉस्पिटलमध्ये काम करते आणि तिचा नवरा डॉ. सुरेश गावातल्या एका इस्पितळात सर्जन आहे. तिचा हा सर्जन नवरा कमालीचा सज्जन आणि आतिथ्यशील म्हणजे आमच्या पुतणीपेक्षा. मी येताक्षणी त्याने काका म्हणून माझ स्वागत केल, आणि माझ्या बायकोला मावशी बनवल. गुजराती समाजात काकीपेक्षा मावशीला अधिक महत्त्व असाव अस मला वाटल. रेखाच घर—मोठा हॉल, किचन आणि बेडरूम. रेखानं आम्हाला आपल्या बेडरूमचा ताबा दिला. आम्ही नको नको म्हणत असता. आमची पचाईत झाली. आम्ही तिला समजावून दिल आम्ही हनीमूनला आलेलो नाही; पण तिनं ऐकल नाही.

त्यानतर सुरेशन ' काका, तुम्हाला काय पाहिजे ? ' म्हणून मला प्रश्न विचारून भडावून सोडल आणि लगेच गाडी घेऊन तो गावात गेला आणि तेथील बांगलादेशीय हॉटेलातून त्याने आमच्यासाठी चमचमीत गरम जेवण मागवले. तो गुजराती असून तिखट मटण आवडीने खातो. माझ्यासाठी स्कॉच व्हिस्कीची बाटली व मावशीसाठी खास फ्रेंच वाइन घेऊन आला. इकडे माझ्या बायकोची थोडी चुळबुळ चालली होती. तिच लक्ष नव्हत.

कारण पॅन अॅमच्या लोकानी अजून बॅग घरी पोचवली नव्हती. त्या बॅगेत– जनतेच्या भेटवस्तू होत्या. त्यामुळे अधिकच काळजी. शेवटी आम्ही जेवायला बसलो. हे बागला देशिय जेवण– चिकनकरी, बिर्यानी – चक्क




कोल्हापुरी जेवणाच्या तोंडात मारील इतके तिखट होते. इथे येण्यापूर्वी सकष्टी, शनिवार, गुरुवार या व्रतावर सौभाग्यवती पाणी सोडून आल्यामुळे तिनेही नि:सकोच जेवण केले. इतक्यात फोन खणखणला. तो होता इस्पितळाच्या टेलिफोन ऑपरेटरचा. तिने आनददायक वृत्त दिले की, तुमची बॅग पॅनअॅमकडून आलीय. अगदी घरपोच. ही बातमी कळताच सौभाग्यवती आणखी दोन घास प्रेमाने जेवली हे सागणे नको !

नतर ‘ मावशी, काका, तुम्ही आता आराम करा. आता लडनला कुठे कुठे जायच याचा प्रोग्रॅम आपण उद्या करू ’, असे सागून सुरेशने आम्हाला विश्राती घेण्याची आज्ञा दिली. विमानात दीड दिवसाचे जाग्रण आणि एकाच जागी बसण्याचा व्यायाम यामुळे अग नुसत आबून गेल होत. त्यामुळे आम्ही बिछान्यावर टेकताच राणीच्या राज्यात झोपेच्या आधीन झालो.

· ५ ·

# कोहिनूर हिरा आमचा आहे !

लंडनला जुलै महिन्यात ' समर ' असतो. त्यामुळे गरम कपडे नेण्याची काहीच गरज नाही असे अनेकांनी बजावून सांगितले होते. या सर्वांच्या



सांगण्यावर विश्वास ठेवून आम्ही वुलनचे स्वेटर्स घरीच ठेवून आलो होतो. पण दुसऱ्या दिवशी घराबाहेर पडलो तो वेगळाच अनुभव आला.

चांगली हुडहुडी भरणारी थंडी. त्यामुळे रेखाला घेऊन आम्ही संध्याकाळी ' मार्कस् ॲन्ड स्पेन्सर ' या जगप्रसिद्ध डिपार्टमेंट स्टोअर्समध्ये गेलो. लंडनमध्ये मिळत नाही अशी एकही वस्तू नाही. वेस्टएंडमध्ये तर एकाहून एक सरस दुकानांची नुसती भाऊगर्दी. नुसती बघत बसावी अशी. पाश्चिमात्य देशातील ही डिपार्टमेंट स्टोअर्स म्हणजे एक अजबखाना असतो. नुसती एक फेरी मारायची म्हटली तरी पाय मोडून येतात. ज्यांना चालण्याचा व्यायाम हसत खेळत घ्यायचा आहे त्यांनी या स्टोअर्समध्ये फेरी मारावयास हरकत नाही. एप्समहून मुख्य शहर फार लांब म्हणजे रोजचे एकट्याचे जाण्यायेण्याचे दोन पौंड खर्च. एप्समहून व्हिक्टोरिया स्टेशन किंवा वॉटर्लू स्टेशन. या स्टेशनपर्यंत ब्रिटिश रेल्वेची गाडी जाते. ब्रिटिश रेल ही तोट्यात चालणारी कंपनी आहे. त्यामुळे सकाळी १० नंतर प्रवास केलात तर तुम्हाला सवलतीचे तिकीट मिळते. गाडीत तुमच्या डब्यात इनमिन चार-पाच प्रवासी असतात. त्यात म्हाताऱ्या बायकाच जास्त. गाडीतले सर्व स्त्री-पुरुष उतारू सुतकी चेहऱ्याने सुखस्तभासारखे प्रवास करतात. आपल्या इथं गाडीत जसा रमी, राजकारण किंवा भजन हा प्रकार असतो तसा प्रकार इथं नाही. वर्तमानपत्र, पेपर बॅक किंवा चॉकोलेट याच्या सगतीत ते आपला वेळ घालवतात. मोठी माणसे लहान पोरांसारखी चॉकलेट चघळताना पाहून गमत वाटते. युरोप-अमेरिकेत चॉकलेट आणि आइस्क्रीमचे फार वेड माजले आहे. अमेरिकेत ' कोक ' तर युरोपात आइस्क्रीम. हे लोक अखंड काही तरी खात असतात. लंडनची ट्यूब रेल्वे ही एक विलक्षण गोष्ट आहे. अभिमन्यूचा चक्रव्यूह म्हणजे काय असा प्रश्न विचारला तर या पॅरिस, लंडन आणि न्यूयॉर्कच्या ट्यूब रेल्वेकडे बोट दाखविता येईल. लंडनच्या या भुयारी रेल्वेस २७५ स्टेशने आहेत. या रेल्वेने प्रवास करणे म्हणजे एक जिकीरीचे काम आहे. कारण आत एवढे मार्ग एकमेकात गुंतले आहेत की विचारू नका. इथे तिकिटासाठी अगदी बोरीबंदरसारख्या रांगा असतात. शिवाय ठराविक स्टेशनाची तिकिटे मिळणारी यंत्रे पण आहेत. तुमचे पिवळे तिकीट प्रवेशद्वाराच्या आडव्या दांड्याजवळच्या खोबणीत टाकायचे. त्याबरोबर दांडा खाली जातो आणि दुसऱ्या बाजूने तुमचे तिकीट हाती येते. ते तिकीट स्टेशनबाहेर पडल्यावर तिकिट-चेकरला द्यायला हवे. पॅरिस आणि न्यूयॉर्कला एकदा तुम्ही आत शिरलात की मग तुम्ही कुठेही जा आणि कसेही बाहेर पडा. शिवाय न्यूयॉर्कला

गावात कुठेही जायला एकच तिकीट. अर्ध्या डॉलरचे. पण लंडन भुयारी रेल्वेत वेगवेगळी तिकिटे आहेत. पण या रेल्वेत तुम्ही चुकणे शक्य नाही. कारण प्रत्येक स्टेशनच्या बाहेर एक नकाशा असतो. समजा, व्हिक्टोरिया स्टेशन-वरून तुम्हाला चान्सरी लेन या स्टेशनवर जायचय. त्या त्या नकाशावर चॅन्सरी लेन हे बटन दाबायचे. लगलीच तुमचा मार्ग प्रकाशित होतो. तुमचा प्लॅटफॉर्म नंबर, तुमच्या गाडीचे नाव आणि वाटेत बदलायची असेल तर त्या स्टेशनचं नाव तुमच्यासमोर साकार होते. समजा ही यातायात तुम्हाला जमली नाही तर चेकर तुम्हाला अगदी गाडीपर्यंत नेऊन सोडील. चेकर कामात असला तर कुणाही उतारूला विचारलं तर तो तुम्हाला इतक्या अगत्याने वाट दाखवील की तुम्ही शरमिंदे व्हाल.

ब्रिटिश माणूस बोलका नाही पण सज्जन आहे. त्याला भारतीयाबद्दल प्रेम नाही. भारतीयाला तर त्याच्याबद्दल नाहीच नाही. इथ एप्सम जवळच्या एका बंगला देशाच्या रेस्टॉरंटमध्ये आम्हाला सुरेशने नेले होते. तो सुरेशचा मित्र होता. त्याच्याकडे चिकनकरी, मसाला डाळ, रायता, तंदुरी चिकन, वैंगन भरता हे भारतीय प्रकार होते. आम्ही गेल्यावर त्याने प्रेमाने स्वतःच्या खर्चाने आम्हाला इटालियन वाइन पाजली आणि इथ ब्रिटिश तरुणाचा आपल्याला कसा उपद्रव होतो याची कहाणी सांगितली ही पोर दारू पिऊन येतात. जेवतात. बिल देत नाहीत. मोडतोड करतात. आणि पोलिस त्याकडे मुळीच लक्ष देत नाहीत. आणि वेळ आलीच तर गुंडाच्या बाजूने वागतात. एक दिवस बंगाली बाबूने दोन मोठे सोटे घेऊन या पोराची हाडे खिळखिळी केली. त्या दिवसापासून हा उपद्रव कमी झाला, पण पोलिसांनी या बंगाली बाबूवरच खटले भरले.

ब्रिटन-अमेरिकेत भारतीय जेवण आता फार लोकप्रिय होऊ लागले आहे. त्यामुळे तंदुरी चिकनला आता फार चांगले दिवस आले आहेत. आम्ही आमच्या लंडनच्या भ्रमतीत बांगला किंवा पाकिस्तानी उपाहारगृहात मोठ्या काटकसरीने जेवलो तर आम्हाला पाच पौंडात भरपूर जेवता येत होत. इथले मध्यमवर्गीय आणि आमचे स्थानिक भारतीय यांना अर्थातच पाच पौंड परवडत नाहीत. त्यामुळे ही मंडळी चक्क डबे घेऊन ऑफिसात जातात. डबा म्हणजे सॅन्डविचिस आणि कॉफी. हे या बाबूलोकाच जेवण. बाहेर गेले तर फ्रेंच फ्राईज म्हणजे उकडलेल्या बटाट्याच्या काचऱ्या; एखादा मत्स्यविशेष आणि कॉफी किंवा सॅन्डविचिस आणि कॉफी. याला

किमान एक पौंड तरी लागतोच लागतो. अर्थात स्टेशनवर सेल्फ सर्विसची कॉफी, सॅन्डविचिस यापेक्षा स्वस्त असतात. पण इथं एक बर आहे. आत गेल्यावर परवडत नाही म्हणून ओशाळून बाहेर यायला नको. सर्व पदार्थांचे दर बाहेरच लावून ठेवलेले असतात. ते वाचून पाहावयाचे आणि मगच आत जायचे. आमचा हा मेन्यू वाचण्यातच वेळ जायचा आणि इंवटी थकून दोन पौंडांत बटाटा काचऱ्या आणि कॉफी यावर आम्ही आमची न्याहारी आटपत असू. मग थोडा धीर झाला तर रस्त्यावर कुठेतरी आइस्क्रीम.

लंडनची भ्रमती न्यूयॉर्कपेक्षा सुखदायी आणि निर्भय. आपल्या मागून कोण येतय आणि पुढून कोण येईल याची काळजी करीत भीत भीत रस्ता क्रॉस करण्याची गरज नाही. समोर दिसला तर एखादा भारतीय अथवा इंडियन लेडी. ती तुमच्याकडे पाहणार पण नाही. पण चुकून पाहिलच तर तुच्छतेनं. त्यामुळे सुरुवातीला आम्ही वैतागलो. पण नंतर आम्हीही त्यांचंच व्रत चालू ठेवल. भारतीय स्त्री-पुरुष दिसले की तोंड वळवायच किंवा नाक मुरडायच.

लंडन हे युरोपातील सर्वांत स्वस्त शहर. इथं खाण-पिणं आणि कपडे स्वस्त. शिवाय सेल, डिस्काउंटची दुकान असतात. शिवाय मार्क स्पेन्सर-मधील नंबर दोनचा माल निम्म्या किंमतीत विकणारी दुकान एप्सम-सारख्या इथल्या गावात असतात. या दुकानात कपडे घेणे किती फायदे-शीर आहे हे रेखाने आम्हाला पटवून दिले. त्यामुळे अशा स्वस्त्या दुकानात आम्ही जिथे जिथे म्हणून गेलो तिथ आम्हाला आमचे भारतीय बांधव गर्दी करून राहिलेले दिसले.

रेखा ही डॉक्टर—पण शॉपिंग आणि जनरल नॉलेजमध्ये एक्स्पर्ट. इथल्या भारतियाचा हायकमिशनरच्या कचेरीवर फार राग. या कचेरीतले लोक अति उद्धट आणि भारतीयांना मदत करायला सदैव नाखूष. नाना-साहेब गोरे येऊनही परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. उलट बिघडलीय असा अनेकाचा आरोप. मी नानासाहेबाना फोन केला, पण प्रत्यक्ष भेटायला गेलो नाही. कारण ही भेट म्हणजे किमान साडेचार पौंडाचा भुर्दंड ! त्यामुळे मी तो मोह टाळला.

लंडन ट्रान्सपोर्टतर्फे तुम्हाला बसने लंडनची गायडेड टूर करता येते. सकाळी नऊ ते चार. त्यात लंच आले. माणशी नऊ पौंड. त्यात ते लंडन-

मधील महत्त्वाच्या वास्तू आणि प्रेक्षणीय स्थळ दाखवतात. १९६८ साली मी हा व्याप केला होता; पण या वेळी सौभाग्यवती बरोबर असल्यामुळे आणखी एकदा लंडन प्रदक्षिणेचा योग आला. या एक दिवसाच्या प्रवासात महत्त्वाचे ठिकाण म्हणजे टॉवर ऑफ लंडन. विल्यम द कॉन्करर याने हा किल्ला बांधला आणि इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याचे हे वसतिस्थान होते. त्यानंतर या टॉवरचा तुरुंग म्हणून उपयोग करण्यात येऊ लागला. टॉवर ऑफ लंडन म्हणजे इंग्लंडच्या इतिहासाची एक काळीकुट्ट बाजू. या तुरुंगात राजेरजवाडे, लेखक, धर्मोपदेशक, तोतये यांनी कारावास पत्करला आणि कित्येकांना या ठिकाणी ठार मारण्यात आले. सर वॉल्टर रॅलेला ज्या खोलीत ठेवण्यात आले होते ती आम्ही पाहिली. ॲन बुलीन या आठव्या हेन्रीच्या बायकोला जिथं फाशी देण्यात आले ते ठिकाण पाहिले. शाळेत वाचलेला आणि आता साफ विसरलेला इतिहास परत आठवला.



टॉवर ऑफ लंडनमध्ये मध्ययुगीन ब्रिटिश युनिफॉर्म घातलेले सैनिक दिसतात. त्यांच्या अगडबंब काळ्या टोप्या, तांबडी जाकिटं आणि एकाच जागी तासन् तास पुतळ्यासारखं निश्चल राहण्याचं कौशल्य. या मंडळींना बीफ ईटर्स म्हणतात. या नावाची एक ख्यातनाम 'जीन' पण आहे. पण टॉवर ऑफ लंडनमधील सर्वांत प्रेक्षणीय भाग (हे सौ. चे मत) म्हणजे तेथील शाही खजिना. या खजिन्यात कोट्यवधी रुपयांचे मुकुट, रत्नजडित तरवारी, पोशाख आणि हिऱ्यांचे दागिने आहेत. राणीचा रत्नजडित हिऱ्याच्या मुकुट पाहून बायकांचेच काय पण पुरुषाचे भान हरखून जाते. आमचा गाइड या खजिन्यातील कोहिनूर हिऱ्याचं जेव्हा कौतुक करू लागला तेव्हा मी त्याला म्हटले— हा आमचा आहे. त्यावर तो म्हणाला, 'पाकिस्तान तो आमचा आहे असं म्हणतं.' आम्ही शेवटी जेव्हा बाहेर आलो तेव्हा तो आम्हा सर्वांना उद्देशून म्हणाला, 'कोहिनूर हिरा हा आमचा आहे, असं इथं एक भारतीय मित्र म्हणाला,


पण पाकिस्तान म्हणत की तो आमचा आहे. या दोघांच्या भांडणाचा निकाल लागेपर्यंत तो आमचा आहे असं मी म्हणतो.'

भारतीय म्हणताच इतर सहप्रवासी माझ्याकडे कौतुकाने पाहू लागले हे सांगणे नकोच !

. ६ .

# मोहमयी जत्रा

लडन शहराची मुबईशी तुलना करायची तर मुबईच्या पुढे कोल्हापूर जसं थिट वाटत तस लडनच्या तुलनेन आमची मुबई ही एखाद्या काकूबाई-सारखी वाटते. लडन हे केवळ प्रचड शहर नव्हे तर ते एक ऐश्वर्यसपन्न शहर



आहे. मार्कस् अँड स्पेन्सर, वुलवर्थ, अलेक्झाडर यासारखी प्रचड डिपार्टमेंट स्टोअर्स आमच्या देशात कोठेही नाहीत. आमचा अपना बाजार अजूनही फारच गलथान आहे. पाश्चिमात्य देशांतील डिपार्टमेंट स्टोअर्स हे एक वेगळे जग आहे. पॅरिस, ॲमस्टरडॅम, फ्रॅंकफर्ट, रोम, हॅम्बुर्ग, डुसुल्डार्फ या

शहरांतील ही डिपार्टमेंट स्टोअर्सची मालिका म्हणजे एक वेगळे जग आहे. आमच्याकडे दुकानातील विक्रेता तुम्हांला माल दाखवतो, त्याच्या किंमती सागतो. तेथे तसा प्रकार नाही. तुम्हाला पॅंटस् घ्यायच्या असतील तर एकाच प्रचड दालनात किमान पधरा—वीस हजार पॅंटस् हारीने लावलेल्या असतात. न्यूयॉर्कच्या ' मॅसीज ' या डिपार्टमेंट स्टोअर्समध्ये तर तुम्हाला स्वैंपाकघर सजवायचे असेल तर एका मजल्यावर चार स्वैंपाकघरे सजविलेली दिसतील. त्यातले कोणतेही तुम्ही निवडा अथवा तुमच्या स्वैंपाकघराचे माप द्या. तुम्हाला चोवीस तासात त्याचे ड्रॉईंग काढून मिळेल. एक नव्हे चार-पाच वेगवेगळाली.

अशा या मोहमयी जत्रा म्हणजे डिपार्टमेन्ट स्टोअर्स. तेथे उत्तम उपाहार-गृहे, सरकते जिने, लिफ्ट, प्रत्येक मजल्यावर टेलिफोन आणि काही ठिकाणी तर इमारतीतच पार्किंग करायची सोय. तुम्ही दमलात तर शीण घाल-वायला कारजी, उत्तम आसने, सिनेमागृहे, आइस्क्रीम आणि अन्य खाद्य-पदार्थांची मुबलकता. लडनमध्ये आम्ही गेलो ते दिवस सेलचे होते. युरोपातील मुले भाग्यशाली म्हटली पाहिजेत. कारण मुलाच्या कपड्याची दालने आणि खेळण्याची दालने पाहून आपण एखाद्या परीकथेत तर वावरत नाही ना असा सभ्रम निर्माण होतो. काय घेऊ आणि काय घेऊ नको अस या वयातही वाटत. या अशा दुकानात गर्दी तर एवढी असते की विचारू नका. त्या गर्दीत स्त्रियाचेच साम्राज्य जास्त. साठीवरच्या म्हाताऱ्या बाया आम्हा पुरुषापेक्षा जास्त तरतरीत, हसऱ्या, नीटनेटक्या आणि पाच पाच मिनिटानी पर्समधून आरसा काढून चेहऱ्याची रगरगोटी करणाऱ्या. तरुण पोरी आणि पोरे जीनमध्ये. ही जीन म्हणजे निळ्या रगाची तग पॅंट. कापड ओबड-धोबड. ते येत भारतातून आणि इथ त्याच्या जीन तयार होतात. युरोप-अमेरिकेत या ' जीन 'च स्तोम कमालीच आहे. पॉप म्यूझिक, जीन आणि कोक हा तरुणाचा स्थायीभाव. पोर आणि पोरी याचा वेष एकच. पोरीही चागल्या तगड्या असतात. पूर्वीसारख आता लडनमध्ये पोशाख आणि एटिकेट्सच बड राहिलेल नाही. युरोपात ब्रिटन हे त्यामानाने सनातनी आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल; फ्रेंच, जर्मन, स्विस, बेल्जम, या राष्ट्राचा नूर आणि खाक्या वेगळा. तिथ या एटिकेट्स् पार रसातळाला गेल्या आहेत. उन्हाळ्यात युरोपियन स्त्री-पुरुष कपड्याची पर्वाच करीत नाहीत. त्यामानाने ब्रिटिश पोरी अजून पुष्कळच सभ्यतेने

चागतात.

लंडनमध्ये आम्ही या डिपार्टमेन्ट स्टोअर्समध्ये अनेक वेळा भ्रमती केली. लेवाय आणि रँगलर या अमेरिकन जीन्सना प्रत्येकी दहा ते पधरा पौंड पडतात. त्यामानाने लंडनला कपडालत्ता आणि खाण-पिण स्वस्त आहे. लंडनला आम्ही भारतीय उपाहारगृहातून जेवण घेतल. चायनीज रेस्टॉरंट-मधील पदार्थांच्या किंमती वाचूनच मागे सरलो. बऱ्यापैकी जेवायच असेल तर माणशी शभर रुपये खर्च आहे. पण नुसत पोट भरायच तर दीड पौंड तरी हवाच. मात्र इथ प्रत्येक दुकानात पदार्थांची यादी आणि किंमती बाहेर लावलेल्या असल्यामुळे त्या मेन्यूच निरीक्षण करण्यात आम्ही बराच काळ घालवला.

लंडनला आपल्या मानाने कपडेलत्ते फार स्वस्त आहेत. त्याच्या पौंडाच्या हिशोबात पाहिले तर तीनशे पौंड पगार कारकुनाला मिळतो. पण पाच पौंडात तुम्हाला पॅण्ट मिळते. शभर पौंडात टेलिव्हिजन सेट मिळतो. म्हणजे सामान्य कारकुनाच्या मासिक पगाराच्या एक-तृतीयाश रकमेत टी. व्ही. किंवा फ्रीज मिळतो. अथवा चारशे पौंडात त्याला मुंबईचं परतीच विमान-तिकीट घेता येत. इथ आपल्याकडे आमच्या कारकुनाला फ्रीज घ्यायला पगाराच्या दसपट रक्कम मोजावी लागते. त्यामुळे लंडनमध्ये प्रवास करताना पौंडाचा रुपयात हिशोब करून वावरल तर विकतही घ्यायला नको आणि काही खायला पण नको; आणि गमत अशी की लंडन-मध्ये स्थायिक झालेली आमची भारतीय मडळी हाच हिशोब करीत तिथे कशीबशी जगत असतात.

लंडनच्या या भ्रमतीत आम्हाला एकदा पावसाने चागलेच झोडपले. लंडनमधला पाऊस म्हणजे नुसती रिमझिम. त्यामुळे छत्रीची गरज नाही असे रेखाने सागितले होते. म्हणून एक दिवस ऑक्सफर्ड स्ट्रीटवर आम्ही काही किरकोळ खरेदी करायला गेलो असता पावसाने गाठले. अगदी मुंबई स्टाईलचा पाऊस. आम्ही छत्र्या खरेदी करणार होतो ते अमेरिकेत. तिथे दीड डॉलरला लेडीज छत्र्या मिळतात असं कुणी तरी सागितल होत. ७२ साली मी एक डॉलरला छत्री विकत घेतली होती. पण या आयत्यावेळी आलेल्या पावसाला तोंड देण्यासाठी म्हणून छत्री विकत घेण्याचा आम्ही निर्णय घेतला आणि एका स्टोअरमध्ये शिरलो. पण एकही छत्री पाच पौंडाखाली नाही. पाच पौंड म्हणजे पाऊणशे रुपये असा हिशोब करीत

सौभाग्यवतीने पावसात भिजणे पत्करले— पण छत्री नको असा निर्णय घेतला.

लंडनच्या या मुक्कामात मादाम तुसाची मेणाची चित्र मी दुसऱ्यादा पाहिली. या मेणाच्या पुतळ्याच्या संग्रहात हिटलर-नेपोलियन, बर्नार्ड शॉ, राजेरजवाडे, प्रेसिडेंट, सगळे लोक तुमच्यासमोर साकार होतात. पण भारतातील फक्त गांधी हा अपवाद सोडता दुसरा कुणाचाच पुतळा नाही. नेहरू आणि रवीन्द्रनाथ टागोर यांचे तरी पुतळे तिथे असायला हवे होते.

मादाम तुसाच्या संग्रहालयाशेजारी एक चित्रपटगृह होते. तिथ ' लास्ट टागो इन पॅरिस ' हा चित्रपट लागला होता. चित्रपट पाहण्यापूर्वी आम्ही शेल्डॉनच्या ' अदर साइड ऑफ मिडनाइट ' या गाजलेल्या कादंबरीवरचा चित्रपट पाहिला होता. ही कादंबरी जितकी मनोवेधक आहे तेवढा चित्रपट मनाची पकड घेणारा वाटला नाही. पण बेड सीन्स, संभोग-दृश्ये यांची चित्रपटात त्यलूट होती. असले हे चावट आणि घाणेरडे सिनेमा दाखवतात तरी कसे आणि बघतात तरी कसे अस म्हणून सौभाग्यवतीने बिनतक्रार हा सिनेमा पाहिला. पण ' लास्ट टागो ' हा मिडनाइटपेक्षा भयंकर होता. मार्लन ब्रान्डोची भूमिका असणारा हा चित्रपट गेली आठ वर्षे कोणत्या ना कोणत्या चित्रपटगृहात दाखविला जात आहे. पण ' मिडनाइट 'सारख या चित्रपटाला घटनाप्रधान कथानक नसल्यामुळे भरपूर आणि भयानक चावटपणा असूनही सौभाग्यवती या चित्रपटाला कंटाळली.

परदेशात चित्रपट पाहणे हा फारसा सुखद अनुभव नाही. कारण इथे चित्रपटगृहे फार छोटी असतात. जेमतेम चारशे माणसे मावतील एवढी. आणि त्यात प्रेक्षक असतात जेमतेम वीस पचवीस. शिवाय दोन पौंड तिकीट म्हणजे आमच्या रुपयाच्या हिशोबात तीस रुपये; म्हणजे एकूण साठ रुपये गेले. त्यामुळे सिनेमात चित्त लागत नाही. शिवाय सिनेमागृहात वीस पचवीस प्रेक्षकात सत्तर टक्के म्हातारे आणि दोनचार स्त्रिया असा एकूण प्रेक्षकवर्ग असतो. त्यामुळे आपल्याकडे चित्रपट पाहण्याच जे थ्रिल आहे ते लंडन, न्यूयॉर्क अथवा पॅरिस इथ मुळीच नाही. इथं लोक चित्रपटाला जातात शनिवार-रविवारी.

लंडनच्या या मुक्कामात गंमत म्हणून मी लंडनचं प्राणिसंग्रहालय पाहिल. या प्राणिसंग्रहालयाच आवार प्रचंड, पाय मोडून येईल इतक.

पण प्राण्याची तशी विविधता दिसली नाही. मात्र माकडाचे—विशेषत: चिंपाझी आणि गोरिला याचे—अगडबब नमुने मी प्रथमच पाहिले ते इथे. त्यामानाने युरोपातील जर्मनी, स्वित्झर्लंड आदी राष्ट्रातील प्राणिसंग्रहालये अधिक प्रेक्षणीय आहेत असं म्हटलं पाहिजे.

लडनला गेल्यावर फॉईल्स या पुस्तकाच्या जागतिक कीर्तीच्या दुकानात न जाऊन कस चालेल? पण या ग्रथजत्रेत सौभाग्यवतीला फारसा इंटरेस्ट नसल्यामुळे मी एकटाच गेलो. फॉईल्स म्हणजे एक संस्थाच आहे. तिथ प्रत्येक विभागात बारकाईने हिंडायचं म्हटलं तर किमान तीन दिवस ठिय्या मारून बसलं पाहिजे. आता फॉईल्सने शेजारी एका इमारतीत 'पेपर बॉक्स'चा एक स्वतंत्र विभाग उघडलाय. पाश्चात्य देशात पुस्तक महाग; आणि पुस्तकाच्या भारी किमती आणि वजन लक्षात घेता मी इथं पुस्तकं फक्त डोळा भरून पाहायची, विकत घ्यायची नाहीत, असा निर्णय घेतला होता. त्यामुळे मी चक्क अडीच तास प्रत्येक मजल्यावर धावती पाहणी केली. प्रत्येक मजल्यावर रसिकांची गर्दी होतीच. फक्त रोडावलेला ग्रंथविभाग होता तो म्हणजे विनोदी वाङ्मयाचा अर्थात हे पाहून थोडे बरे वाटले आणि अहंकार थोडा सुखावला.


लडन मुक्कामात मराठी माणसाच्या फारशा गाठीभेटी झाल्या नाहीत. एक दिवस आम्ही लँकेशायरला, बोल्टनला डॉ. बाळ साळवी याना भेटायला गेलो. ड्रायव्हर डॉ. सुरेश आणि शेजारी रेखा नकाशा घेऊन त्याला रस्ता दाखवायला बसलेली. कारण लडन शहराच्या रस्त्याच्या चक्रव्यूहातून बाहेर पडून लँकेशायरला जाणाऱ्या रस्त्याला लागलो तरी वाटेत परत असे अनेक चक्रव्यूह भेटणार. त्यामुळे काही काळ रेखा ड्रायव्हर आणि सुरेश गाईड अशा तऱ्हेने आम्ही बोल्टनला आलो. बाळ साळवी हे माझे मित्र पुरुषोत्तम साळवी याचे धाकटे बधू. बोल्टनला त्याच्याबरोबर आम्ही त्याच्या एका जर्मन मित्राकडे गेलो. तेथे ख्यातनाम क्रिकेटियर रोहन कन्हाय भेटले. ही वामनमूर्ती अत्यंत सौजन्यशील आहे. त्याच्या वागण्या-बोलण्यात जरादेखील अहंकार नव्हता. रोहनची माझी गट्टी जमली आणि थोड्याच वेळात आम्ही एकमेकाचे फार दिवसाचे मित्र बनलो. तो मग आम्हाला आपल्या एका मित्राकडे घेऊन गेला आणि तेथे आम्ही बीअर घेतली, जेवण केले, रेकॉर्डच्या तालावर नृत्य केले. रोहनने नोव्हेंबरमध्ये मी मुबईला येणार तेव्हा तुम्हाला भेटेन असे अभिवचन दिले

(आणि ते पाळलेही). बोल्टनहून आम्ही ब्लॅकपूलला गेलो. आमच्याबरोबर बाळची दोन मुलं होती. ब्लॅकपूलला एक अप्रतीम एन्टरटेनमेन्ट पार्क आहे. ही म्हणजे कायम जत्रा. माणसानी आणि मुलानी फुललेली. त्यातल्या लुटुपुटीच्या मोटार शर्यतीत आम्ही दोघानी भाग घेतला. चक्रात बसलो. ड्राकुला, फ्रॅन्केन्स्टाइन, किंगकाँग याच्या भूत-महालात गेलो, अनेक ठिकाणी भीतीने सौ. ने डोळे मिटून घेतले.

युरोप-अमेरिकेत प्रत्येक शहरात या ज्या बालजत्रा, पार्क, क्रीडाविभाग आहेत, तसे विभाग आमच्याकडे जाणीवपूर्वक उभारलेल्या जत्रात आणि प्रदर्शनातही नसतात. खरोखर मला युरोपियन मुलाच्या भाग्याचा हा हेवा वाटतो. कारण या क्रीडाविभागात दोन तास बाळ साळवी, बाळ सामत आणि कला सामत आपल वय विसरले होते.

. ७ .

# युरोपच्या राजधानीत



बारा जुलै एकोणीसशे अठ्याहत्तर रोजी सकाळी सहा वाजता आम्ही युरोपच्या दौऱ्यावर निघालो. लंडनमधील हॉटेल कॉनराड इंटरनॅशनल येथे आम्ही सगळे 'यात्रेकरू' जमणार होतो. सुरेश आणि रेखा यांनी सहा वाजता आम्हाला हॉटेल कॉनराडजवळ आणून सोडले. आमच्यासारखे शंभर-दीडशे यात्रेकरू त्या ठिकाणी जमा झाले होते.

हॉटेलच्या प्रवेशद्वाराजवळ आमची नावे आणि आमच्या बसचा नंबर याची पाटी लागली होती. आमच्यासाठी चहा आणि केक्स याची सोय होती. शेवटी सगळे प्रवासी जमा झाल्यावर साडेसहा वाजता आमची बस तेथून निघाली आणि सरे-केन्ट परगणा या मार्गाने डोव्हरच्या दिशेने आमचा प्रवास सुरू झाला.

इंग्लंडचा ग्रामीण परिसर अगदी दृष्ट काढण्यासारखा चित्तवेधक आहे. हिरवागार. पचवीस एक मैल प्रवास केल्यावर आमची बस एका मोटेलपाशी थाबली. युरोपात दर पचवीस मैलांवर अशी रम्य विश्रामस्थाने आहेत. रस्त्याच्या कडेला मोटर उभी करून आपण मुबई—पुणे रस्त्यावर जो प्रकार करतो तसे काही करायला बदी आहे. कारण या विश्रामस्थानावर उत्तम पार्किंगची सोय, टॉयलेट रूम्स, रेस्टोराँ, दुकान, पेट्रोल याची सगळी सोय असते.

आमची मोटर या विश्रामस्थानापाशी थाबल्यावर आम्ही ब्रेकफास्ट घेण्यासाठी रागा लावल्या. युरोपात सर्वत्र डिश आणि ट्रे हातात घेऊन तुम्हाला हव्या त्या वस्तू घ्यायच्या आणि काउन्टरवर बसलेल्या बाईला ट्रे दाखवायचा. ती एका मिनिटात हिशेब करून तुमच्यासमोर बिल ठेवते. या स्वयसेवेत टिप देण्याची भानगड नाही. ब्रेकफास्टसाठी दोन पौंड खर्च केले आणि आम्ही बसमध्ये आलो.

आमचा टूर डायरेक्टर जॉन क्रॉफर्ड या नावाचा एक चलाख तरुण होता. तो सुरेख आणि स्पष्ट इग्रजी बोले. त्याचे इटालियन आणि फ्लेमिश, तसेच जर्मन व फ्रेंच भाषावर प्रभुत्व होते. साधारण आठ वाजता आम्ही डोव्हर बदराजवळ आलो.

६८ साली मी युरोपचा दौरा केला होता, तो विमानाने. विमानाच्या प्रवासात एवढे थ्रिल नसते. पण मोटरीचा प्रवास तुम्ही देशाच्या अंतरगातून करता; त्यामुळे तुम्हाला त्या प्रदेशाची जवळीक मिळते. डोव्हर-जवळ रस्त्याच्या कडेला एक प्राचीन किल्ला आहे. आम्ही सर्वांनी त्या किल्ल्याची छायाचित्रे घेतली.

डोव्हरहून आम्ही समुद्रमार्गे बोटीने बेल्जमला जाणार होतो. डोव्हरला कस्टमची पासपोर्ट तपासणी आटोपून आम्ही एका आलिशान बोटीवर चढलो. या बोटीच्या तळमजल्यावर शभर-दीडशे मोटरी होत्या. कारण 'समर' असल्यामुळे युरोपमध्ये सुटीसाठी स्वतःच्या मोटरीने जाणारे अनेक

प्रवासी या बोटीवर होते. बोटीवर बसण्याची इतकी छान सोय होती की, तशा ' सीटस् ' आमच्याकडच्या फाइव्ह स्टार हॉटेलमधील लाऊंजमध्ये पण नसतात.

अजून आमची आमच्या सहप्रवाशाशी ओळख झाली नसल्यामुळे आम्ही थोडे गांगरून एक कोपरा पकडला. समोरच कॅन्टीनमध्ये ड्यूटी-फ्री मद्य, सिगारेटस् तसेच सर्व तऱ्हेची पेये, पॅटिस अशा स्नॅक्सचा पुरवठा होता. आम्ही भीत भीत कॉफी आणि केक्स घेतले आणि त्याच्या हातावर दोन पौंड ठेवले.


सौभाग्यवतीने लंडनहून निघताना बिस्किटे, पाव, चीज, सफरचंदे आदी वस्तू भरलेली एक हँडबॅग घेतली होती. त्यामुळे कॉफीला पौंड तर बाकीच्या खाद्यपदार्थांना काय द्यावे लागेल— अर्थात काय द्यावे लागेल याची यादी समोर झळकत होती, याचा मनाशी विचार न करता आम्ही दुपारचे जेवण न घेता फराळावरच दिवस काढायचा असे ठरवले.

त्या आलिशान बोटीला वेग चांगलाच होता. इटालियन, फ्रेंच, जर्मन, ऑस्ट्रियन, स्विस—युरोपातील सगळे चित्रविचित्र लोक होते. या गर्दीत इटालियन लोक ओळखू येतात. नवरा-बायको, दोन-तीन मुले, मुलाचा आईपाशी हट्ट, आईने बटव्यातून पोराला पैसे देणे, सारखे खाणे, नवऱ्याने बायकोशी सौम्य वादावादी करणे, मध्येच बारा वर्षांच्या पोरीने आईच्या मांडीवर डोके ठेवून झोपणे हा चक्क भारतीय मासला इटालियन प्रवाश्यात दिसला. त्याची चेहरेपट्टी वेगळी, पण मोठ्याने बोलण्याची सवय आणि खादाडपणा आपल्यासारखा.

त्यामानाने जर्मन आणि फ्रेंच थोडे गंभीर. जर्मन प्रवासी बीअरचे घुटके मारीत होते, तर अमेरिकन प्रवासी कोक घेत होते. या साऱ्यांच्या पोषाखाच्या तऱ्हा काय वर्णाव्या ! युरोपीय मंडळी हल्ली पोषाखाची तमा बाळगत नाही. आधीच उल्हास आणि त्यात उन्हाळा ! त्याची गौरवर्णी धिप्पाड काया व लालबुंद चेहरे, निळे डोळे, विशाल स्तन आणि नितंब— भरघोस जीवनाचे चालते बोलते दर्शन होते ते !

आमच्याकडे दिसतात तसे राजकारणावर चर्चा करून चिंतातुर मुद्रेने जगाची काळजी करणारे आणि पुढे काय होणार याने खचलेले प्रवासी दिसले नाहीत. लहानपणी आम्ही कोकणात बोटीने जायचो. त्या प्रवासातील ती गलिच्छता, ओकाऱ्या, वळकट्या, केरसुण्या, रोवळ्या, पोराची रडारड,

बोटीची भयानक दोलायमान स्थिती याची आठवण येऊन आपण या युरोप-च्या समुद्रात बोटीत बसलो नसून परीच्या आणि राजकुमार यानी गजबजलेल्या तरत्या राजमहालात बसलोत की काय असे क्षणभर वाटले.



आमचा हा पाच तासाचा प्रवास पटकन संपला. माणसे पाहण्यात आणि निरखण्यात. बायको नको नको म्हणत असता मी तिला चॉकलेट आणि आइस्क्रीम दिले. युरोपमध्ये आइस्क्रीम ही एक नवलाची चीज आहे. चीज आणि आइस्क्रीम याची एवढी लयलूट जगात इतरत्र नाही.

चार वाजता आम्ही बेल्जमच्या किनाऱ्याला लागलो. या गावाचे नाव ऑस्टेंड. हे बाराही महिने मत्स्योद्योग केन्द्र म्हणून प्रख्यात आहे. बेल्जमच्या राजाचा राजवाडा इथेच आहे. आणि इथला समुद्रकिनारा मोठा रमणीय असल्यामुळे युरोपातील अनेक सागरप्रेमी लोक इथे उन्हाळ्यात गर्दी करतात. ऑस्टेंडचा समुद्रकिनारा तीन मैल लांब आहे. ऑस्टेंडला उतरताच बेल्जम कस्टम अधिकाऱ्यानी आमच्याकडे न पाहताच आम्हाला बाहेर पळा असा इशारा केला.

जॉनने आम्हाला बाहेर एकत्र केल आणि सांगितल की ' आपण आता युरोपात प्रवेश केलाय.' आम्ही बाहेर येताच आम्हाला इंग्लंड आणि बेल्जम यातील फरक चटकन जाणवला. लंडन जुनाट तर हे छोटेसे गाव

अत्याधुनिक, श्रीमतीच्या वैभवाची छटा दाखविणारे. जॉनने आम्हाला सांगितले की, 'आता आपली ही नवी बस—आणि हा आपला नवा ड्रायव्हर. याचे नाव ॲन्जेलो. हा इटालियन आहे. त्याला इंग्रजी येत नाही.' मग ॲन्जेलोने आम्हा सर्वांशी व्यक्तिश' येऊन हस्तांदोलन केले, आणि आम्ही बसमध्ये जागा पटकावल्या.

इथल्या बसेस म्हणजे एक आगळे प्रकरण. चारी बाजूंना अखंड काचा. त्यामुळे माना वाकड्या करण्याची गरज नाही. बसमध्ये उत्तम कार्पेट, मऊ आसने, रेडिओ, एअर-कन्डिशन्ड. बघत बसावी अशी बस. आवाज नाही, हिसका नाही, पेट्रोलचा वास नाही किंवा ब्रेकचा दणका नाही. नुसता तरंगत प्रवास करावा. डायरी घेऊन आरामात लिहावे. ऑस्टेंडहून आम्ही सात वाजता ब्रसेल्सला आलो.

ब्रसेल्स ही बेल्जमची राजधानी. आम्ही ब्रसेल्सला संध्याकाळी सात वाजता पोहोचलो सात वाजता अगदी दुपारचे दोन वाजल्यासारखे कडक ऊन. युरोपात रात्री नऊ वाजेपर्यंत ऊन असते. हॉलंडमध्ये रात्री साडे-दहाच्या सुमारास संध्याछाया दिसायला लागतात.

ब्रसेल्समधील आमचे हॉटेल प्रचंड पण जुन्या पद्धतीचे. ताज किंवा कलकत्त्याच्या ग्रेट इस्टर्न हॉटेलसारखे. आम्ही आमच्या खोलीच्या किल्ल्या ताब्यात घेतल्या आणि सामान वर टाकले. साडेसातला जेवण आणि नंतर लागलीच ब्रसेल्स शहर पाहण्याचा बेत. साडेसातला आम्ही जेवायला डायनिंग रूममध्ये आलो. सुमारे तीनशे-चारशे लोक तरी जेवायला आले असावेत. जेवण अत्यंत तापदायक. सूप, बटाट्याचा लगदा, सॅलड, ब्रेड, बीफ आणि पुडिंग. आम्ही ते कष्टाने पोटात रिचवले आणि ब्रसेल्स पाहण्यासाठी बाहेर पडलो.

१९६८ साली मी युरोपात आलो होतो तेव्हा माझा मुक्काम होता ॲंटवर्पला. तेथून ब्रसेल्सला मी माझे मित्र गोवर्धन मपारा यांना भेटायला आलो होतो. आज मपारांची आठवण आली. मपारा गेल्या वर्षी वारले आणि त्यांची पत्नी जर्मनीत कुठे तरी असते. असो.

ब्रसेल्स ही बेल्जमची राजधानी. पण जवळजवळ साऱ्या युरोपची ती राजधानी आहे. अमेरिकेच्या आर्थिक आक्रमणाला तोंड देण्यासाठी म्हणून युरोपातील सगळी राष्ट्रे एकत्र झाली आणि त्यांनी युरोपचे संभाव्य राजधानीपद ब्रसेल्सला देण्याचे ठरविले आहे. सुमारे दहा लाख लोकवस्तीचे

हे शहर युरोपातील एक देखणे, प्रेक्षणीय शहर. पण ते नुसतेच प्रेक्षणीय नाही तर आतरराष्ट्रीय जगात त्याचे स्थान फारच वेगळे आणि वरचे आहे. जगातील बहुतेक सर्व महत्त्वाच्या आतरराष्ट्रीय परिषदा ब्रसेल्सला भरल्या आहेत. नाटो आणि कॉमन मार्केट याची मुख्य कचेरी ब्रसेल्सला आहे.

ब्रसेल्सला आम्ही राजाचा राजवाडा पाहिला. पण प्रवाश्याचे खरे आकर्षण म्हणजे ग्रॅन्ड प्लेस हा चौक. हा चौक रात्री पाहण्यात खरी गमत. कारण हा सारा चौक प्रकाशाने उजळून गेलेला असतो. युरोप-मधल्या सर्व प्रमुख शहरात असे भव्य चौक आहेत. त्यात ब्रसेल्सच्या या चौकाची गमत वेगळीच. टाउन हॉल आणि त्याच्या समोरच गॉथिक चर्च हे रात्रभर प्रकाशाने उजळलेले असते. आमच्यासारखे शेकडो प्रवासी त्या चौकात जमा झाले होते.

ब्रसेल्समधील आणखी एक अवश्य पाहण्यासारखी गोष्ट म्हणजे ' मॅनेकेन पिस '. मॅनेकेन पिस म्हणजे एक सात वर्षांच्या नग्न मुलाचा पुतळा. हा मुलगा चक्क लघवी करतोय असा तो पुतळा आहे. हा सतराव्या शतकातला पुतळा. हा पुतळा पाहण्यासाठी देशोदेशीचे प्रवासी येथे गर्दी करतात. माझ्या घरी या पुतळ्याची प्रतिकृती आहे. त्यामुळे सौ.ला हा पुतळा प्रत्यक्ष पाहण्याची उत्सुकता होती. हा सहा फूट उचीचा पुतळा कोणाचा याची खरी माहिती अज्ञात आहे. कोणी म्हणतात ब्रसेल्समधील एका धनवान गृहस्थाचा मुलगा हरवला. त्याने शेवटी जाहीर केले की माझा मुलगा गावात ज्या ठिकाणी ज्या अवस्थेत सापडेल त्या ठिकाणी मी त्याचा तसाच पुतळा उभारीन. शेवटी या चौकात हा मुलगा सापडला तो या पोजमध्ये. ही दतकथा ब्रसेल्समध्ये लोकप्रिय असून प्रत्येक दुकानात हे छोटे पुतळे विकत मिळतात.


पण बेल्जमचे खरे वैशिष्ट्य म्हणजे तेथील काचसामान आणि लेस वर्क म्हणजे कशिदाकामाचे नमुने. या चौकात त्याची रागेने मोठमोठी दुकाने आहेत. त्यात ड्रेस मटीरिअल, टेबल क्लॉथ, झगे, पडदे याच्यावर बारीक कशिदा केलेले शेकडो नमुने. आणि किंमत काय तर १०० रुपयापासून तो दहा हजार रुपयापर्यंत.आम्ही कशिदा डोळे भरून पाहिला. आम्हीच काय पण आमच्याबरोबरच्या अमेरिकन प्रवाशाची ताकद नव्हती ते विकत घेण्याची, त्यामुळे थोडे बरे वाटले.

हे विंडो शॉपिंग करून आम्ही रात्री दीडला परतलो आणि चटकन

निद्रेच्या आधीन झालो. कारण जॉनने सकाळी सातला तयार होण्याचा आदेश दिला होता.

. ८ .

# मुलाफुलांचा देश




सकाळी सहा वाजता टेलिफोन खणखणला. आम्हाला उठविण्यासाठी हा 'वेक कॉल' होता. सात वाजता ब्रेकफास्ट उरकून बरोबर पावणेआठ वाजता आम्हाला प्रवासाला निघायचं होतं. युरोपमध्ये पाण्याची टंचाई नाही. टंचाई आहे ती पिण्याच्या पाण्याची. दहा वर्षांपूर्वी मी जेव्हा

युरोपात आलो होतो तेव्हा उपाहारगृहांतून पिण्याच्या पाण्याचा ग्लास दिसत नसे. या वेळच्या प्रवासात पिण्याचं पाणी—निदान प्रमुख शहरात—दिसलं. पू. जर्मनी, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया या कम्युनिस्ट राष्ट्रात तर पाण्यापेक्षा बीअर पिण्याचं प्रमाण जास्त. लोक सकाळपासूनच बीअर प्यायला सुरुवात करतात. बीअर अथवा वाइन हीच जेवताना प्यायची. अजून तेथे हीच परिस्थिती आहे. पण बिगर कम्युनिस्ट राष्ट्रात आता अमेरिकन प्रवाश्याचे प्रमाण वाढल्यामुळे पिण्याच्या पाण्याची आणि कोकची सुबत्ता दिसू लागली आहे. आम्ही झटकन आघोळ-कपडे करून खाली ब्रेकफास्टसाठी आलो. ब्रेकफास्ट म्हणजे काय, तर दोन पाव, लोणी, चीज आणि दोन दोन कप चहा. दुपारी वाटेत स्वतःच्या खर्चाने लंच घ्यायचे असल्यामुळे सर्वांनी ते दोन पाव, लोणी, चीज आणि दोन दोन कप चहा याचा फडशा पाडला. आठ वाजता आमच्या प्रवासास सुरुवात झाली. आमची ही आलीशान मोटार म्हणजे एक तरंगते जहाज होते म्हणाना. गाडी सुरू झाल्यावर जॉनने गुड मॉर्निंग करून आपली रनिंग कॉमेंटरी सुरू केली. तो म्हणाला, 'आपण आता युरोपातील एका सधन आणि समृद्ध राष्ट्रातून प्रवास करतोय. वाटेत आपल्याला अँटवर्प हे शहर लागणार आहे. (अडुसष्ट साली मी अँटवर्पला मुक्काम केला होता. अँटवर्प ही जगातील हिऱ्याची सर्वांत मोठी बाजारपेठ. पालनपूरचे हिऱ्याचे अनेक व्यापारी इथे याच व्यापाराच्या निमित्ताने स्थायिक झाले आहेत.) अँटवर्प हे उत्तम बंदर आहे. बेल्जमची एकूण क्षेत्रमर्यादा अकरा हजार चौरस मैल एवढी आहे. आणि लोकसंख्या अवघी १० लाख आहे. पण बेल्जम फ्रँक हा अमेरिकन डॉलरपेक्षा स्ट्राँग आहे. बेल्जममध्ये फ्रेंच भाषा सर्वत्र बोलली जात असली तरी त्याची अधिकृत भाषा फ्लेमिश ही आहे. फ्रेंच भाषेचे हे वर्चस्व हटवण्यासाठी आपल्याकडील शिवसेनेसारखी चळवळ तेथे चालू आहे. आणि या चळवळीत उत्तर बेल्जमच्या लोकांचा जास्त भाग आहे. युरोपात प्रत्येक राष्ट्रात उत्तर आणि दक्षिण यांच्यात मोठा संघर्ष आहे. उत्तरेचे लोक आपल्याला जास्त उच्च दर्जाचे मानतात. ही परिस्थिती फ्रान्स, इटली, जर्मनी आदी सर्व राष्ट्रात मोठ्या तीव्रतेने आढळते. उत्तरेकडचे लोक सधन, समृद्ध, भूमिसंपन्न. त्यामानाने दक्षिणेतील लोक दरिद्री. कष्टाळू. उत्तरेकडे मोलमजुरीसाठी जाणारे. त्यामुळे उत्तर बेल्जममध्ये फ्लेमिश भाषाच बोलली जाते. उत्तरेत सर्व फ्रेंच पाट्या काढल्या गेल्या असून त्याऐवजी

फ्लेमिश भाषेतील पाट्या लावण्यात आल्या आहेत. गावाची नावे पूर्वी फ्रेंच होती ती सपूर्ण बदलली असून त्याऐवजी आता फ्लेमिश नावे आली आहेत. उदाहरणार्थ, पूर्वीचे अँटवर्प आता अँटवर्पेन, ब्रगस् हे ब्रग, इप्रेसचे इपेर असे नामातर झाले आहे. उत्तर-दक्षिणेमधील हा भाषिक लढा फार तीव्र संघर्षाला पोचला आहे. १८९८ साली बेल्जममध्ये द्विभाषिक तत्त्वाला मान्यता देण्यात आली होती. आता या शिवसेनाटाइप चळवळीमुळे बेल्जमचे द्विभाषिक रूप गेले असून उत्तरेत फ्लेमिंग आणि दक्षिणेत फ्रेंच भाषेचे वर्चस्व उरले आहे. मात्र ब्रसेल्सची परिस्थिती मुंबईसारखी आगळी असल्यामुळे त्याचे द्विभाषिक स्वरूप अजून कायम आहे.

आम्ही ब्रसेल्सहून 'अँटवर्पेन', तेथून हॉलंडमध्ये शिरलो. बेल्जमपेक्षा हॉलंडचे रंगरूप फारच वेगळे आहे. युरोपमधील रस्ते इतके रुंद— छान आहेत की, आम्ही मोटरीत बसलो नसून विमानातच बसलो आहोत




असं वाटत होतं. या रस्त्याच्या कडेला हिरवीगार शेते आणि हॉलंडमधल्या धष्टपुष्ट गाईंची प्रचंड खिल्लारे. गाई आणि बाई यापैकी गाईकडे पाहात बसावं असा देखणेपणा या जनावरात होता. युरोप हा धनधान्य आणि

दूधदुभत याच कोठारच आहे म्हणा ना. आम्ही या रस्त्याने हाग, रॉटरडॅम या मार्गे अम्स्टरडॅमला निघालो. वाटेत एका मोटलमध्ये जेवणासाठी थांबलो. इथ आम्ही आमचे पौंड डच नाण्यात बदलून घेतले. आम्ही 'चेंज ब्यूरो'मध्ये पौंड दिले आणि त्याने ज्या काही नोटा आणि नाणी दिली ती बिनतक्रार घेतली. त्याची नक्की किंमत काय याच्यासाठी अर्धा तास डोक्याला शीण दिला. पण कॉफी, सँडविच, ऑमलेट, कोक यासाठी आम्हाला माणशी पन्नास रुपये खर्च आला. जॉन म्हणाला 'मी तुम्हाला फारच स्वस्त ठिकाणी आणल.' पॅरिसला किंवा स्वित्झर्लंडमध्ये याच लंच पॅकेटला १० डॉलर्स म्हणजे शमर रुपये पडतात आणि चागले जेवायला माणशी पन्नास डॉलर्स म्हणजे ५०० रुपये पडतात. त्याचा हा जेवणाच्या खर्चाचा अदाज ऐकून लंच घेतल्यावरही अमेरिकन प्रवाश्यासकट आम्हा सर्वांचे डोळे पादरे झाले. आमची यात्रा कपनी आम्हाला ब्रेकफास्ट आणि डिनर देण्यास बाधलेली. यामुळे दुपारचे लंच हे असेच फराळावर भागविण्याखेरीज गत्यतर नाही असा सर्वांचा निर्णय झाला.

आमचा हा खर्चिक फराळ आटोपून आम्ही दुपारी तीनच्या सुमारास अम्स्टरडॅमला आलो. अम्स्टरडॅम हॉलंडची गेल्या सातशे वर्षांची राजधानी. अम्स्टरडॅम हे युरोपातील सर्वांत मोठे बदर. हे शहर म्हणजे कालव्याचे शहर. शहरातील कालव्याची एकूण लाबी पन्नास मैल असून यामुळे शहरात एकूण वेगवेगळी ७० बेटे तयार झाली आहेत. आणि या बेटांना जोडण्यासाठी एकूण ५०० पूल बाधण्यात आले आहेत. त्यामुळे आपल्याकडे गावात हिंडायला टांगे, टॅक्सी त्याप्रमाणे इथे या भागातून त्या भागात जायला बोटींचा वापर करतात. पण या बोटी इतक्या आकर्षक असतात की काही विचारू नका. आम्ही दुपारी इथं गावात एका बोटीतून चक्कर मारली. बोटीचा कप्तान हा मोठा विनोदी गृहस्थ होता. त्याने विनोदपूर्ण शैलीत आम्हाला गावाच मोठ गमतीदार वर्णन केल आणि सार गाव दाखवल. अम्स्टरडॅम, रॉटरडॅम ही दोन शहरे म्हणजे चित्रकलेची माहेरघरे. अम्स्टरडॅमला रेमब्रांदची परपरा, तर रॉटरडॅममध्ये रूबेन हा ख्यातनाम चित्रकार राहात असे. मागच्या भेटीच्या वेळी मी रॉटरडॅमला रूबेनच घर पाहिल. त्या घराच आता सरकारन म्युझियम केल असून त्यात रूबेनची ख्यातनाम पेंटिंग्जस् ठेवली आहेत. रॉटर-डॅमला व्हॅनगॉग, पिकासो याच्या दुर्मिळ कलाकृती पाहावयास मिळतात.

पण अम्स्टरडॅम हे हॉलंडचे सांस्कृतिक केन्द्र आहे. जूनच्या दुसऱ्या आठवड्यात येथे हॉलंड फेस्टिव्हल भरवण्यात येतो. युरोपमधला हा एक आगळा नयनोत्सव. डच नाटक, संगीत, नृत्य, याची ही महापर्वणी असते.

आम्ही दुपारी सहल आटोपून येथून पंचवीस एक मैलावर असलेल्या एका टुमदार डच खेड्याला भेट दिली. टुमदार या शब्दाचा खरा अर्थ काय असतो हे त्या दिवशी मला कळल. या अत्यंत स्वच्छ, नीटनेटक्या, रंगीबेरंगी घराची रचना पाहून आपण एखाद्या स्टुडिओतल्या सेटला भेट देतोय असे वाटले. युरोप हा मुलफुलाचा देश. या भ्रमतीत एक घर किंवा गात्र आम्हाला दिसल नाही की जिथ रंगीबेरंगी फुलाची आरास नाही! प्रत्येक घरातील काचेच्या तावदानातून दिसतात ती फुले आणि या फुलाच्या माडणीत प्रत्येकजण एकमेकाशी स्पर्धा करतोय अस वाटल. शहरात तर



जागोजाग जिथ मोकळी जागा दिसेल तिथ हिरवळ आणि फुलाचे चित्तवेधक ताटवे. हॉलंडच राष्ट्रीय फूल म्हणजे ट्यूलिप. या इवल्याशा फुलाचा या राष्ट्रातील नागरिकाना अभिमान आहे. त्यामुळे हॉलडचा युरोपातील मुलफुलाचा देश असा सदैव गौरव केला जातो. त्यामुळे या समुद्रकिनाऱ्यावर असणाऱ्या गावातील ही फुलाची पखरण पाहून गमत वाटली. आम्ही गावात एका वृद्ध डच बाईकडे गेलो. ८१ वर्षांची ही म्हातारी मोठी विनोदी होती. तिन विशिष्ट प्रकारचा डच पोषाख केला होता. तिच

घर म्हणजे गमत होती. तिची बेडरूम म्हणजे भिंतीतील एक मोठा कोनाडा. तिने आम्हाला स्थानिक डच वाइन दिली आणि त्या कोनाड्याकडे बोट दाखवून म्हणाली, ' पाहिलात हा मोठा कोनाडा ? ही माझी बेडरूम.' मग हळूच म्हणाली, ' ही मोठी भाग्यशाली बेडरूम आहे. कारण इथच मला अकरा मुलं झाली.' हे रमणीय गाव पाहून आम्ही वाटेत एका चीज फॅक्टरीत आलो. हॉलंडमध्ये दूधदुभत्याचा सुकाळ. त्यामुळे हॉलंडमधील चीजला आतरराष्ट्रीय बाजारपेठेत चिकार मागणी आहे. चीज कसे करतात याचे आम्ही प्रात्यक्षिक पाहिलेच, पण नाना तऱ्हेच्या चीजचे नमुने पाहिले आणि चाखले.

हा सारा प्रवास आटोपून आम्ही सहा वाजता आमच्या ' हॉलिडे इन ' या पचतारांकित हॉटेलात आलो. चीजची फॅक्टरी पाहून चीज ही उपासाला खाण्याजोगी चीज नाही हे सौ.ला कळले. कारण चीज तयार करताना त्यात आतड्याचा अर्क घालतात हे कळताच तिने चीज न खाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे रात्री डिनरला टेबलावर डच चीज येताच तिने ते बाजूला सारले.

युरोपातील अम्स्टरडॅम, रॉटरडॅम, हॅंबर्ग ही बदरे म्हणजे हौशी प्रवाश्यांची रगेल उपवने. या शहरातील नाइट लाइफ अकल्पित असे आहे. या शहराच्या तुलनेने आमचे मुबई शहर म्हणजे काशीसारखे पवित्र मानावे लागेल. हॅंबर्ग, अम्स्टरडॅम येथील वारागना या साऱ्या युरोपखडात प्रख्यात आहेत. तेथील नाइट क्लब्स आणि कॅसीनो म्हणजे जुगाराचे अड्डे याना रात्रीचा अत माहीत नाही. युरोपातील धनिक मडळी इथ एका रात्रीत सहज गमत म्हणून लाख दोन लाख रुपये सहज हरतात. आम्ही रात्री आमच्या बसमधून रात्रीचे अम्स्टरडॅम पाहायला निघालो. दिव्यांची रोषणाई ही तर नेहमीचीच गोष्ट. तिथ पॉवर कट ही भानगड नाही. त्यामुळे सारं शहर नुसत रंगीबेरंगी प्रकाशात न्हाऊन निघालेलं असत. आमच्या मार्गदर्शकाने शहरातील महत्त्वाची ठिकाणे तर दाखवलीच पण आम्हाला वारागनांची वस्ती असणाऱ्या एका वस्तीतून फिरवले. या वेश्या असतात तरी कशा हे पाहण्याची सर्व स्त्रीपुरुषाना उत्सुकताही होती. त्यांच्या घराच्या प्रचड काचेरी तावदानातून त्या दिसत होत्या. निदान त्या सगळ्या दिसायला देखण्या आहेत असं सर्वांचं मत झालं. पण आमचा गाइड म्हणाला, ' या बाया फार कॉस्टली आहेत. काहींचे दर एक हजार

रुपयापासून ते पाच हजार रुपयापर्यंतचे आहेत. आहे का कुणाला इंटरेस्ट ?'

जॉनच्या या माहितीमुळे मोटरीतील स्त्री-वर्ग फार खूष झाला. कारण आपल्या नवऱ्याची एवढी हिंमत नाही हे त्यांना ठाऊक होते. एक अमेरिकन बाई म्हणाली, 'गेरीला जायचं असेल तर माझी हरकत नाही.' गेरी म्हणजे तिचा नवरा. अर्थात गेरी बिचारा चूप बसला होता.

युरोपातील हे गमतीदार शहर. त्यातील रोषणाई, नाइट क्लब्स, द्यूतगृहे याना धावती भेट देऊन आम्ही रात्री बारा वाजता हॉलिडे इनवर परतलो.

• ९ •

# जर्मनीत

सकाळी साडेसहाला उठलो. पाऊण तासात आंघोळ वगैरे आटोपून ब्रेकफास्ट घ्यायला खाली जायचे होते. युरोपातील सर्वत्र ब्रेकफास्टची तऱ्हा एकच. पाव, लोणी, जाम आणि चहा. पण दुपारी स्वतःच्या पैशाने लंच घ्यायचं असल्यामुळे प्रत्येकजण पावावर हात मारीत होता. आमच्या समोर बसलेल्या एका अमेरिकन बाईने आपल्या पर्समध्ये पाव, चीज आणि जामची पाकिटं कोंबली. अमेरिकन बायकांचे हे भारतीय वळण पाहून




बरं वाटलं. तिच्यापासून स्फूर्ती घेऊन सौभाग्यवतीने भीतभीत दोन चीजची पाकिटं (पाकिट म्हणजे आगपेटीच्या आकाराची) बॅगेत टाकली. शेवटी लक्षात आलं की, हा उद्योग प्रत्येकजण सभावितपणे करीत होता.

आमच्या शेजारी एक अमेरिकन शाळामास्तर आणि त्याची आई होती. आई पन्नाशीची तर मुलगा तिशीचा. पण मुलगा आईची फारच माया करीत होता. बाई तरुण वयात फार देखणी असावी. आणि अजूनही आपण दिसायला बऱ्या आहोत असं तिला वाटत होत. त्यामुळे ती अधून-मधून पर्समधून आरसा काढून आपल्या साजशृंगाराला जपत होती. आमच्या या चाळीस सहप्रवाश्यांपैकी एक जोडपे होते न्यूझिलंडचे. रिटायर्ड पोस्ट मास्तर आणि त्याची बायको. हा पोस्ट मास्तर मूळचा लंडनचा. त्याचा बाप लंडनमध्ये पोलीस हवालदार होता. दोन जोडपी अशी होती की त्यातील नवरा-बायको दोघानीही दुसऱ्यादा लग्ने केली होती. त्यांतला एक चक्क पासष्ट वर्षांचा म्हातारा. पण तो अगदी पंचविशीतील तरुणा-प्रमाणे आपल्या पन्नाशीच्या तरुण बायकोला जपत होता. एक अमेरिकन तरुण सेल्समन आणि त्याची मॉटेसरी शिक्षक प्रेयसी लग्नापूर्वीच हनीमूनला निघाली होती. एक निग्रो जोडपेही कॅमेरा घेऊन सगळीकडे लुडबुडत होते. एक कॅनाडियन जोडपे आमच्या मित्रपरिवारात जमा झाले. त्याच्या बायकोबरोबर माझी बायको इंग्रजीतून संभाषण करू लागली. युरोपातील प्रवासाचा हा एक तोटा. याशिवाय नवरा-बायको याची लठ्ठपणात स्पर्धा लागावी अशी दोन लालबुंद जोडपी होती. एक म्हातारी ऑस्ट्रेलियाहून आपल्या अविवाहित टेनिसपटू मुलीला घेऊन आली होती. याशिवाय तीन स्त्रिया एकट्याच होत्या. त्यापैकी दोन फ्रेंच आणि एक इंग्रजी बाई. आमचा नास्ता आटपून आम्ही अम्स्टरडॅम येथील एका हिऱ्याला पैलू पाडणाऱ्या ख्यातनाम कारखान्यात गेलो. कारखान्यातील एका चलाख तरुणीने आम्हाला प्रथम हिऱ्याना पैलू पाडणाऱ्या एका कारखान्याची फिल्म दाखवली. त्यानंतर ती आम्हाला कारखान्यात घेऊन गेली. हिऱ्याला पैलू पाडण्याचे काम बेल्जम आणि हॉलंडमध्ये होते. त्यात अर्थात बेल्जमच्या कारागिरीची सफाई विशेष. हिऱ्याना पैलू पाडण्याच्या क्रियेत आम्हाला फारसा रस नव्हता. आम्हाला हिऱ्याचे दागिने पाहावयाचे होते. त्यानंतर एका मोठ्या आलिशान दिवाणखान्यात आम्ही प्रवेश केला. त्या ठिकाणी वेगवेगळ्या काउंटर्सवर हरतऱ्हेचे दागिने होते. त्यात अंगठ्या आणि नेकलेस याचाच भरणा फार होता. युरोपात हिऱ्याना प्लॅटिनमचे कोंदण असते. प्लॅटिनम हा धातू सोन्यापेक्षा महाग. युरोपियन स्त्रियाना सोन्याचे फारसे कौतुक नाही. आमच्या ग्रुपमध्ये फक्त माझ्याच बायकोच्या हातात



ग्रंथ संग्रहालय ठाणे

ठसठशीत सोन्याच्या बागड्या होत्या. हिऱ्याचे ते वेगवेगळे दागिने पाहून डोळे निवले आणि किमत ऐकून डोळे फिरले. अर्थात एक-दोन अपवाद सोडल्यास बाकी सर्वांनी आपल्या डोळ्याचे पारणे फेडून घेतले.

अॅम्स्टरडॅमहून आम्ही जर्मनीच्या वाटेला लागलो. हॉलंड हा दूधदुभत्याचा देश, तर जर्मनी हा हिरव्या वनश्रीने नटलेला देश. आम्ही ऱ्हाइन नदीवर एका बोटीत शिरलो आणि आमचा जलविहार सुरू झाला. बोटीच्या डेकवर शेकडो उतारू बसले होते. बीअर पिणे, चहा-कॉफी, चॉकोलेट याचाही मारा चालू होता. जर्मनीतील हाईनकेन बीअर ही युरोपातील सर्वोत्कृष्ट बीअर. ऱ्हाइन नदीच्या काठाला लागून एकूण ४२० मैल लांबीच्या या किनारपट्टीवर दोन्ही बाजूचा देखावा म्हणजे एक अविस्मरणीय निसर्गचित्र आहे. वाटेत मैल-मैल लांब विन यार्डस् म्हणजे मद्यनिर्मितीचे द्राक्षमळे होते. युरोपियन लोक आपल्यासारखे मुखशुद्धीसाठी जेवल्यावर द्राक्षे खात नाहीत. जर्मनी आणि इटली यातील विन यार्डस् प्रख्यात. इटलीला या संदर्भात प्रतिस्पर्धी म्हणजे फ्रान्स. पण जर्मनी हा देश युरोपातील एक आगळ्या प्रकृतीचा देश. जर्मनीतही उत्तर आणि दक्षिण याच्यात फार मोठी स्पर्धा आहे. उत्तरेचे लोक आपल्याला मोठे उच्च समजतात. इतकेच नव्हे तर आपली जर्मन भाषा ही दक्षिणेपेक्षा अधिक शुद्ध असा त्याचा दावा आहे. जर्मन करन्सी ही युरोपातील एक स्ट्राँग करन्सी. युरोपात डॉलरला कोणी विचारीत नाही पण जर्मन म्हणजे डॉश मार्कस् ही करन्सी फारच स्ट्राँग. जर्मनीतील रस्ते हे दृष्ट काढण्यासारखे. युरोपात जर्मनीसारखे हायवे अन्य कोणत्याही देशात नाहीत. मी १९६८ साली पूर्व जर्मनीचा ग्रामीण भाग पाहिला आणि दहा वर्षांनी प. जर्मनीचा ग्रामीण भाग पाहण्याचा योग आला. ऱ्हाईन नदीच्या काठाकाठाने जर्मनीतील जुने ऐतिहासिक किल्ले आणि वाडे दिसतात. त्यातल्या काहींची आता विश्रामस्थाने आणि हॉटेले झाली आहेत. जर्मनीत एकूण हायवेंची लांबी चार हजार मैल आहे. हिटलरने दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीच या ऑटोबान्सची आखणी केवळ युद्धसाहित्याच्या वाहतुकीचा प्रश्न समोर ठेवून केली. त्यामुळे एकाच वेळी रस्त्यावर चार वाहने या बाजूने आणि चार वाहने दुसऱ्या बाजूने जाऊ शकतात. या रस्त्याना वाटेत उपरस्ते आणि फ्लायओवर्स शेकड्यानी मिळतात. पण कोणत्याही ठिकाणी गाडी थांबविण्याची गरज नाही. कारण प्रत्येक ठिकाणी ओव्हरहेड ब्रिज बांधले गेले

आहेत.

उत्तर जर्मनीचे पठार हे फार सुपीक आहे. पण या जर्मन लोकांचे वैशिष्ट्य असे की, रस्त्याच्या कडेने दिसणाऱ्या डोंगराचा इंचन इंच भाग लागवडीखाली आणला होता. एकही बोडका डोंगर किंवा पडिक जमीन औषधाला दिसली नाही. सार कस हिरवगार. जर्मन राष्ट्राची आर्थिक व्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. डेअरी आणि शेती, तसेच सागरी बंदरे, मासेमारी, यंत्रसामग्री, केमिकल्स, कॅमेरे, बीअर या उत्पादनात जर्मन उद्योजकांना स्पर्धा करणारा देश युरोपात नाही. हॅम्बर्ग हे जर्मनीतील एक सर्वात मोठे बंदर आणि रंगेल शहर. गेल्या महायुद्धात एका रात्रीत हॅम्बर्ग-मधील एक लक्ष नागरिक बेघर झाले ते हॅम्बर्ग आता विश्वास बसणार नाही इतके टुमदार शहर झाले आहे. फ्रॅंकफर्ट हे युरोपातील एक गजबजलेले शहर.

जर्मनीतील ब्लॅक फॉरेस्ट हा रोमॅन्टिक एरिया आहे. घनदाट जंगल, रम्य वनश्री, धबधबे, फेसाळलेले ओढे, डौलदार निळ्या डोळ्याच्या दृष्ट लागतील अशा रूपवती जर्मन नवयौवना— नंदनवन कसं असेल याचं उत्तर सापडत ते इथं. इथले लोक म्हणजे गमत आहे. जर्मन स्त्रिया आणि विशेषतः [illegible] आणि ग्रमती लोक तर [illegible]

फारच कष्टाळू. जर्मनीतील कारकुनाला दरमहा सरासरी पगार मिळतो साडेबारा हजार, तर अमेरिकेत कारकुनाला सरासरी दरमहा मिळतात सहा हजार. यातील २८ ते ३० टक्के रक्कम प्राप्तिकरात जाते. युरोपात आयकरात पहिला क्रमांक ब्रिटन, दुसरा हॉलंड, आणि तिसरा जर्मनीचा आहे. जर्मन कामगार हे जगातील सर्वांत आदर्श कामगार. ते प्रथम विचार करतात आणि मग संपावर जातात. प्रथम विचार असतो तो राष्ट्रहिताचा. त्यामुळे तुलनेने पाहिल्यास आज जर्मनीत एकूण १६ कामगार संघटना आहेत. तर ब्रिटनमध्ये त्याची संख्या ११२ आहे. तीन वर्षांतून एकदा गुप्त मतदानाने युनियनच्या निवडणुका होतात. त्यांच्या सेक्रेटरीला कंपनीतर्फे स्वतंत्र कचेरी असते. आणि कारखान्याच्या व्यवस्थापनात आणि योजना आख-ण्यात युनियनला सहभागी करून घेण्यात येते.

जर्मनी काय किंवा युरोपातील अन्य कोणतेही राष्ट्र काय, तेथील राहणी [illegible] नाही. मग आमची काय कथा!

[illegible]

बऱ्यापैकी हॉटेलात (अशोका, ताज नव्हे) राजचे किमान १५० रुपये

द्यावे लागतात. दुपारचं साधं जेवण घ्यायचं तर ७५ रुपये पडतात. स्कॉच व्हिस्की नव्वद रुपयाला मिळते. (इटलीत हीच व्हिस्की ४५ रुपयांना मिळते.) जर्मन कॅमेरा, ट्रक्स, ट्रॅक्टर्स आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे जगात सर्वोत्कृष्ट. हवा अगदी इंग्लंडसारखी. हिवाळ्यात बर्फ पडतो तर जुलैमध्ये मुंबईसारखी हवा. (अर्थात दमट नाही.) जर्मनी आपल्याला लागणाऱ्या धान्यापैकी ८० टक्के धान्य स्वतः उत्पादन करते. पंचवीस टक्के लोक शेतीत गढलेले आहेत. शेत लहान पण किमान पंचवीस एकराचे. जर्मन लोक हे युरोपातील सर्वांत जास्त बटाटे खाणारे लोक. युरोपात जर्मनीएवढं बटाट्याचं उत्पादन अन्य कोणत्याच देशात होत नाही. त्याखालोखाल विनयार्ड-म्हणजे द्राक्षमळे. यासाठी १५० हजार एकर जमीन लागवडीखाली आहे. जर्मनीत परदेशी कामगारांचा सुळसुळाट आहे. एकूण २० लाख परदेशी कामगार जर्मनीत आहेत. त्यात स्पॅनिश आणि इटालियन लोकांचा जास्त भरणा आहे. या लोकांची स्वतंत्र उपाहारगृहे आहेत आणि ते एकत्र स्वतंत्रपणे राहतात. जर्मन लोक या इटालियन आणि स्पॅनिश लोकांचा फार द्वेष करतात. त्यामुळे आता वर्क परमिटची पद्धत सुरू झाली आहे. या वर्क परमिटशिवाय चोरून अनधिकृतपणे काम करणाऱ्या कामगारांची पिळवणूक होते हे सांगणे नको.

जर्मनीतील कोळशाच्या खाणी या राष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेत फार महत्त्वाच्या. उत्तर जर्मनीत ऑइल फिल्डस् आहेत. क्रुप्स कंपनीचे उत्पादन जगातील चौथ्या क्रमांकाचे. त्यात अमेरिका, नंतर रशिया, जपान आणि चौथा क्रमांक जर्मनीचा. जर्मनीत आठ कामगारांपैकी एक कामगार हा इंजिनियरिंगमध्ये असतो. युरोपात जर्मनी हे मोटर बनविण्याच्या धंद्यात दुसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र आहे. ओपेल, मर्सिडीज आणि व्हॉक्सवॅगन या जर्मनीच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या गाड्या. मर्सिडीज गाडी असणे हे अमेरिकेतही आता श्रीमंतीचे आणि प्रतिष्ठितपणाचे लक्षण समजले जाते. पण युरोपात आणि जगात व्हॉक्सवॅगन या छोट्या गाडीला सर्वत्र मागणी आहे. कॅमेरा, दुर्बिणी आणि मायक्रोस्कोप यांच्या उत्पादनात जर्मनीला मागे टाकणारा अन्य देश नाही. केमिकल, फर्टिलायझर आणि फार्मसी यातही जर्मनी आघाडीवर आहे.

जर्मन लोक हे विलक्षण मनमोकळे आणि गमती. युरोपात त्यांच्याएवढे दारुडे सापडायचे नाहीत. बीअर हे जर्मनीचे राष्ट्रीय पेय आहे. जर्मनीत

प्रत्येक गावाची स्वतःची ब्रुअरी दारू गाळण्याची फॅक्टरी असते. त्याचा प्रत्येकाचा एक सीक्रेट फॉर्म्युला असतो. जर्मनीची व्हाइट वाइन ही जगातील सर्वोत्कृष्ट वाइन. ऱ्हाइन नदीच्या काठावर फिकट रंगाची तर मोझे नदीच्या काठी हिरव्या रंगाची वाइन तयार होते. जर्मन लोक तपकिरीचे नादिष्ट आहेत. बीअर प्यायची, तपकीर ओढायची, त्यावर ' चेसर ' म्हणून स्कॉच व्हिस्की कच्ची घ्यायची, आणि परत बीअर सुरू करायची. नाचायच, गायच. जर्मन लोकाचा फावल्या वेळचा हा उद्योग. सध्याकाळी कोणत्याही जर्मन खेड्यात जा, तुम्हाला बीअर पिण्याच्या आणि नृत्याच्या कार्यक्रमात सहभागी झाल्याशिवाय गत्यतर नाही.




अशा या जर्मनीत आम्ही ऱ्हाइन नदीच्या काठाने चाललो होतो. जनता बीअरचे प्याले रिकामे करीत होती. कुणालाच उद्याची काळजी नव्हती.

. १० .

# ब्लॅक फॉरेस्ट

ऱ्हाइन नदीच्या काठान बोटीतून प्रवास करीत असता जर्मनीच्या सपन्न ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. नदीच्या दोन्ही बाजूच्या डोंगरमाथ्यावर



जर्मनीचे ऐतिहासिक किल्ले आहेत. या किल्ल्याच आता मोठमोठ्या राज-

विलासी विश्रामधामात रूपांतर करण्यात आल आहे. त्यांतल्या एका हॉटेलात — त्याचे नाव हॉटेल ड्रेअनर— जर्मन हुकूमशाहा हिटलर वारवार येऊन राहात असे. एका ठिकाणी एका जर्मन काउंटने आपल्या किल्ल्याला माउंट कॅसल अस नाव दिल्यावर त्याच्या शेजारच्या काउंटनं आपल्या किल्ल्याला रॅट कॅसल अस नाव दिल. जर्मन सरदार हे आमच्या कोल्हापुरी पाटलाप्रमाणे एकमेकांशी स्पर्धा करण्यात प्रवीण होते. बोटीचा चारएक मैल प्रवास झाल्यावर बोटीवर लोकसंगीताचे स्वर घुमू लागले. बोटीच्या कप्तानाने आम्हाला सांगितले की या ठिकाणी पूर्वेला रात्रीच्या वेळी एका तरुणीचे पिशाच्च यायचे आणि ती गाऊ लागली की तिच्या गाण्यामुळे खलाशाचे भान सुटून त्या खडकावर बोट आपटायची आणि सर्वांना जल-समाधी मिळायची. त्यातून या ' लोअर लाय ' गाण्याचा जन्म झाला आणि आज या खडकापाशी कोणतीही बोट आली की ' हे ' लोकगीत खलाशीलोक साधिक रीत्या गातात.

आमची ही बोटीची थोडीशी लांबलेली सफर आटोपून आम्ही कलोनला आलो. कलोनला हवा चांगलीच थंड होती. आमची बस कलोनच्या ख्यात-नाम कॅथेड्रलपाशी येऊन थांबली. आम्ही कुडकुडत आत शिरलो. हे जगा-तील एक प्रचंड गॉथिक स्टाइलच कॅथेड्रल. यातील मोझेईक काम पाहण्या-सारख आहे. युरोपात अशा प्रचंड चर्चेसचा तुटवडा नाही. त्यामुळे काशीत जशी देवळ तशी इकड ही चर्चेस. कलोनला जेवण घेण्यासाठी आम्ही एका छोट्या उपाहारगृहात शिरलो. जर्मन मार्क्सची टंचाई असल्यामुळे आम्ही बटाट्याच्या काचऱ्या— याला युरोपात फ्रेंच फ्राईज म्हणतात. कारण पोटॅटो चीप्स म्हटल की वेफर्स आणून देतात. काउंटरवर चलाख जर्मन तरुणी सुहास्य वदनान जर्मन भाषेत आम्हाला काय पाहिजे ते विचारत्या झाल्या. आम्ही फ्रेंच फ्राईज आणि कॉफी अस सांगताच तिन आमच्यासमोर ट्रेमध्ये दोन कप कॉफी आणि आमच पोट गच्च भरेल एवढ्या बटाट्याच्या सळया समोर ठेवल्या. एकूण खर्च फक्त चाळीस रुपये. त्यामुळे जेवण घेण्याची सोय नव्हतीच ही गोष्ट उघड व्हावी. आम्ही त्या प्रामाणिकपणे पोटात रिचवल्या, कॉफी गटागटा प्यालो आणि बाहेर आलो. आमच्याप्रमाणे आमचे अमेरिकन सहप्रवासी याच मार्गाने आपले पोट भरत होते हे आम्ही पाहिले तेव्हा जरा बरे वाटले.

सध्याकाळी आमचा मुक्काम फ्रॅन्कफर्टला होता. रात्री आम्ही फ्रन्कफर्टची

रोषणाई आणि निशाजीवन मोटरीतूनच पाहिले. आमचं मुक्कामाचं हॉटेल हब्रिस हे पंचतारांकित हॉटेल होतं. त्यामुळ त्यातील जेवण बरं होतं. अर्थात जेवणात बीफ, ब्रेड, सूप, पुडिंग हा नेहमीचा मेन्यू. वेटर्स सगळ्या जर्मन तरुणी. त्यात काही म्हाताऱ्या पण होत्या. पण त्या तरुणींपेक्षा जास्त चटपटीत आणि चलाख होत्या. कॉन्टिनेन्टल हॉटेल असल्यामुळे त्याना थोडेसे इंग्रजी अवगत होते. त्यामुळे खुणा करण्याचे प्रयास वाचले.

सकाळी साडेसहाला उठलो आणि साडेसातला ब्रेकफास्टसाठी खाली आलो. ब्रेकफास्ट बुफे पद्धतीचा होता. शिवाय त्यात ऑम्लेट, चीज, बेकन, हॅम, फ्रुट-ज्यूस, कॉफी इतक्या तऱ्हा होत्या. आम्ही सर्वांनी दुपारी कुठं तरी बटाट्याच्या सळ्या खाण्यापेक्षा इथच हात मारलेला बरा या दूरदर्शी विचाराने ब्रेकफास्टचा फन्ना उडवला. फ्रँकफर्ट-हून आम्ही आठ वाजता निघालो आणि साधारण नऊ वाजता हायडेलबर्ग या गावी आलो. दोन लाख वस्तीचे हे टुमदार गाव. जर्मनीतील सर्वात प्राचीन विद्यापीठ या गावात आहे. येथील दगडी पूल आणि जुना किल्ला आम्ही लांबूनच पाहिला. पण हायडेलबर्गला आम्ही एक गमतीदार वास्तू पाहिली. ती म्हणजे विद्यार्थ्यांचा तुरुंग. बेशिस्त वागणाऱ्या विद्यार्थ्यांना या तुरुंगात दोन आठवडे ठेवण्यात येत असे. या तुरुंगात दोन आठवडे राहिल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रतिष्ठा वाटत नसे; त्यामुळे जुन्या जमान्यात हा तुरुंग नेहमीच हाउसफुल्ल असे! आता हा तुरुंग म्हणजे एक प्रवासी आकर्षण आहे. आतील खोल्या विद्यार्थ्यांनी पार चितारून ठेवल्या आहेत. त्यात चावट चित्रे, अश्लील वाक्ये यांचा भरणा आहे. हायडेलबर्गच्या रस्त्यावर भरलेल्या बाजारात आम्ही थोडे भटकलो. युरोपात मोठमोठ्या शहरात आपल्याकडे दादरला जसा रानडे रोड आहे तसे रस्ते आहेत. या रस्त्यावर यच्चयावत सर्व वस्तू विकत मिळतात. भाजीपाला, ब्रेड, मासे, मटण, कपडे, पुस्तके, धान्य— काय हवं ते. हा देशी बाजार पाहून आम्ही हायडेलबर्ग सोडले. ब्लॅक फॉरेस्ट म्हणजे जर्मनीचे नंदनवन. रमणीय वनश्री, झुळझुळ वाहणारे ओढे, गरम पाण्याचे झरे. यामुळे देशो-देशीचे प्रवासी ब्लॅक फॉरेस्टला भेट दिल्याशिवाय जर्मनीची भेट पुरी झाली असे मानतच नाहीत. वाटेत शॉफहॉसेन येथे एका धबधब्याच्या पायथ्याशी आम्ही अर्धा तास काढला. तीस रुपये खर्च करून [illegible] कॉफी प्यायलो.

ब्लॅक फॉरेस्टमध्ये आम्ही ट्रायबर्ग या लहानशा खेड्यात आलो. इथे औषधी पाण्याचे झरे आहेत. या ठिकाणी आम्ही एका जुन्या पद्धतीच्या उपाहारगृहात गेलो. जर्मनीत आणि विशेषतः युरोपात उपाहारगृहे तळघरात असतात. आपल्याकडे बिर्ला मातोश्री सभागार जसं आहे त्या पद्धतीवर. या तळघरातील उपाहारगृहाच्या मालकाने आमचे प्रेमाने स्वागत केले. त्याने दोन जरीच्या टोप्या आणल्या. तो म्हणाला, ' आज आपल्या या प्रवासी पाहुण्यांतील एका जोडप्याच मी विशेष स्वागत करतो ' असं म्हणून तो माझ्याकडे आला आणि चक्क त्याने मला टोपी



घातली आणि एक सौ. च्या डोकीवर चढवली. ( एकूण मराठी विनोदी वाङ्मय जर्मनीतही पोचले ! ! ) त्यावर लोकानी टाळ्याचा कडकडाट केला आणि त्याने एक मोठा वाइनने भरलेला वाडगा माझ्यासमोर ठेवला. प्रथम त्याने आमच्या सौ. ला तो वाडगा तोंडाला लावण्याची विनती केली. तिने बिनतक्रार एक घोट घेऊन तो वाडगा मला दिला आणि मी त्याचा घोट घेतला. त्यानतर सर्व प्रवाश्यानी तो वाडगा तोंडाला लावून सपवला. त्या हॉटेलात अर्थातच आम्ही जेवण घेतल. जेवण स्वस्त आणि बरं होत. ( माणशी पन्नास रुपये ) पण जेवणापेक्षा आमच्या वाढप्या तरुणी स्वर्गातून आताच तर खाली उतरल्या नाहीत ना असा भास व्हावा अशा देखण्या होत्या. कुणालाही मोह व्हावा की त्याच्या गालावर टिचकी मारावी म्हणून. मला पण झाला. पण उपयोग काय ?

ते जेवण आटोपून आम्ही समोरच्या दुकानात गेलो. ब्लॅक फॉरिस्ट कक्कू क्लॉकसाठी जगप्रसिद्ध आहे. हे कक्कू क्लॉक म्हणजे त्याला चावी नाही. एक साखळी आणि लोलक. साखळी ओढायची की लोलक वर गेला. लोलक खाली आला की घड्याळ बंद. परत ओढायची. पण कक्कू क्लॉक-मध्ये वर एक कोंबडा असतो तो दर पंधरा मिनिटांनी बाहेर येतो आणि कुकू असा आवाज करतो. दहा डॉलरपासून पाचशे डॉलर्सपर्यंतची नाना तऱ्हेची कक्कू क्लॉक्स त्या दुकानात होती. याशिवाय लाकडी बीअर मग व बशा, प्लेट, टीपॉय– नाना तऱ्हेच्या वस्तू होत्या. युरोपात खरेदी करणे आमच्या शक्तीच्या बाहेरची गोष्ट. तरी पण ब्लॅक फॉरिस्टची आठवण म्हणून आम्ही बारा डॉलर्सचं एक छोटं घड्याळ घेतलं.

त्यानंतर त्या लहानशा टुमदार खेड्यात थोडे भटकलो. जर्मन स्त्रिया कुतू-हलाने आमच्या सौ. कडे येत. त्यांना साडीचे नवल वाटे. आमचे सह-प्रवासी आणि त्यांच्या बायका आमच्या सौ. च्या काश्मिरी सिल्क साडीवर खूष होत्या. कारण रोज नवा रंग. हिंदुस्थानबद्दल सर्वांना कुतूहल आहे पण भारताची कुणालाच कसलीच माहिती नाही. मुंबईत एक रुपयाला डझन केळी मिळतात आणि ऑबेरॉय, कॉन्टिनेन्टलसारख्या फाइव्ह स्टार हॉटेलांत ४० डॉलर्समध्ये राहता येते किंवा उत्कृष्ट डिनर सात डॉलर्सला मिळते हे ऐकून त्यांना मी थापा मारतोय असं वाटलं. आमच्याकडे सुरेख एअर-कंडिशन्ड हॉटेलमध्ये पाव डॉलरला चहा किंवा कॉफी पॉट मिळते यावरही त्यांचा विश्वास बसेना. आमच्या पुण्यासारख्या टाउनमध्ये बाथरूम ॲटॅच्ड डबलरूम फक्त पाच डॉलर्सला मिळते असं मी सांगितल्यावर ते सगळे माझ्याकडे आश्चर्याने पाहू लागले. मी चक्क बनवेगिरी करतोय असाच त्यांच्या चेहऱ्यावर भाव दिसला. मग अजंठा, वेरूळ, आग्रा, दिल्ली, मदुराई या भारतातील पाहण्यासारख्या ठिकाणांची त्यांना काहीच माहिती नव्हती. आमचे राजदूत, टूरिस्ट डिपार्टमेंट किती गलथानपणे आणि उदासीनपणे वागत आहेत याचा हा पुरावा.


ब्लॅक फॉरिस्टमधील ही छोटीशी पण संस्मरणीय यात्रा अनेक वर्षे स्मरणात राहील अशीच होती. निसर्गाच्या धन-दौलतीचा मुक्त उपयोग करावा युरोपियन लोकांनीच. वाटेत अनेक ठिकाणी मोटरी आणि त्याला जोडलेली छोटी घरे यांचे मुक्कामाचे तळ दिसले. ब्लॅक फॉरिस्ट म्हणजे खेळाडूंचे नंदनवन. शिकार, मासेमारी, हायकिंग यांची लयलूट. तंबू,

अथवा तुमचे कारव्हॅन घेऊन मुक्काम करावा. अशी शेकडो ठिकाणं. शनिवार म्हटल्या की युरोपियन माणूस घर सोडता झालाच. जमल्यास तो जंगलात जाईल नाही तर एखाद्या नदीच्या काठावर जाईल नाही तर एखाद्या बंदरावर जाईल.

जर्मनीचा ग्रामीण परिसर सोडून आम्ही स्वित्झर्लंडच्या बॉर्डरवर आलो. अँजेलोने 'अमेरिकन टूरिस्ट' असं ओरडून सांगताच कस्टम अधिकाऱ्याने आमच्याकडे ढुंकूनही न पाहता आम्हाला स्वित्झर्लंडमध्ये प्रवेश दिला आणि आम्ही ल्युसेनच्या दिशेने जाऊ लागलो. सकाळपासून तीनशे मैल प्रवास झाला. पण प्रवास केल्यासारखं वाटलंच नाही. कारण गाडीचा खडखडाट नाही, वाटेत क्षणभरही कुठे थांबणं नाही. त्यामुळे प्रवास करतोय असं वाटलंच नाही. त्या क्षणी आठवली ती एस. टी.—मुंबई—सावंतवाडीचा तो जीवघेणा प्रवास, ती वाटेतील भयाण कॅन्टीन्स, सारखा खडखडाट करणाऱ्या त्या गाड्या. . !

. ११ .

# आल्प्स पर्वतावर



युरोपमधील तुम्हाला कोणता देश अधिक आवडला असा जर कुणी प्रश्न केला तर मी उत्तर देईन स्वित्झर्लंड. एवढा देखणा, नीट-नेटका, स्वच्छ आणि श्रीमान देश जगात दुसरा नसावा. त्यामुळे स्वित्झर्लंडच्या लोकात एक प्रकारचा अहंकार आहे. त्याना परदेशी प्रवाश्याची मुळीच गरज नाही. गरज आहे ती परदेशी पर्यटकाना. साठ लाख लोकवस्तीचा हा देश म्हणजे जवळजवळ मुंबईपेक्षा कमी लोकसंख्येचा. पण या प्रदेशात परदेशी नागरिकाची संख्या तीस हजाराहून अधिक नाही. स्विस लोक युरोपात स्वतःला ' सुप्रीम ' समजतात. जर्मनीत तुम्हाला व्हिसा लागत नाही. इतर

राष्ट्रात व्हिसा घ्यावा लागतो व त्याची फी द्यावी लागते. यात स्वित्झर्लंडची व्हिसा फी सर्वांत जास्त आहे. स्वित्झर्लंडला निसर्गाने अपरपार देण दिलं आहे. त्याचा या देशाने फार चांगला उपयोग करून घेतला आहे. त्यामुळे स्विस फ्रँक हा जागतिक बाजारात जर्मन फ्रँकच्या बरोबरीने आहे. युरोपात त्या मानाने दरिद्री लोक म्हणजे इटालियन्स. ते युरोपातील सर्व देशात पोटापाण्यासाठी गेले आहेत. स्वित्झर्लंडमध्ये पण इटालियन्स आहेत. या इटालियन लोकाना स्विस लोकाबद्दल मनस्वी चीड आहे.

स्वित्झर्लंडची ख्याती घड्याळे, मशीन टूल्स, यांत्रिक उपकरणे याबाबत असून या देशाला जगातील जास्तीत जास्त पर्यटक भेट देतात. -होईन नदीचा या देशातील विस्तार २३५ मैलाचा आहे. लेक स्विस, लेक शार्टल आणि लेक जिनिव्हा ही ख्यातनाम तळी. परदेशी पर्यटकाचे आकर्षण. स्वित्झर्लंडमध्ये डोंगरी प्रदेशात रेल्वेचे जाळे पसरले आहे. युरोपातील रेल्वेमध्ये स्वित्झर्लंडसारखी वक्तशीर रेल्वे अन्यत्र नाही. या छोट्याशा देशाला निसर्गसौंदर्य भरपूर असले तरी नैसर्गिक खनिज संपत्तीचा फार तुटवडा आहे. त्यामुळे कच्च्या मालाच्या आयातीवरच त्याना अवलबून राहावे लागते. अशी परावलंबी अवस्था असूनही उद्योगधंद्याच्या बाबतीत स्वित्झर्लंड नुसता आघाडीवरच नाही तर त्याने स्वतःचे असे वैशिष्ट्य निर्माण केले आहे. स्विस घड्याळाची कीर्ती अजून कायम आहे. जपानसारख्या राष्ट्राने स्वित्झर्लंडशी घड्याळाच्या बाबतीत टक्कर देण्याचा प्रयत्न केला असला तरी जगाच्या बाजारपेठेत स्विस घड्याळाना जी प्रतिष्ठा आहे ती प्रतिष्ठा अन्य कोणत्याच घड्याळाना नाही. ओमेगा, फॉवरलुबा ही घड्याळ सर्वांना ठाऊक आहेत. पण पाथेक फिलिप्ससारख स्विस घड्याळ किमान पंचवीस हजाराला मिळत व उत्तम प्रकारच पाथेक फिलिप्स घड्याळ घ्यायच असेल तर त्याला दोन लक्ष रुपये पडतात. इंग्लडच्या राणीलाही ऑर्डर दिल्यानतर एक वर्ष थाबाव लागत, अशी पाथेक फिलिप्सची जाहिरात होते. घड्याळानतर केमिकल्स, फार्मास्युटिकल्स, व्हिटॅमिन्स, जतुनाशके, चॉकोलेटस् याची निर्मिती करण्यात स्वित्झर्लंडने मोठे नाव कमावले आहे. त्याच्याकडे होत नाही अशी एक गोष्ट म्हणजे मोटर. तो मक्ता इटली आणि जर्मनीचा.

स्विस लोक स्वभावाने तुसडे आणि अहकारी यजमान. स्वित्झर्लॅन्डच्या उपाहारगृहात अथवा सार्वजनिक ठिकाणी परकीयाबाबत फारच उदासीन

वृत्ती आढळेल. आम्हा भारतीयाना शोभेल अशी. पण त्याना त्याची फिकीर नाही. त्याना खात्री आहे, न बोलावले तरी लोक आल्प्स पर्वताच्या हिमाच्छादित शिखराच्या मोहाने इथ येणार.

## जगातील महाग ठिकाण

स्वित्झर्लंड हे जगातील एक अत्यत महाग ठिकाण. सकाळी वाटेत कुठे तरी झाडाखाली बसून दुपारच जेवण घ्यायचं असा आम्हा सर्वांचा बेत. त्याकरिता आम्ही एका वाटेत गावाला थांबलो. तिथ मी माझ्या हाताच्या पज्याच्या आकाराचा पाव आणि लोणी विकत घेतले. आणि चक्क पन्नास रुपये दिले. पोटात गोळाच आला म्हणाना. स्वित्झर्लंडमध्ये माणशी किमान पगार १५०८० रुपये आहे. ( अमेरिकेत कारकुनाचा किमान पगार दरमहा साडेचार हजार आहे. ) चार खोल्याच्या अपार्टमेन्टला दरमहा चार हजार रुपये भाडे मोजावे लागते.

आम्ही वाटेत पाव-लोणी, केळी, सफरचद, बीअर असे जेवण एका झाडाखाली बसून घेतले. त्याचा खर्च शभर रुपये. आमच्याबरोबरच एक जोडप आणि त्याची धाकटी मुलगी यानी पचवीस रुपयाना एक कोका-कोलाची बाटली विकत घेतली आणि तिघानी ती एकामागून एक अशी तोंडाला लावली. काय करणार काय बिचारे? वाटेत झ्युरिचचा प्रचंड विमानतळ लागला. हा स्वित्झर्लंडमधील सर्वांत मोठा आतरराष्ट्रीय विमानतळ. नतर आम्ही हॉटेल उटरलड या ल्यूसर्नमधील छोट्याशा हॉटेलात राहिलो. या हॉटेलची मालकीण एक लठ्ठ स्विस बाई होती. आपल्या टुनटुनची थोरली बहीण शोभेल अशी! तिने आम्हा सर्वांच्या गालाचे मुके घेतले आणि आमच स्वागत करून आम्हाला भेट म्हणून चादीचा एकेक चमचा बक्षीस दिला. स्विस लोकांच्या एकूण अहकारी वृत्तीला न साजेसं हे वर्तन होतं. या हॉटेलात परिचारिका म्हणजे स्विस तरुणीच. त्या काय बोलत होत्या ते कळत नव्हत. पण साडीमुळे प्रत्येकजणी माझ्या सौभाग्यवतीच्या जवळ येऊन तिच आणि तिच्या साडीच मनमुराद कौतुक करत होत्या. युरोपात प्रत्येक हॉटेलमध्ये सॅनिटरी फिटिंग्ज वेगवेगळी. त्यामुळे काही ठिकाणी साखळी ओढायची, तर काही ठिकाणी नुसत बटण दाबायच तर काही ठिकाणी दाडा वर करायचा. नाना कटकटी. त्यामुळे हॉटेलमध्ये गेल्यावर प्रथम ही लफडी

मी समजावून घेत असे. त्यानतर खोलीच दार किल्ली लावून उघडताना माझा जीव नेहमी घाबराघुबरा होत असे. त्यातही वेवगेगळ्या कटकटी. ल्युसर्नच्या ह्या हॉटेलात रात्री आम्हाला जेवण फार चागल मिळालं. बऱ्याच दिवसानी भात दिसल्यामुळे आमच्या कोकणी सौभाग्यवतीच हृदय भरून आल. शिवाय कोंबडी-सूप, फळे, क्रीम, पुडिग असा झक्क मेन्यू होता. सौ. ने भातावर मनसोक्त ताव मारला. ल्युसर्न हे स्वित्झर्लंड-मधील सर्वात प्रेक्षणीय स्थळ. या गावास रोज तीस हजार पर्यटक भेट देतात. गावातल्या ऐतिहासिक वास्तू – किल्ले आणि येथील लायन मॉन्युमेन्ट आम्ही पाहिले. रात्री गावात फिरायला गेलो. गावात स्त्री-पोलीस सर्वत्र दिसत होत्या. त्याचा देखणेपणा काय वर्णन करावा ! पोलिस खात्याबद्दल माझं प्रथमच चागलं मत झाल. त्यानतर रात्री आम्ही गावात गावाच्या वाढदिवसानिमित्त रोषणाई आणि दारूकामाचा कार्यक्रम पाहायला गेलो. रात्री ९ वाजता दारूकाम सुरू झाल. आकाशात हिऱ्याची पखरण व्हावी किंवा सूर्यफुलाचा सडा पडावा किंवा जाई-जुईच्या माळा तुटून खाली पडाव्या अथवा अबोलीच्या वेण्या कुणी इतस्ततः फेकाव्या अथवा आकाशात चद्रकोरीची कोणी रागोळी काढावी असं थक्क करणार हे दारूकाम होत. लोक अधूनमधून टाळ्याचा कडकडाट करीत होते. दारूकाम कसल म्हणायच– ती तर दीपज्योतींची जणू कलाकुसरच होती ! फुलाफुलाच कशिदाकाम रगीबेरगी दिव्यानी करायच म्हटल आणि त्यासाठी आकाशाच वस्त्र घेतल तर कस दृश्य दिसेल– तसच काही तरी हे अलौकिक इद्रधनुषी जादूकाम होत. ते आटोपून आम्ही रात्री बारा वाजता परत आलो. हवा थड होती. स्विस रमणी ट्रॅफिक पोलिसाच्या वेशभूषेत सुहास्य मुद्रेने आम्हाला रस्ता दाखवीत होत्या. त्याना सर्वांनी डोळे भरून पाहिले. युनिफॉर्ममध्ये त्या इतक्या चटका लावणाऱ्या दिसतात तर त्याच्या घरगुती वेषात कशा दिसतील असाच विचार प्रत्येकाच्या मनात आला. रात्री परत आलो तेव्हा साडेबारा वाजले होते. सकाळी परत साडेसहाला उठायचे.

## आल्पस पर्वतावर

सकाळी साडेसहा वाजता उठण्याची आता सवय झाली होती. साडे-सातच्या आत खाली ब्रेकफास्टसाठी जमायच होतं. सामानाची बाधाबाध

केली आणि चहा-पाव, जाम, लोणी यावर ताव मारला. मुंबईत मी सकाळी चुकून कधी पावाला स्पर्श केल्याच आठवत नाही. पण इथ दुपारच जेवण स्वतःच्या खर्चान घ्यायच्चय हे ध्यानी आणून आम्ही सगळेच पावाचा फन्ना पाडीत होतो. सौभाग्यवती तर एका वेळी अडीच कप कॉफी घेत होती. मी तिच्या या पिण्याकडे थोडस ' सुहास्य ' मुद्रेने पाहताच तिने मला ठणकावून सांगितल, ' मी काहीच नाही. ती समोरची अमेरिकन बाई— तिन मेलीन तीन कप कॉफी घशात ओतलीच पण हळूच एक पाव आपल्या पर्समध्ये लपवला.' यावर मी बिचारा काय बोलणार ! आम्ही नाश्ता आटोपून मोटरीत बसलो. कारण इथून आम्हाला आता वीस मैलावर आल्प्स पर्वतावर जायच होत. आल्प्स पर्वतावर जाण्यासाठी या ठिकाणी विजेचे पाळणे आहेत. आम्ही या पाळण्यात बसलो. पाळणा नेणारा दोर तुटला तर काय होईल असा प्रश्न सौ. ने केला. त्याला मजपाशी काहीच उत्तर नव्हते. मी म्हणालो, ' अजून आपल्याला पुष्कळच कार्य करायचय. त्यामुळे म्हटल तरी हा दोर तुटणार नाही.' त्याप्रमाणे दोर न तुटता आम्ही मस्तपैकी तरगत तरगत चार हजार फूट उचीवर गेलो वर एक अप्रतिम मोटेल होते. त्या मोटेलच्या व्हराड्यात बसून सारा आसमत न्याहाळण्याची सोय होती. आल्प्स पर्वत हा हिमा-लयाच्या मानाने ठेगणा. आल्प्सचा हा रिगी माउन्टन म्हणजे सह्याद्रीचा भाऊ शोभण्यासारखा. वनश्री मसुरी किंवा सिमल्याची आठवण करून देणारी. या थड हवेत आम्हाला कडकडून भूक लागली. जेवणाचा खर्च अनिवार्य होता. सौ. ला पाण्याची हुक्की आली. मी म्हटल, मी बीअर पिईन. त्याने मेन्यू कार्ड आणल. त्यात पाण्याच्या बाटलीला सात रुपये आणि बीअरच्या अर्ध्या बाटलीला दहा रुपये. पण आज गुरुवार आहे तेव्हा मी पाणीच पिईन असा हट्ट धरून तिने चक्क सात रुपये पाण्यात टाकले. व्हेजिटेरिअन जेवण म्हणजे चक्क पाला, बटाटा आणि ब्रेड. त्याला शभर रुपये दिले. तो पाला खाऊन पोट गच्च झाल. म्हणून पर्वतावरच्या पठारावर हिंडायला गेलो. वाटेत रगीबेरगी परकर नेसलेले स्विस खेडुत भेटले. आम्ही त्याच्याबरोबर छायाचित्र काढायच ठरवल. त्यातल्या एका म्हाताऱ्याने स्वागत म्हणून सौ. च्या गालाच चुंबन घेतल. सौ. कावरी-बावरी झाली. मी म्हटल, ' डोन्ट वरी. इथ अशीच प्रथा आहे. एखादा तरुणीन माझ गालचुबन घेतल तर मात्र फार कावरीबावरी होऊ नकोस.' दुरून घटानाद ऐकू येत होता. मी म्हटल या कसल्या घटा ? तो म्हणाला,

आमच्या गाईंच्या गळ्यात बांधल्या आहेत. त्या चरताहेत. त्याचा आवाज येतोय.

फिरण आटपून आम्ही परत हॉटेलात आलो. तिथ अजून काही प्रवासी मद्यपान करीत होतेच. शेवटी नृत्याचा कार्यक्रम झाला. एक अष्टागवक्र सत्तर वर्षांचा म्हातारा प्रत्येक तरुणीला आपल्याबरोबर नृत्य कर म्हणून विनवणी करीत होता आणि प्रत्येकीने त्याला साथ दिली.

चार वाजता आमचा हा कार्यक्रम सपला आणि परत एकदा आल्प्स पर्वतश्रेणींचे दर्शन घेतले आणि पाळण्याने खाली आलो.

आता आम्ही निघालो इन्सब्रर्गला. ऑस्ट्रियातील या चिमुकल्या गावाला. तारीख होती १८ जुलै १९७८.

· १२ ·

# ऑस्ट्रियात

आल्पस पर्वतावरचे गिर्यारोहण आटपून आम्ही परत आमच्या हॉटेलवर आलो. रात्रीचा कार्यक्रम म्हणजे नाईट बोट. यासाठी आमच्याकडून



प्रत्येकी दीडशे रुपये एक्स्ट्रा चार्ज घेतला. त्याप्रमाणे आम्ही, सध्याकाळी सगळेजण बोटीकडे निघालो. तिथल्या बोटी म्हणजे तरंगती उपाहारगृहेच

असतात. आतील रम्य वातावरण. मऊ, ऊबदार सोफासेटपेक्षा आरामशीर खुर्च्या, टेबले, आदबशीर वेटर्स असा हा थाट होता.

या बोटीवर स्वित्झर्लन्डमधील प्रत्येक खोऱ्यातील प्रातिनिधिक कलावंत जमा झाले होते. त्याची लोकनृत्ये हा आजचा खास कार्यक्रम. त्याचे रंगीबेरंगी चित्रविचित्र पोशाख पाहण्यासारखे होते. स्त्रियांचा पोशाख म्हणजे हॅट, वुलनचा चट्टेरीपट्टेरी स्कर्ट, लिननचा कशिदा काढलेला ब्लाऊज, अगदी पूर्वीच्या आमच्या लोकप्रिय ' जपर 'सारखा. पायात मोजे. हातमोजे पण त्याला बोटे नाहीत. पुरुषाच्या डोकीला हॅट पण चपटी. त्याचा लाल भडक कुडता, पिवळी पँट, मोजे, बूट, चामड्याचा पट्टा. प्रत्येक कपड्यावर कशिदाकाम. पायमोजावर पण. त्याच्या तोंडात पाइप. त्याला लिंडॉरेली असे नाव. पुरुषाच्या कानात लोलक. या पोशाखात प्रत्येक खोऱ्यातील स्त्री-पुरुषाचे आगळे असे वैशिष्ट्य. ल्युसर्नमधील खेडुताचा वेष वेरसास्का, फ्रिसॉन, व्हॅलेस इत्यादी खोऱ्यातील खेडुताच्या पोशाखापेक्षा भिन्न.


आमच्या बोटीचे नाव गॉथरॅड. ती दुमजली होती. बोटीवर उत्तमपैकी बार. जेवणात मेनू कार्ड समोर होते. माणशी पन्नास रुपयात जेवण. वाइन अर्थात बोटीतर्फे आम्हाला मुक्त होती. त्याने वाइनच्या बाटल्या आणल्या आणि टेबलावर एक शेगडी आणि त्यावर एक भांडे ठेवले. त्या भांड्यात वरणासारखे खदखदत होते काही तरी. आम्ही विचारले, ' हे काय प्रकरण आहे ? ' त्याने सांगितले, ' हे चीज फाँड. हे ढवळत बसायचे आणि तुमच्या भांड्यात घेऊन पावाब्रेडवर खायचे. ते नीट ढवळले नाहीत आणि घट्ट झाले तर शिक्षा म्हणून तुम्हाला समोरच्या स्त्रीला चुंबन द्यावे लागेल.' ही शिक्षा पुरुषापुरतीच मर्यादित होती. मग तुमच्यासमोर ऐंशी वर्षांची म्हातारी असली तरी इलाज नाही.

माझ्यासमोर बऱ्यापैकी प्रौढा होती. त्यामुळे ते वरण घट्ट होऊ नये आणि माझ्यावर तो गोड प्रसंग येऊ नये म्हणून सौ. ने नेटाने ते वरण ढवळण्यास मदत केली. पण आमचे हे ' फाडू ' आमच्या कामी आले नाही. वाइन फुकट असल्यामुळे फाडूची चव आम्हाला कळली नाही.

त्यानंतर आमच्यासमोर लोकनृत्याचे कार्यक्रम झाले. आमच्याकडे आदिवासींची जशी नृत्ये असतात तशीच ही नृत्ये. हातात हात घालून फेरे धरून नाचायचे. याशिवाय त्यांची ' लोकगीते '. त्याचा अर्थ कळला नाही तरी त्यातील हावभावावरून ती प्रेमगीते असावीत हे उघड होते. हा लोक-

नृत्याचा कार्यक्रम दीड दोन तास रंगला. त्यानंतर आपल्याकडे आदिवासींचे तारळासारखे जे वाद्य असते तसेच एक लाकडी शिंग घेऊन एक खेडूत आला. इथला खेडुत चांगला गोरापान, सशक्त, सुरेख रंगीबेरंगी कपडे घातलेला. आपला ' म्हादबा ' किंवा ' परशा 'नव्हे. त्याने ते वाद्य तोंडाला लावून फुकले. त्याचा आवाज घुमला आणि समोरच्या डोंगरावर आदळून त्याचा सुरेख प्रतिध्वनी ऐकू आला.

त्यानंतर त्याने बसलेल्या प्रेक्षकांपैकी काही जणांना विनंती केली की, त्यांनी ते वाजवण्याचा प्रयत्न करावा. त्याप्रमाणे काहीजणांनी ते वाजवून दाखवले. काही न वाजवताच दमले. त्याने आमच्या सौभाग्यवतीला रिक्वेस्ट केली. तिच्या रेशमी साडीमुळे तीही स्विस खेड्यातील एखादी शेतकरीण समजायला हरकत नव्हती. पण तीही वाजवण्याचा अयशस्वी प्रयत्न करून दमली. तरी लोकांनी ' कार्यक्रम यशस्वी ' म्हणून टाळ्यांचा



कडकडाट केला. मीही फांट्ट खात आणि वाइनचा घुटका घेत या टाळ्यांना हातभार लावला. त्यानंतर आदिवासींच्या पद्धतीवर हातात हात घालून चक्राकार नृत्याचा कार्यक्रम झाला. त्यात आम्हाला सर्वांनाच भाग घ्यावा लागला. सौ. कला सामंत यांचेही नृत्य छान झाले. या सांघिक नृत्याला साथ म्हणून ऑर्केस्ट्रा आणि लोकगीत होतेच.

हे सगळे संपेपर्यंत आम्हाला बारा वाजले. सकाळी उठून ऑस्ट्रियाला जायचे होते. रात्री हॉटेलात येऊन त्या गुबगुबीत बिछान्यावर अंग टाकले आणि चटकन झोपी गेलो.

सकाळी गुडमॉर्निंग म्हणून हॉटेलच्या मॅनेजरने टेलिफोन करून उठवले. आघोळ, सामानाची बाधाबाध करून अंगावर कपडे चढवले. कोट घातला आणि इतक्यात लक्षात आले की, पासपोर्ट हरवलाय. परदेशात अब्रूपेक्षा पासपोर्टला जास्त जपावे लागते. माझा आणि सौ. चा पासपोर्ट, सोबत सात आठशे डॉलर्स हरवणे म्हणजे भयकर दिव्य. मी क्षणभर सुन्न झालो. काल्च्या लोकनृत्यात वाइनच्या आणि 'फाँड'च्या गडबडीत मी तो बोटीतच कुठे तरी टाकला असणार. सौ. ने माझ्या गलथानपणावर नेहमी-प्रमाणे एक व्याख्यान झोडले. पासपोर्ट हरवला म्हणजे आता खरी कबक्ती. कवक्ती हा शब्द मी ऐतिहासिक नाटकात पूर्वी अनेक वेळा ऐकला होता. पण त्याचा खरा अर्थ मला आज कळला. सुन्न होणे, गात्रे बधिर होणे, पायातले त्राण नाहीसे होणे, या साऱ्या अनुभूती त्या क्षणी प्रथमच कळल्या.

मी भानावर आलो आणि शोधाशोध करतो तो पासपोर्ट खाली कार्पेट-वर पडलेला दिसला. 'प्रभु अजि गमला' या थाटात मी तो पासपोर्ट हृदयाशी धरला आणि आमच्या सिंधूला दाखवला. हायसे वाटणे, जिवात जीव येणे, जीव भाड्यात पडणे, हर्षवायू होणे वगैरे वगैरे सारे काही मला एकदमच झाले. मग मी विजयी वीराच्या मुद्रेने आविर्भावात ब्रेकफास्टला गेलो आणि दोन गलेलठ्ठ पाव, जाम आणि लोणी याचा आनदाने फडशा पाडला. अनेक बायानी (त्यात आमची बाय पण आली) पर्समध्ये पाव, जाम, चीज याचा सफाईने भरणा केला. कारण आज वाटेत आल्पस पर्वताच्या पाय-थ्याशी आपण पिकनिक करायचेय असा इशारा जॉनने दिला होता.

मोटरीत बसलो. ॲंजेलो ड्रायव्हर हॅलो मिस्टर, एवढेच इग्रजी शब्द जाणत होता. त्याच्याशी हस्तादोलन केले आणि आमचा आल्पस पर्व-ताच्या रागातून ऑस्ट्रियाला जाण्याचा प्रवास सुरू झाला. हॅलो, हाऊ आर यू, इटस ब्यूटिफूल, थँक्यू, वडरफुल, असे म्हणत असताना सौ.च्या लक्षात आले की, लडनला घेतलेला माझा नवा स्वेटर हॉटेलातच राहिला. पासपोर्ट गवसल्याच्या आनदात आम्ही स्वेटर विसरलो. बायकोला चुटपूट लागली. मी जिवावरचे शेपटावर निभावले म्हणून निष्काळजी होतो. ऑस्ट्रियन बॉर्डरवर नाणी बदलली म्हणजे त्या काउटरवरच्या माणसाने जेवढी दिली तेवढी मुकाट घेतली. कारण स्विस फ्रॅन्क आणि ऑस्ट्रियन शिलिंग याचे नक्की नाते इथे कुणाला ठाऊक?

पण हा सारा हिशेब आल्पस पर्वताची हिमाच्छादित शिखरे पाहून विसरलो. जेमतेम दहा हजार फूट उंच. आमच्या हिमालयाची शान नाही. ती भव्यता आणि गंभीरता आल्पसच्या शिखरांना नाही.

युरोपमधला ऑस्ट्रिया हा अत्यंत चिमुकला देश. आमच्या महाराष्ट्राच्या निम्मा. पण या देशात वीस हजार हॉटेल आहेत आणि ३६० कँपिंग ग्राउंडस आहेत. युरोपातल्या या प्रत्येक राष्ट्रात स्वच्छतेच्या बाबतीत जणू काय स्पर्धा लागलेली असते. आमच्याकडे जशी अस्वच्छतेच्या बाबतीत, तशीच !

नेपोलियनच्या रोमांचकारी जीवनात ऑस्ट्रियाचा वाटा मोठा होता. ऑस्ट्रियातील किल्ले अजूनही प्रेक्षणीय अवस्थेत आहेत. यातील काही किल्ल्यांचे हॉटेलात रूपांतर झाले आहे.

व्हिएन्ना हे शहर म्हणजे ऑस्ट्रियाची राजधानी. त्यानंतर साल्झबर्ग, इन्सब्रुक, टायरॉल ही प्रेक्षणीय स्थळे. ऑस्ट्रियात तलावाचा तुटवडा नाही. त्यामुळे त्याचे लेक डिस्ट्रिक्टस पाहण्यासारखे आहेत. युरोप हे चित्रकलेचे माहेरघर. पण ऑस्ट्रियात ऐतिहासिक शस्त्रे, चिलखते, पोशाख, भरजरी वस्त्रे यांचे मौल्यवान संग्रह अनेक म्यूझियम्समध्ये ठेवले गेले आहेत.

ऑस्ट्रियाचा भूभाग हा जंगलाने व्यापलेला आहे. पण ऑस्ट्रियाचे सर्वांत जास्त उत्पन्न वाइनचे. वर्षाला अडीच कोटी गॅलन वाइन ऑस्ट्रियात तयार होते. व्हिएन्नो नावाची त्यांची व्हाईट वाइन ही साऱ्या जगात ख्यातनाम आहे. पण ऑस्ट्रियाचे राष्ट्रीय पेय बीअर. पण बीअरच्या खालोखाल इथे कॉफी फार लोकप्रिय. चाळीस वेगवेगळ्या प्रकारांची कॉफी इथे तयार होते. या कॉफी हाऊसमध्ये संध्याकाळी गप्पा मारणे हा ऑस्ट्रियन लोकांचा विसावा. ऑस्ट्रियात चॉकोलेटस फार चांगली तयार होतात. मशिनरी, इमारती लाकूड आणि कागद हा यांचा निर्यात माल.

आम्ही वाटेत जंगलात दुपारचे भोजन घ्यायचे ठरविले होते. त्यामुळे वाटेत कोका कोला, पाव, जाम, सफरचंद इ. वस्तू विकत घेतल्या. खर्च अवघा शंभर रुपये. म्हणजे हा लहानसा देश पण महाग मोठा. वाटेत आल्पस पर्वताच्या पायथ्याशी एका निवांत हिरवळीवर आम्ही आमचे भोजन उरकले. आमच्या नवीन दोस्ती झालेल्या कॅनेडियन मित्राने कनवाळू होऊन मला बीअर ऑफर केली. मी त्याला सफरचंद दिले. त्यानंतर आम्ही सगळा कचरा पिशवीत भरला. इतरांनी भरला म्हणून आम्हालाही भरणे

भाग झाले. नाही तर आम्ही बॉम्बे-पूना स्टाइल्वर रस्त्यावरच टाकून दिला असता.

आल्पस पर्वतातील हे रस्ते अप्रतीम होते. जागोजाग उच्च पूल, चार चार रस्ते असणारे बोगदे. एक पूल तर ९०० मीटर उचीवर होता. जगातला हा एक उच्च पूल. यान्त्रिकी विद्येचा एक आदर्श नमुना. रमणीय सृष्टिसौंदर्य. हिरवीगार वनश्री. झरे, हिमाच्छादित शिखरे, रस्त्याच्या कडेला लाबून दिसणारी घरे. कुरणे, त्यातील त्या अजस्र गाई आणि बैल. या स्वप्नमय वातावरणातून आम्ही इन्सब्रर्कला केव्हा आलो हे कळलेच नाही.

१९५१ ला इन्सब्रर्कला ऑलिंपिक सामने भरले होते आणि १९६४ ला हिवाळी ऑलिंपिक सामने भरले होते. आल्पस पर्वताच्या कुशीत वसलेले हे गाव आपल्या मनाली, राणीखेत या हिमालयाच्या कुशीत वसलेल्या गावाची याद करून देते.

एका टुमदार, दृष्ट काढाव्या अशा हॉटेलात आम्ही आलो. तेव्हा दुपारचे पाच वाजले होते. तारीख होती १७ जुलै १९७८.


. १३ .

# व्हेनिसमध्ये

इन्सब्रर्क सकाळी सोडले आणि इटलीच्या मार्गावर लागलो. हा प्रवास म्हणजे एक गमत होती. आम्ही निघालो होतो व्हेनिसला. हा साडेतीनशे मैलांचा प्रवास दऱ्याखोऱ्यातून आणि पहाडी प्रदेशातून चालला होता. वाटेत हजार मीटर उंचीचा एक पूल लागला. यात्रिकी कलेचे हे चमत्कार जागोजाग दिसत होते. इटालियन यंत्रविशारदानी या मार्गावर एकूण २०० बोगदे बांधले आहेत. म्हणजे एकूण चारशे बोगदे. एकाला एक जोडलेले असे जुळे बोगदे. एक येणाऱ्या वाहनासाठी, दुसरा जाणाऱ्या वाहनासाठी. प्रत्येक बोगद्यातून एका वेळी चार मोटरी प्रवास करू शकतील एवढी रुंदी. आत सर्वत्र फरशीकाम आणि ट्यूबलाइटचा लखलखाट मुंबईहून पुण्याला जाताना खंडाळ्याच्या वाटेत मोटरीच्या रस्त्यावर एकच बोगदा आहे. तो म्हणजे महाराष्ट्र सरकारच्या बांधकाम खात्याच्या गलथानपणाचा एक नमुना आहे. आमचे मंत्री मोटरीत झोपा काढतात की काय? या हातभर लांबीच्या बोगद्यात एक धड दिवा नाही. ( इटलीतील काही बोगदे तीन तीन मैल लांबीचे आहेत. ) इटालियन यंत्रविशारदाची ही कुशलता युरोपात विख्यात आहे. पण युरोपातील इटली हे सर्वात दरिद्री राष्ट्र आहे. वाटेत ब्लोनिया प्रांत लागला. भाताची शेते दिसली. युरोपात इटलीत भात खाण्याचे वेड फार. वाटेत एका छोट्या गावात कॉफी घ्यायला थांबलो. स्त्रियाना टॉयलेटला जायचं होतं. पण इथं चक्क भारतीय पद्धतीचे संडास असल्यामुळे पॅन्टवाल्या अमेरिकन स्त्रियाची पंचाईत झाली. युरोपात प्रथमच इथं स्वस्त कॉफी प्यायला मिळाली. तीनशे लिरा. एक लिरा म्हणजे आमचा एक नया पैसा. म्हणजे तीन रुपयाना एक कप कॉफी झाली. आमच्या दिल्लीच्या मौर्य हॉटेलात एक कप कॉफीला सहा रुपये पडतात आणि एका रात्रीचे एका माणसाला राहण्याचे रुपये ४०० पडतात. त्यामुळे ही

स्वरताईची कमाल वाटून आम्ही दोघे प्रथमच युरोपात एकाच बैठकीत दोन कप कॉफी प्यायलो.

इटली हा देश चक्क भारताची आठवण करून देणारा. इथंच घराबाहेर प्रथमच दाडीवर वाळत घातलेली धुणी दिसली आणि घरच्यासारखं वाटल. इटलीतल्या कामगाराला दरमहा साडेतीन हजार रुपये पगार मिळतो. आमच्या लार्सन टोब्रोच्या कामगाराला दरमहा बाराशे रु. मिळतात. म्हणजे इटलीच्या एकूण राहणीच्या मानाने हा दरिद्री पगार. त्यात तेरा टक्के टॅक्स. कारकुनाला साधारणपणे साडेपाच हजार रुपये पगार मिळतो.



इटालियन माणूस हा आमच्या मराठी मध्यमवर्गीयाच्या प्रवृत्तीचा आहे. त्याला सिनेमाचे भयंकर वेड आहे. लास्ट टांगो इन पॅरिस हा गाजलेला चित्रपट इटालियन दिग्दर्शकाने दिग्दर्शित केला होता. इथं रविवारी सिनेमाची तिकिटे मिळत नाहीत. टी. व्ही. चे दोन चॅनेल्स. पण टी. व्ही. आपल्यासारखाच दरिद्री. त्याचेही सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे सिनेमा. जुने अमेरिकन चित्रपट. कामगार सकाळी आठ वाजता स्वतःच्या फियाट गाडीने कामावर जातो आणि संध्याकाळी पाच वाजता परत येतो. रात्री आठला जेवण. जेवणात स्पगेटी, राइस, आमटी, पोर्क आणि वाइन. घरात

जेवणखाण बायकोच करते. इटालियन बाई भारतीय बाईसारखी सहिष्णू. पण भांडकुदळही. तेथे नोकरी करणाऱ्या स्त्रियाची चंगळ आहे. गरोदर बाईला सहा महिने भरपगारी रजा आणि सहा महिने अर्धपगारी रजा. शहरात राहणाऱ्या मंडळींचे त्यांच्या खेड्यात कौलारू घर आणि थोडी शेतीवाडी असते. या गावाचे त्यांना फार आकर्षण असते. त्यामुळे दर शनिवारी गावाला जायचा कार्यक्रम असतो. चारशे मैलाच्या प्रवासाला चार तास लागतात. मुंबईचा माणूस जसा शुक्रवारी कणकवलीला जातो आणि रविवारी रात्री ताजा तवाना होऊन परत येतो तसा. इटलीत लोणी नाही आणि आइस्क्रीम नाही. दुधाचा तसा तुटवडा. कोकणासारखी अवस्था. इटलीत वशिल्याचे बंड फार आहे. मोठी नोकरी, गाडीचे तिकीट यासाठी वशिला हवा. इथ बेकारांना रोजचा पधरा रुपये भत्ता मिळतो. इथ रेडियोपासून मोटरीपर्यंत वाटेल त्या वस्तूच्या चोऱ्या होतात आज इटलीत कम्युनिस्टाचे वर्चस्व दिवसेंदिवस वाढत आहे. इथ मंडईत सकाळी खरेदीला जातात त्या बायका. इटलीत स्त्रियाना दुय्यम दर्जा आहे. इटालियन कुटुबाची राहणी आमच्या कोकणी माणसासारखी. वरण-भातावर प्रेम. कुटुंबवत्सलपणा व मुलाचे फाजील लाड. पोरींची प्रमाणाबाहेर काळजी. मुलगी सहाच्या आत घरी आली नाही तर आई-बाप चिंतेत पडतात. प्रेमविवाहाला इटलीत प्रतिष्ठा नाही. मुलीने भलत्या माणसाशी लग्न केल तर आई-बाप त्रागा करतात किंवा प्रेमविवाहाला मान्यता दिली नाही म्हणून जीव दिला अशा बातम्या पेपरात येतात. एखाद्या मुलीवर बलात्कार झाला तर ती घराला मुकते. खेड्यात सरपच हा मोठा माणूस.

युरोपमध्ये सर्वत्र दक्षिण-उत्तर झगडा आहे. तो इटलीत मोठा तीव्र आहे. दक्षिणेत दारिद्र्य. त्यामुळे तेथील लोक, विशेषतः स्त्रिया, उत्तरेत येतात. त्या बहुतेक गुडाच्या जाळ्यात सापडतात. दक्षिणेत उद्योगधंदे काढण्याचे प्रयत्न होतात. सरकारतर्फे डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन्स काढली जातात. पण आमच्या कोकणाप्रमाणे स्थानिक जनता तिथ राहून काम करायला तयार नाही. प्रत्येकाला रोम, फ्लॉरेन्स यासारख्या शहराकडे जाण्याचा ओढा. त्यामुळे दक्षिणेत निघालेले अनेक कारखाने स्थानिक लोकाच्या असहकारामुळे बद पडले.

तरुण इटलीत प्रेमाला प्रतिष्ठा नाही. प्रेम करणाऱ्या मुलीला फटके खावे लागतात. बापाने प्रियकराला मारणे ही नेहमीची बातमी. इथ

कौटुम्बिक जिव्हाळा अजून कायम आहे. एकत्र कुटुम्बपद्धतीवर अजून त्याची श्रद्धा आहे.

आमच्याकडे क्रिकेटचे जसे वेड तसे इटलीत फुटबॉलचे. दारिद्र्य असूनही फुटबॉलच्या मॅचच्या तिकिटासाठी लोक रात्रीपासून रांगा लावतात. नेपल्सचा फुटबॉल स्टेडियम हा जगप्रसिद्ध. त्याचे ६५ हजार कायम वर्गणीदार आहेत. नुसतं उभ राहून मॅच पाहायची तरी ५०८ रु. द्यावे लागतात व त्यासाठी तिकिटाची मारामारी !

अशा या इटलीत प्रथम प्रवेश केला तेव्हा वाटेवरच्या गावात प्रथमच चिपळूणच्या एस. टी. स्टॅन्डच्या स्टाइलचा सडास दिसला, आणि नतर इतस्ततः म्हशी भटकताना दिसल्या. तेव्हा आपण जणू काय माल्वणला आलो अस वाटून सौ. वती भयकर खूष झाली आणि तिने बिनतक्रार सहा रुपये म्हणजे सहाशे लिरा खर्च करून दोन कप कॉफी मागविली. उत्कृष्ट इटालियन वाइनच्या बाटलीला फक्त तीन रुपये पडतात.

नेहमीप्रमाणे वाटेत एका वनराईत आम्ही जेवण घेतले. इटलीतल्या या छोट्या गावातल्या दुकानात बीअर, फळे, ब्रेड, जाम, चीज, केक्स, कोक फार स्वस्त होते. मी सहा बीअर्सचा एक जुडगा सहा रु. ला घेतला. सौ. साठी दोन कोकाकोला. सफरचद होतीच. ॲन्जेलोने म्हणजे आमच्या ड्रायव्हरने रस्त्यात एका पिकनिक स्पॉटवर गाडी थाबवली. युरोपात रस्त्यावर मध्येच आडवळणाला खास विश्रांतिस्थाने केली आहेत. तिथ गाड्या थाबवून तुम्ही विश्राती घेऊ शकता. फराळ करू शकता. आम्ही सर्वांनी पथाऱ्या पसरल्या आणि फराळाला सुरुवात केली. वनभोजनात देवाण-घेवाण असतेच. खाणपिणं झाल्यानतर प्रत्येकाने कचरा पिशवीत भरला आणि मोटरीतील कचऱ्याच्या डब्यात टाकला. अशा तऱ्हेने आम्ही आमचे दुपारचे भोजन आटोपून व्हेनिसच्या मार्गाला लागलो.

व्हेनिसला आम्ही सध्याकाळी म्हणजे साडेआठला आलो. युरोपात रात्री नऊ वाजेपर्यंत छान ऊन असत. व्हेनिस हे तस म्हटल तर एक छोट गाव. नुसत चालायच म्हटल तर दोन दिवसात हे गाव पाहता येईल. रस्ते आमच्या पढरपूरसारखे अरुद. दगडी. पण व्हेनिसचा अतर्भाग पाहायचा तर या रस्त्याचा उपयोग नाही. कारण दोनशे छोटी छोटी बेटे पुलानी एकत्र जोडून हे गाव तयार करण्यात आले आहे. त्यामुळे व्हेनिस पाहायच असेल तर गोंडोलातून प्रवास केला पाहिजे. गोंडोला म्हणजे

छोटी होडी. हे होडीवाले सेन्ट मार्क्स स्क्वेअरच्या जवळ काठाला उभे असतात. याशिवाय अधिक आकर्षक गोंडोला या खाजगी अथवा टॅक्सी-प्रमाणे वाहतुकीला वापरतात. साधारण प्रत्येक घराच्या पुढे एका खांबाला ही खाजगी गोंडोला बांधलेली असते. कल्पनाच करायची तर दादरला व्हेनिसचं रूप द्यायचं तर रानडे रोड, तुळशी पाइप रोड, लेडी जमशेटजी रोड या रस्त्याऐवजी तिथं पाणी आहे अशी कल्पना करा. म्हणजे खाडके बिल्डिंगमधले नायडू किंवा चिटणीस आपल्या गोंडोलातून वल्ही मारीत मारीत दादरच्या मंडईत जातील. तिथं गर्दी फक्त गोंडोलाची. हॉटेलच्या



बाहेरही असेच गोंडोला. आमच्यासाठी चार–पाच गोंडोला तयार होते. एका गोंडोलावर एका हातात भात्याच्या पेटीसारखे वाद्य घेऊन गाणारा गवई उभा होता. आम्ही गावात एक चक्कर मारली. आमच्या समवेत त्याचं गायन चालू होतंच. त्याचा अर्थ कळला नाही. पण ते एक प्रेमकाव्य आहे असे आमच्या गाइडने सांगितले. रोमिओ ज्यूलिएटच्या खिडकीसमोर उभा राहून कसं गात असावा याची कल्पना आली. वाटेत गावातली सुंदर सुंदर उपाहारागृहे लागली. तिथं होडीतून लोक येत होते, जात होते. दोन घरांना जोडणाऱ्या कमानीच्या खालून आमची होडी जाई. हे गावातले पाण्यावरचे छोटे फ्लाय ओव्हर. त्या फ्लाय ओव्हरवर उभे राहून इटालियन स्त्री-पुरुष आमच्या सोबत्याचे गायन ऐकत आमच्याकडेही

छोटी होडी. हे होडीवाले सेन्ट मार्क्स स्क्वेअरच्या जवळ काठाला उभे असतात. याशिवाय अधिक आकर्षक गोंडोला या खाजगी अथवा टॅक्सी-प्रमाणे वाहतुकीला वापरतात. साधारण प्रत्येक घराच्या पुढे एका खांबाला ही खाजगी गोंडोला बांधलेली असते. कल्पनाच करायची तर दादरला व्हेनिसच रूप द्यायच तर रानडे रोड, तुळशी पाइप रोड, लेडी जमशेटजी रोड या रस्त्याऐवजी तिथ पाणी आहे अशी कल्पना करा. म्हणजे खाडके बिल्डिंगमधले नायडू किंवा चिटणीस आपल्या गोंडोलातून वल्ही मारीत मारीत दादरच्या मंडईत जातील. तिथ गर्दी फक्त गोंडोलांची. हॉटेलच्या



बाहेरही असेच गोंडोला. आमच्यासाठी चार–पाच गोंडोला तयार होते. एका गोंडोलावर एका हातात भात्याच्या पेटीसारखे वाद्य घेऊन गाणारा गवई उभा होता. आम्ही गावात एक चक्कर मारली. आमच्या समवेत त्याच गायन चालू होतच. त्याचा अर्थ कळला नाही. पण ते एक प्रेमकाव्य आहे असे आमच्या गाइडने सांगितले. रोमिओ ज्यूलिएटच्या खिडकीसमोर उभा राहून कस गात असावा याची कल्पना आली. वाटेत गावातली सुंदर सुंदर उपाहारगृहे लागली. तिथं होडीतून लोक येत होते, जात होते. दोन घरांना जोडणाऱ्या कमानीच्या खालून आमची होडी जाई. हे गावातले पाण्यावरचे छोटे फ्लाय ओव्हर. त्या फ्लाय ओव्हरवर उभे राहून इटालियन स्त्री-पुरुष आमच्या सोबत्यांचे गायन ऐकत आमच्याकडेही

कुतूहलाने पाहात होते.

ही व्हेनिसची तासाभराची नौकाविहाराची सगीत सहल आटोपून आम्ही आमच्या हॉटेलमध्ये परत आलो.

आज हॉटेलात प्रथमच जेवणात भात दिसला. मासे पण होते. फळे आणि पुडिंग पाहून आमच्या सौ. च्या तोंडाला पाणी सुटले आणि बऱ्याच दिवसानी आपल्या आवडीचा पदार्थ पाहून तिला चक्क गहिवरून आले. हॉटेलशेजारी असणाऱ्या एका दुकानातून मी साडेचार रुपयाला एक वाइनची बाटली आणली. भात असताना वाइनची काय मातवरी म्हणून सौ. ने वाइनला स्पर्श करायला नकार दिला. मी पण आग्रह न करता तिला भात आणि माशाचा समाचार घ्यायला परवानगी दिली. इटालियन सेविका हसतमुख आणि तत्पर होत्या. हॉटेलात लोण्याची टचाई दिसली. अर्थात आम्हाला काय हवय ते त्याना भाषा येत नसल्यामुळे कळेत नव्हत. लोण्यावाचून अडलं ते अमेरिकन लोकाच. आम्ही भात खाऊन तृप्त होऊन खोलीत परत आलो आणि दिवसभराच्या श्रमाने झोपेच्या चटकन आधीन झालो.

. १४ .

# व्हेनिस दर्शन

इटलीत युरोपच्या इतर श्रीमत देशाच्या मानाने फार दारिद्र्य आहे. त्यामुळे कामगाराचे सप, वेदिल्ली, नागरी जीवनातील बेशिस्ती, सरकारी अधिकाऱ्याचा मग्रूरपणा, लाचलुचपत याचा इथे भारताप्रमाणे सुकाळ आहे. आम्ही ज्या दिवशी व्हेनिसला पोचलो त्या दिवशी सार्वजनिक सप असल्यामुळे वाटेतली उपाहारगृहे बद होती. पण सप नसला तरी इथले कामगार आणि सरकारी कर्मचारी आमच्यासारखेच स्थितप्रज्ञ आहेत. मिलान ते पॅरिस या पत्राला महिना लागतो. इटालियन लोकात आमच्यासारखीच भयानक अस्वच्छता आहे. त्यामुळे इथेही उपाहार-गृहाना १ ते ४ असे गुणवत्तेप्रमाणे क्रमाक दिलेले असतात. चार नबरचे उपाहारगृह म्हणजे आमच्या परळ विभागातील हॉटेल. इटालिन लोक भावनाप्रधान आणि बडबडे, तसेच कुटुबप्रेमी. दारिद्र्यामुळे कोणतेही काम करायला तयार. त्यामुळे आमच्याकडे जसे केरळाइट तसे युरोपात इटालियन लोक सर्वत्र विखुरलेले आहेत आणि ते या अन्य सपन्न राष्ट्रात फार हलक्या दर्जाची कामे करीत असतात. त्यामुळे त्याना सपन्न राष्ट्रात फार मानहानीचे जीवन जगावे लागते. परदेशी प्रवाश्याच्या सदर्भात इटली-तील टॅक्सीवाले मुंबईच्या टॅक्सीवाल्यासारखे अप्रामाणिक आणि वेळ-प्रसगी प्रवाश्याला लुबाडण्याची सधी न गमावणारे. रस्तोरस्ती विक्रेते तुम्हाला अडवतात आणि वाईट माल तुमच्या गळ्यात अडकवतात. इटलीच्या या विक्रेत्यात बनावट घड्याळाचे पेव फुटलेले असते. स्विस वॉचेस म्हणून चक्क खोट्या डायली लावलेली घड्याळे हे परदेशी प्रवाश्याच्या गळ्यात बाधतात. त्यामुळे पाच हजार लिरा किमतीचा माल ते शेवटी एक हजार लिरापर्यंत द्यायला तयार. आम्ही व्हेनिसच्या मार्केटात काही केळी विकत घ्यायला गेलो. युरोपच्या मानाने इथे केळी फारच स्वस्त होती. दीड

रुपयाला एक केळे. स्वित्झर्लंडमध्ये पाच रुपये देऊन एक केळे विकत घेण्याची हिंमत झाली नाही. त्यामुळे व्हेनिसच्या या रस्त्यावरच्या भाजीबाजारात— अगदी रानडे रोड छाप— आम्ही केळी घेतली. विक्रेती होती म्हातारी इटालियन. तिने सुटे पैसे नाहीत म्हणून त्याच्या ऐवजी आम्हाला दोन बोरे दिली. सुट्या पैशाऐवजी बोरे, शेंगा, गाजरे गळ्यात बांधण्याचे हे तंत्र खास इटालियन.

युरोपात इटलीची हवा सर्वांत उष्ण. रोम हे जवळ जवळ मुंबईच्या हवेशी स्पर्धा करणारे शहर. ऑगस्ट महिन्यात तर इथे फार उन्हाळा असतो. त्यामुळे दुकाने सकाळी साडेआठला उघडतात आणि साडेबाराला बंद होतात. परत चारला उघडतात आणि आठला बंद होतात. आठवड्यातून एक दिवस रजा. बँका फक्त सकाळी नऊ ते दीडपर्यंत उघड्या असतात.

इथे पोस्टल सर्विसेस महाग आहेत. इटलीहून न्यूयॉर्कला पोस्ट कार्ड पाठवायचे तर सव्वा दोन रुपये पडतात. आपल्यासारखेच इटलीत तंबाखूवाल्याच्या दुकानात पोस्टाचे स्टँप्स विकत मिळतात.

इटलीतील हा भ्रष्टाचार इटलीतील राजकीय जीवनातही बोकाळला आहे. त्यामुळे केवळ भ्रष्टाचारापायी इटलीच्या गेल्या राष्ट्राध्यक्षाना पदत्याग करावा लागला. दक्षिणेत इटलीची परिस्थिती तर फार भयानक आहे— येथील सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार, दारिद्र्य, लोकांचा खुशालीपणा, स्त्रियांचे दैन्य. चूल आणि मूल यात इटालियन स्त्री गुरफटलेली आहे. स्त्रियांना शिक्षण नाही. बेकारीमुळे मिलानसारख्या औद्योगिक शहराकडे दक्षिण इटलीतील तरुण स्त्रियांचे लोंढे वळत असतात. त्यांच्यावर टपून बसलेले वेश्यांचे दलाल तिथे शेकड्याने आहेत. त्यामुळे या मुली वेश्यागृहात विकल्या जातात. मिलानसारख्या शहरात रस्त्यावर भिकारी आणि वेश्या यांचा गजबजाट असतो. मिलान हे तर इटलीतील मोठे कलाकेन्द्र. मिलानमधील 'लिओ नार्दो द व्हिन्सी'चे 'लास्ट सपर' हे ख्यातनाम चित्र पाहण्याचे माझे एक फार दिवसांचे स्वप्न होते. त्यासाठी दहा वर्षांपूर्वी मी इटलीत मिलानला गेलो तेव्हा तेथल्या माझ्या मित्राने मला सावधगिरीचा इशारा दिला की अशा आर्ट गॅलरीच्या अवतीभोवती वेश्या आणि भिकारी यांच्या तावडीतून सुटणे कठीण आहे. कारण पोलिसही यांच कमाईवर जगत असतात.

युरोपात प्रवास करून इटलीत येताच आमच्या अँजेलो या ड्रायव्हरने

प्रथमच हॉर्न वाजवला. नाही तर अन्य राष्ट्रात या अडीच हजार मैलाच्या प्रवासात आम्ही एकदाही कोणत्याही गाडीचा हॉर्न ऐकला नाही. अगदी मुंबई—पुणे रस्त्याची आठवण आली.

व्हेनिसच्या मार्केटात बिस्किटाचा पुडा १० रुपयाना. स्कॉच व्हिस्की ५० ते ८० रुपये. वाइन पाच ते तीस रुपये. पण इटलीत कामगारलोकांचे आवडते मद्य म्हणजे ग्रापा. ही आमच्या बेवड्यासारखी कडक दारू. इटालियन कामगार जेवणानंतर ग्रापाचे घुटके घेतो. कॅफे कॅरेक्टो म्हणजे कॉफी आणि ग्रापाचे मिक्श्चर. ग्रापा, बुकीनो किंवा डीला मुला ही इथली राष्ट्रीय मद्ये. या 'ग्रापा' दारूत नार्दिनी नावाची ग्रापा ही सर्वांत उंची दारू. किंमत साधारण वीस रुपये बाटली. इटालियन कामगार कारखाना सुटला की, वाटेत एक 'घुटका' मारून सहा वाजता घरी येतो. जेवणापूर्वी कपारी किंवा ॲमेरॉलसारखी तुरट वाइन. ही मध्यमवर्गीयात लोकप्रिय. जेवणात ट्राऊट मासा आणि व्हाइट वाइन असली तर चैन. इटालियन हा खादाड. तो खाण्यासाठी जगतो म्हणा ना ! त्याच्या सार्वजनिक जीवनात जेवणाला फार महत्त्व असते. मांस, मासे, करी, बटाटे, फळे, ब्रेड, वाइन हे जेवण. इटलीत डबाबंद फळे आणि भाज्यांची आवड नाही. बायका सकाळी जाऊन ताज्या भाजीपाल्याची अथवा माश्याची खरेदी करतील. जेवताना प्रत्येक कामगाराला एक बाटली वाइन हवीच हवी. रविवारी सकाळचे जेवण म्हणजे सगळे कुटुंब एकत्र जेवणार.

इटलीत जागोजाग कौलारू घरे दिसतात. युरोपात अशी घरे पाहून मजा वाटली. इथल्या बायकांना घरातल्या लाद्या धुणे, व त्या सतत स्वच्छ ठेवण्याखेरीज चैन पडत नाही. कडेवर पोरे घेणे ही त्यांची हौस. जीवनात शिस्त नाही. त्यामुळे बस, मोटर, सिनेमा, कुठेही क्यू नाही. बसचा आठवड्याचा पास मिळतो किंवा आगाऊ छापील तिकिटांचे एक पुस्तक विकत मिळते ( तंबाखूवाल्याकडे ).

रोममधले इटालियन्स हातवारे करून बोलतात. आम्हाला पेट्रोल पंपावर एक इटालिन ट्रक ड्रायव्हर भेटला. तो सात वर्षे जमशेटपूरला होता. आपल्याला भारत किती आवडतो हे त्याने आम्हाला आवर्जून सांगितले.

इथे पदव्यांचा सुकाळ आणि त्यांच्याशिवाय आपल्याला प्रतिष्ठा नाही असे लोकांना वाटते. व्हिजिटिंग कार्डसचे मोठे बंड. व्हेनिसजवळची गावे बारामती-दौंडची आठवण करून देणारी. आम्ही सकाळी हॉटेलातला तो

पाव-चहाचा भयानक नास्ता करून गावात आलो. दुपारचे जेवण तिथेच घ्यायचे. पण व्हेनिस तसे स्वस्त नाही. आमच्या फोटोमध्ये दिसतात तशा छोट्या हॉटेलात सॅन्डविच आणि कॉफीसाठी माणशी वीस रुपये, चार केळयांना सहा रुपये, मिळून आम्हाला या ' स्वस्त जेवणाला ' सेहेचाळीस रुपये पडले ! शिवाय दोन रुपये टिप.

चारशे पूल आणि शंभर कालवे असणारे व्हेनिस शहर हे इटलीतील एक छोटेखानी गाव. व्हेनिसची गंमत पाहायची तर तिथ रात्रीच थडकले पाहिजे. ग्रान्ड कॅनालची एक ट्रिप म्हणजे स्वप्न आहे. सेंट मार्कच्या जवळच शेकडो गोंडेला पाण्यात तरंगत असतात. चर्चच्या दिव्याचे छान प्रतिबिंब कॅनालमध्ये पडलेले असते. सारे वातावरण कसे स्वच्छंद आणि मुक्त. हजारो परदेशी पर्यटकांची नुसती झुंबड उडालेली असते. पिआझा सेंट मार्को-मधील बॅन्डचे सूर कानी ऐकू येत असतात. व्हेनिसच्या या सेंट मार्क चौकात अमेरिकन टूरिस्टापेक्षा फ्रेंच आणि जर्मन पर्यटकांची गर्दी जास्त असते.

सेंट मार्क बॅसिलीका हा व्हेनिसचा सर्वांत मोठा चौक. रात्री हा चौक माणसांनी फुललेला असतो. फुटपाथवर खुर्च्या आणि टेबले टाकून लोक मध्यरात्रीपर्यंत खातपीत असतात. युरोप हे मध्यरात्रीपर्यंत जागृत असते. इथं रात्रीच लोक जागे होतात. ते नृत्याने बेहोष होतात. मद्याने सुस्तावतात. वाग-ण्यात अमेरिकन छिनालपणा नाही. युरोपला स्वतःची अशी संस्कृती, स्वतःची अशी शान आहे. शेकडो वर्षांच्या इतिहासाची स्मृती जागृत आहे. महा-युद्धाचा जबरदस्त आघात सोसूनही, युरोपने स्वतःच्या चिकाटीवर व हिंमती-वर नवजीवन निर्माण केले. या ऐहिक जीवनाच्या सुखोपभोगाचा उत्कर्ष इथे दिसतो. पण या उपभोगाला एक शिस्त आहे, आकार आहे. पियाझा सान मार्क या चर्चच्या समोर एका इमारतीच्या गच्चीवर चार ब्रॉसचे घोडे आहेत. हे १४ व्या शतकात कॉन्स्टाटिनोपल येथून व्हेनिसला आणले गेले. पण व्हेनिस चर्चची रम्यता त्याच्या भव्यतेत नाही. रोममधील सेंट पीटर्स किंवा कलोनमधील कथीड्रल याची प्रचंड आवाढव्यता येथे नाही. मायकेलँजेलोच्या अज्ञात, गूढ अशा चिरंतन शिल्पकलेचे या चर्चमध्ये प्रत्यतर नाही. पण या चर्चमधील मोझॅइक काम हे सतत सातशे वर्षांच्या कष्टाचे फल आहे. त्याचा सोनेरी मुलामा आजही टवटवीत आहे. त्यामुळे पिआझा सानला युरोपातील सुवर्ण मंदिर म्हणतात.

आम्ही या जगप्रसिद्ध चौकात सुमारे चार तास घालवले. व्हेनिसला

काचकामाच्या वस्तू फार चांगल्या होतात. आम्ही एका काच कारखान्याला भेट दिली. तेथे एका कलाकाराने आमच्या समोर काचेचा रस फुग्यातून बाहेर काढून त्याचे पक्षी, जनावरे, रंगीबेरंगी ग्लासेस आम्हाला करून दाखवले. इथले हे काचकाम— विशेषतः वेगवेगळ्या तऱ्हेच्या बरण्या, लेमन सेटस्, काचकामे, चषक, सुरया, फुलदाण्या, झुंबरे पाहून आमचे डोळे तृप्त झाले. या साऱ्याच वस्तू इतक्या आकर्षक आणि कलात्मक होत्या की, त्याच्या किमती विचारण्याचे आम्हाला धैर्य झाले नाही. एखाद्या राजप्रासादात भोगण्यासारख्या त्या वस्तू आम्ही डोळे भरून पाहिल्या.

सेंटमार्कमधील आमचे सँडविच, कॉफी हे भोजन आटपून आम्ही फ्लॉरेन्सला आलो. कारण आमचा मुक्काम होता त्यानतर फ्लॉरेन्सला. त्यामुळे इटलीतल्या आणखी एका सौंदर्यस्थळी आलो. तारीख होती. २९ जुलै १९७८.

. १५ .

# मायकेल अँजेलोच्या जन्मभूमीत

फ्लॉरेन्स हे इटलीतील एक रमणीय शहर. पण युरोपातील अन्य शहरांची स्वच्छता येथे नाही. इटालियन लोक हे आम्हा भारतीयासारखे अस्वच्छ आणि गबाळ. फ्लॉरेन्ससारख्या गावात कचरा आणि मलमूत्र याचे प्रथमच दर्शन झाले आणि मुंबईची आठवण झाली. पाच लाख लोकसंख्येचे हे गाव. चित्रकार आणि शिल्पकार याचे महान तीर्थक्षेत्र.



मायकेलँजेलो, बर्नीनीसारखे महान शिल्पकार येथे वावरले आणि त्यांनी आपल्या असामान्य कलाकृती निर्माण केल्या. फ्लॉरेन्स गाव दाखवणारा आमचा मार्गदर्शक हा शिल्पकलेचा चाहता आणि चित्रकलेचा द्वेष्टा. फ्लॉरेन्समध्ये तुम्हाला आठ दिवसही पुरणार नाहीत एवढी चित्रगृहे आहेत. जगातील कानाकोपऱ्यातील चित्रकला आणि शिल्पकला याचे रसिक

चाहते आणि विद्यार्थी फ्लॉरेन्समध्ये गर्दी करतात. भिकारणी आणि झाडूवाले याची गर्दी टाळून तुम्हाला गाईड नेतो तो प्रथम फ्लॉरेन्सच्या कथीड्रलमध्ये. भव्य चर्च म्हणजे युरोपच्या प्रत्येक शहराचे वैभव. त्यात पहिला क्रमाक रोमचा, दुसरा कलोन आणि तिसरा फ्लॉरेन्सचा. पण फ्लॉरेन्सवर छाया पडलीय मायकेलँजेलोची. चित्रकला आणि शिल्पकला याना पडलेले एक चिरतन अद्भुत स्वप्न म्हणजे मायकेलँजेलो. १७४५ साली या चित्रशिल्प महर्षीचा जन्म झाला आणि एकविसाव्या वर्षी त्याने आपल्या मुलायम आणि निर्दोष अशा शैलीने सारे युरोप खड हादरवले. चित्र आणि शिल्प या दोन्ही प्रांतात कुचला घेऊन त्याने रंगाला रूप दिले तर छिन्नी घेऊन त्याने अचेतन पाषाणाला बोलके केले. फ्लॉरेन्स काय किंवा रोम काय, या दोन शहरावर मायकेलँजेलोच्या असामान्य आणि अपूर्व कलेची गडद छाया पडली आहे. त्याचा प्रतिस्पर्धी बर्नीनी आणि राफेल हे तेवढेच समर्थ कलाकार. आमचा गाईड हा बर्नीनीचा पाठीराखा होता. कथीड्रल-मधील मायकेलँजेलोच्या असामान्य कृती दाखवत असता, अथवा त्याने निर्माण केलेला डेव्हिड (एका निर्भय पुरुषोत्तमाचे प्रतीक) हे सारे दाखवीत असता तो सारखा म्हणायचा की तुम्ही लोक एवढे मायकेलँजेलो-बाबत वेडे का? खरे पाहिले असता आमच्या अमेरिकन प्रवासी बधूपैकी फारच थोड्याना मायकेलँजेलो माहीत होता. मी त्याला म्हटले, 'बर्नीनी हा मोठा शिल्पकार आहे, यात शकाच नाही. पण मायकेलँजेलोने या ठिकाणी जी आपली अर्धवट पुरी झालेली कलाकृती— तीत जो जिवतपणा, भावनिर्देशन आणि सफाई दाखवली आहे ती— बर्नीनीकडे आहे का? मायकेलँजेलोचे आयुष्य म्हणजे एका कलावंताने भोगलेल्या छळवादाची कहाणी. पोपने त्याचा एवढा मानसिक छळ केला की, चाळीस वर्षांच्या त्याच्या हयातीत मोझेसचा प्रचड पुतळा ही या छळाची परिणती. पण सिलेस्टीनच्या चॅपेलमध्ये मायकेलँजेलोचे एक महान चित्र आहे, दि लास्ट जजमेंट. थॉमस क्रॅव्हनने म्हटले—छळवादातूनही चित्रकार आपली सुटका करून घेतो ती एखाद्या असामान्य कलाकृतीच्या निर्मितीद्वारा. जगातल्या जवळ जवळ सर्व थोर थोर चित्रकला समीक्षकानी असे म्हटले आहे की, 'दि लास्ट जजमेंट' म्हणजे, मानवाच्या हातून एकहाती निर्माण झालेली ही पहिली आणि शेवटची असामान्य कलाकृती.' कार्लाईलने त्याला 'हीरो ऑफ दि आर्टिस्ट' म्हटले ते यामुळेच. पण फ्लॉरेन्समधील त्याने निर्माण

केलेला डेव्हिड हा पाहिल्याशिवाय कोणत्याही शिल्पकला-भक्ताला तरणो-पाय नाही. या पुतळ्याचा आकार प्रचंड. त्याचा रुबाब, सामर्थ्य हे तर तुम्हाला मोहवून टाकतेच, पण त्यामागची मायकेलँजेलोची आक्रमक प्रेरणा आहे ती तुम्हाला चकित करते. या त्याच्या कृतीत त्याने शरीरशास्त्राचे ते कटाळवाणे नियम पुरते झुगारून दिले आहेत. कारण त्या-नंतरच्या त्याच्या सर्व शिल्पकृतींत तुम्हाला हे शरीरशास्त्राचे कटाळवाणे बार-कावे सतत आढळतील. डेव्हिडचा पुतळा तुम्ही नीट पाहिलात तर तुम्हाला असे आढळेल की या तरुणाची वाढ व्हायला— पूर्ण वाढ व्हायला— अजून दोन—तीन वर्षे हवी होती. कारण त्याच्या चेहऱ्यावर किंचित कोवळेपणा आहे. त्यामुळे तुम्ही हा पुतळा जरा निरखून पाहिलात तर तुम्हाला असे आढळेल की, यातील काही उणीवा या जाणूनबुजून ठेवल्या आहेत की काय न कळे. फ्लॉरेन्समध्ये डॉन्टेलो आणि व्हेरोचिओ ह्या डेव्हिडच्या कलाकृती आहेत. आमच्या गाईडच्या मते त्या मायकेलँजेलोपेक्षा अधिक चांगल्या आहेत. त्यांच्या डेव्हिडमध्ये वास्तवता असली तरी त्या छोट्या आणि ब्रॉन्झमध्ये आहेत. काही शिल्पसमीक्षकांच्या मते डेव्हिडचे डोके हे त्याच्या एकूण शरीराच्या मानाने जास्त मोठे आहे. त्यामुळे डेव्हिड हा आदर्श सौंदर्याचे प्रतीक ठरत नाही. पण हे मला पटले नाही. या शौर्यशाली तरुणाच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास नुसता ओसंडतोय. त्याच्या भुवया किंचित वक्र झाल्या आहेत. नाकपुड्या थरथरताहेत. त्याच्या गळ्याचे हाड पुढे आले आहे. उजव्या पायात मांडीतील ताठपणा दिसतोय. जणू काय जिंकणाऱ्या गगनाला गवसणी घालणाऱ्या महत्त्वाकांक्षेचे प्रतीक माय-केलँजेलोने साकार केले आहे. त्याच्या हातातील गोफणीचा दगड आता तो जणू काय भिरकावणार असं वाटतं. हीथ विल्सनसारखा मायकेलँजेलोचा टीकाकार या पुतळ्याच्या बाबतीत थोडी माघार घेतो.

मायकेलँजेलोच्या या कलाकृती मी माझ्या मागच्या युरोपभेटीत डोळे-भरून पाहिल्या होत्या. १६ व्या शतकातल्या एका फ्रेंच शिल्पसमीक्षक— एम. मॅरीएत— याने मायकेलँजेलोबद्दल म्हटले आहे : ‘ मी मायकेलँजेलोला प्रत्यक्ष छिन्नी हातात घेऊन काम करताना पाहिलय. वयाच्या साठाव्या वर्षी तो ज्या तडफेने काम करीत असे ती तडफ त्याच्यापेक्षा वयाने कितीतरी लहान असणाऱ्या शिल्पकाराकडेही नव्हती. एखादा कठीण पाषाण त्याच्यासमोर ठेवा, पंधरा मिनिटात मायकेलँजेलो जेवढ्या खपल्या काढी

तेवढे काम तीन–चार तरुणांना एका तासातही जमत नसे. आणि हे पाहात असताना अशी भीती वाटायची की, पाषाणाचा चुराडा होतो की काय! कारण शिल्पकलेत एकदा खपली निघाली की दुरुस्तीला वाव नाही. कारण एकदा डोळा, भिवई अथवा नाक बिघडल की तो दगड टाकूनच दिला पाहिजे.'



फ्लॉरेन्स हे मायकेलँजेलोचे गाव. त्याची कर्मभूमी–जन्मभूमी. तुमची हौस फिटेल, पण वेळ पुरणार नाही एवढी इथे संपत्ती आहे. शिल्पकलेच्या अभ्यासकाना इथ बर्नीनी आहे, राफेल आहे, व्हिन्सी आहे. इटलीने निर्माण केलेले कलाप्रातातील असामान्य, अद्वितीय, अलौकिक असे ऋषि-महर्षी आहेत. हे सारे पाहात असताना तुम्हाला सारखी आठवण येते ती मायकेलँजेलोची.

फ्लॉरेन्सला सकाळी पुष्कळ भटकलो. अगदी पाय मोडेपर्यंत. पण


कंटाळा आला नाही. युरोपमधील चित्रकला ही चर्चेच्या आश्रयाने वाढली. त्यामुळे चित्रकाराचे चित्रविषय हे बरेचसे खिश्चन धर्मापुरते मर्यादित राहिले. पण मायकेलँजेलो, राफेल, लिओ नार्दो द व्हिन्सी, बर्नीनी या सगळ्या कलाकाराचे सामर्थ्य एवढे प्रचड की त्यानी या धर्मबंधनातील कलेला एक शाश्वत, चिरतन रूप दिले. त्यांनी आपली सुखदुःखे यातूनच बोलकी केली. त्यामुळे 'मेडोना अँड दि चाइल्ड' यासारखी कलाकृती ही धर्म-भावनेचे अधिष्ठान असूनही जगातील एका शाश्वत, चिरतन अशा मानवी भावनाचे प्रकटीकरण करणारी श्रेष्ठ कलाकृती ठरते ती केवळ मायकेलँजेलो-सारख्या अद्‌भुत शिल्पकाराची किमया म्हणून.

फ्लॉरेन्सच्या त्या सकाळी आम्ही हे सारे डोळे भरून पाहिले, आणि रोमच्या वाटेने निघालो. इटलीतले रस्ते फारच चागले. आमचा ड्रायव्हर हा इटालियन. त्यामुळे त्याला इथली खडानुखडा माहिती. आमचा गाईड जॉन हा पण उत्तम इटालियन बोलतो. फ्लॉरेन्सच्या बाजारात आम्हाला दोन गोष्टी लक्षात आल्या. त्या म्हणजे इथ अननसाला अननस म्हणतात आणि साबणाला साबुनी म्हणतात. तसेच वडिलाना बॉबो म्हणतात लहान मुल तर बाबा अशी हाक मारत. त्यामुळे जरा गमत वाटली.

. १६ .

# जन्मा यावे रोम पाहावे

आतरराष्ट्रीय पर्यटनक्षेत्रात जगातील फक्त दोनच शहराबद्दल लोकाना अनिवार उत्सुकता आहे. ती दोन शहरे म्हणजे रोम आणि दिल्ली. कारण प्राचीन इतिहास, वास्तुशिल्पाचे विविध नमुने, भव्यता या सदर्भात या दोन



शहराच्या तोडीला तोड अशी दुसरी शहरे सापडणे कठीण. पण दिल्लीपेक्षा रोमचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे तेथील चित्रकला आणि शिल्पकला याचे अमोल भाडार. हा अपूर्व खजिना दिल्लीपाशी नाही.

सोळाव्या शतकातल्या तीन असामान्य कलाकारानी कला आणि कलाकार याना प्रथमच खरी प्रतिष्ठा मिळवून दिली. ते तीन जादूगार म्हणजे मायकेलँजेलो, लिओनार्दो द व्हिन्सी आणि राफेल. मायकेल अँजेलोचे रोममधील ' दि लास्ट जजमेन्ट', व्हिन्सीचे मिलानमधील ' दि

लास्ट सपर' आणि राफेलचे मिलानमधील 'मॅटोना' ही तीन चित्रे पाहिल्याशिवाय कोणत्याही खऱ्या रसिकाची युरोपयात्रा पूर्ण झाली असे म्हणता येणार नाही.

२० जुलैला सध्याकाळी आम्ही रोममधील हॉटेल मिडास पॅलेस या आलीशान हॉटेलमध्ये प्रवेश केला. फ्लॉरेन्स ते रोम हा प्रवास गमतीदार झाला. इटलीत इम्पोर्टेड वस्तूचे बंड फार. विशेषतः इम्पोर्टेड सिगारेटस वाटेत नाक्या-नाक्यावर विकणारी पोरे भेटली. इटलीत प्रथमच आमच्या म्हशी दिसल्या. कण्हेरीची झाडेही पाहून थोडे घरच्यासारखे वाटले. रस्त्यात, घराच्या आवारात दोरीवर कपडे वाळत घातलेले पाहून मुबईची आठवण झाली. इटालियन लोक कुटुबवत्सल. फॅमिली प्लॅनिंगवर त्याचा फारसा विश्वास नाही. बायको चक्क कडेवर मुले घेऊन बाजारहाट करताना पाहून पुण्याच्या मडईची आठवण झाली. युरोपच्या प्रवासात आमच्या पुण्या-मुबईच्या रस्त्याची आठवण येईल असा प्रथमच मोटर अपघात दिसला.

इटलीत सप आणि हरताळाचे बंड आहे. आज सार्वत्रिक सप होता. त्यामुळे रस्त्यावरची सारी हॉटेले बद होती. युरोपात वाटेतील विश्रामगृहात टॉयलेटला जायचे असेल तर त्याला पैसे द्यावे लागतात. हे पैसे गोळा करण्याचे काम एक म्हातारी बाई करीत असते. साधारणपणे आठ आणे ते रुपयापर्यंत पैसे द्यावे लागतात.

आम्ही हॉटेलमध्ये गेलो तर तेथेही सप. त्यामुळे प्रत्येकाला त्याचे सामान स्वतःच्या हाताने वर न्यावे लागले. आमची रूम मोठी आणि ऐसपैस होती. खोलीत टेलीविजन होता. इटलीतील टी. व्ही. सुमार आहे. त्याचे दोन चॅनेल्स. त्यातील एक चॅनेल सरकारी आणि दुसरी चॅनेल डाव्या गटाकडे. रोममध्ये दैनिक वृत्तपत्राला दोन रुपये पडतात. हॉटेल-मध्ये स्ट्राइक असल्यामुळे बाहेर जाऊन जेवणे क्रमप्राप्त झाले. आमच्या रूममध्ये एका फ्रीजमध्ये सर्व तऱ्हेच्या वाइन्स, व्हिस्की, ब्रँडी याच्या बाटल्या भरलेल्या होत्या. त्याचे दरपत्रक टेबलावर ठेवण्यात आले होते. अर्थात हॉटेलातले दर आम्हाला परवडण्यासारखे नव्हतेच. आमचे हॉटेल गावा-पासून बरेच लाब असल्यामुळे हॉटेलने गावात जाण्यासाठी एक खास बस ठेवली होती. सकाळी नऊ ते सायंकाळी सातपर्यंत.

आम्ही हॉटेलात मस्तपैकी स्नान केले आणि सध्याकाळचा रोमचा फेरफटका करावा म्हणून हॉटेलच्या बसने बाहेर पडलो. युरोपमधल्या अन्य

शहरासारखीच रोमची रचना. ते टिनर नदीवर वसले असून लोकसंख्या अंदाजे तीस लाख. आम्ही बसने सेन्ट पॉलच्या आवारापर्यंत गेलो. तिथे रस्त्यावर आपल्याकडे रानडे रोडला जसे फेरीवाले तशी फेरीवाल्याची गर्दी होती. सध्याकाळी सात वाजता आमची बस परत हॉटेलकडे जाणार होती. पण आम्हाला कुठे तरी जेवायचे होते. त्यामुळे एका इग्रजी येत असलेल्या बाईला एखादे स्वस्त आणि चागले हॉटेल दाखव अशी विनती केली. तिने तो आपला बहुमान समजून मोठ्या अगत्याने एका खास इटालिअन पद्धतीच्या उपाहारगृहात नेले.

हॉटेलच्या मालकाने इटालियन भाषेत आमचे स्वागत केले आणि आमच्यासमोर मेन्यू कार्ड ठेवले. त्याला आणि तेथे असणाऱ्या वेटर्सना इग्रजी मुळीसुद्धा येत नव्हते. त्यामुळे मागवावे काय याचा प्रश्न पडला. शेवटी स्पगेटी हा ओळखीचा शब्द दिसला आणि आइस्क्रीम. त्याने वाइन हवी का म्हणून विचारले. अर्थात परवडण्यासारखी नसल्यामुळे आम्ही त्याची ऑफर नाकारली. एकूण सहा हजार लिरा म्हणजे साठ रुपये बिल झाले. युरोपच्या मानाने हे जेवण स्वस्तच वाटले.

अजून बाहेर चक्क ऊन होते. सध्याकाळचे आठ वाजले होते. टॅक्सी काही मिळेना. शेवटी खाजगी टॅक्सीवाल्यानी आम्हाला गराडा घातला आणि वीस हजार लिरांमध्ये म्हणजे २०० रुपयात तुम्हाला सोडतो असे सागितले. त्याचे इग्रजी दर सागण्यापुरतेच मर्यादित होते. चारजणाची टॅक्सी. आम्ही आमच्याबरोबर प्रवासात विशेष दोस्ती झालेल्या कॅनेडियन जोडप्याला बरोबर घेतले. आणि सव्वाआठला हॉटेलवर पोचलो. सबध टॅक्सीचे हॉटेलपर्यंतचे भाडे १५ रुपये. मात्र या ठिकाणी २०० रुपये मोजले. इटलीत भ्रष्टाचार, वशिलेबाजी, कामचुकारपणा, सप सर्वत्र चालू आहेत. अगदी भारताची आठवण येईल अशी. त्याचे हे प्रत्यतर आम्हाला टॅक्सीवाल्याने आणून दिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही सेन्ट पीटर्स हे चर्च पाहायला गेलो जगातले हे अतिप्रचड चर्च. सेन्ट पीटर्स म्हणजे मायकेलॅंजेलोच्या वास्तुशास्त्राचा भव्योदात्त आविष्कार. पोप ज्यूलिअसच्या महत्त्वाकाक्षेतून ही भव्य इमारत साकार झाली. ब्रामातीने त्याचा आराखडा तयार केला आणि त्याच्यानतर मायकेलॅंजेलोने सतत अठरा वर्षे या इमारतीच्या कामावर खर्च केली. ते नतर बर्नीनीने पुरे केले असे काहींचे म्हणणे तर काहींच्या मते

मायकेलँजेलोचे शिष्य, त्रिआकोमो देला पोर्ता आणि फोन्ताना या शिष्यांनी ते पूर्ण केले.

लेट रेनेसान्समधील ही कलाकृती आजपावेतो अनेक समीक्षकांच्या प्रशंसेस आणि टीकेस पात्र झाली आहे. याचा घुमट मायकेलँजेलोच्या मूळ कल्पनेप्रमाणे पूर्ण न होता त्याला एखाद्या कोनाचा आकार त्याच्या शिष्यांनी दिला. त्यामुळे काही समीक्षकांच्या मते हे एक नोवल फेल्युअर आहे. यातील प्रत्येक खांबावर निळ्या, पाढऱ्या आणि सोनेरी गिलाव्याने शेकडो संताची चित्रे रेखाटली आहेत. अत्यंत भव्य आणि उदात्त. याचा खरा साक्षात्कार सेन्ट पीटर्समध्ये होतो आणि त्याचा जनक मायकेलँजेलो याच्या अद्‌भुत प्रतिभेने आपण थक्क होऊन जातो. सेन्ट पीटर्सचे बाहेरचे आवार अत्यंत विस्तीर्ण असे असून तेथे पन्नास हजार भाविक विनासायास जमू शकतात.

रोममध्ये व्हॅटिकन सिटी हे पोपचे साम्राज्य. पोप हा स्वतः विमान-तळावरून हेलिकॉप्टरने आपल्या राजवाड्यात जातो. जगातले सारे भाविक ख्रिश्चन सेन्ट पीटर्स पाहण्यास उत्सुक असतात. पण यापेक्षा पोपचे प्रत्यक्ष दर्शन घेण्यासाठी आमच्याबरोबर एक गाईड होता. त्याच चर्चच्या मागे वेगवेगळ्या धार्मिक वस्तू विकण्याचे एक दुकान होते तेथे त्याने आम्हाला नेले. पण त्याअगोदर त्याने मायकेलँजेलोची ' पिएटा ' ही कलाकृती आम्हाला दाखवली.

' पिएटा ' म्हणजे ख्रिस्ताच्या मृत्यूनंतर कुमारी मातेने ख्रिस्ताचे प्रेत आपल्या मांडीवर घेतलेय आणि त्यासाठी ती शोक करतेय असा प्रसंग. युरोपातील जवळजवळ प्रत्येक शिल्पकाराने या विषयावर कलाकृती निर्माण केल्या आहेत, पण त्याला मायकेलँजेलोची तोड नाही. पण सेन्ट पीटर्सपेक्षा मायकेलँजेलोची मिलान येथे असणारी अपुरी अशी पिएटाची कलाकृती आहे. ती म्हणजे एक करुणरम्य काव्य आहे. नग्न पुतळा — ज्याला न्यूड म्हणतात— त्याला प्रतिष्ठा मिळाली ती या धर्मशिल्पात. पण मायकेलँ-जेलोच्या प्रत्येक न्यूडमध्ये जे कारुण्य ओसंडते आहे त्याला तुलनाच नाही.

त्यानंतर आम्ही सिस्टिन चॅपेलमधील त्याचे जगातील एक सर्वश्रेष्ठ कलाकृती म्हणून गाजलेले चित्र ' दि लास्ट जजमेन्ट ' हे पाहावयास गेलो. चॅपेलच्या छतावरचे त्याचे हे महान चित्र म्हणजे चित्रकलेच्या इति-हासातला एक अपूर्व चमत्कार आहे. सिस्टिन चॅपेल हे १४७२ मध्ये

बांधले गेले. बॉमिओ पोन्टेली या फ्लॉरेन्सच्या वास्तुशास्त्रज्ञाने १३२ फूट लांब आणि ४२ फूट रुंद असे हे चॅपेल आमच्या कोकणातल्या मांगरासारखे



आहे. पण या मांगराची दिगंत कीर्ती झाली ती मायकेलँजेलोच्या असामान्य कलाकृतीमुळे. 'वसारी' हा मायकेलँजेलोचा चरित्रकार. तो म्हणतो, 'चित्रकलेचा हा असामान्य आणि उत्तुंग आविष्कार आहे. १५ व्या शतकातील भित्तिचित्रात निसर्गदृश्याची लयलूट असायची.– प्राणी, फुले, झाडे– मायकेलँजेलोने या सर्वांना रजा दिलीय. त्याचा बायबलचा गाढा व्यासंग होता. आपल्या चित्रासाठी त्याने चॅपेलचे छत निवडले. जणू काय पाहणाऱ्या रसिकाला आपण स्वर्गाकडे डोळे लावले आहेत असा भास व्हावा.'

'लास्ट जजमेन्ट'मध्ये त्याने एकूण नऊ विषय घेतले आहेत. क्रिएशन, दि फॉल, दि डिलज, दिवस आणि अंधारातून प्रकाश वेगळा होतो, चंद्र आणि सूर्य यांची निर्मिती, पृथ्वी-सागराचे मानवीकरण, आदामची उत्पत्ती,

इव्ह, आदाम—इव्हचे पतन, नोआह, नोआहची मद्यासक्ती. या साऱ्या चित्रांत वास्तुशास्त्र आणि चित्रकला यांचा समसमासयोग झाला आहे. मायकेलँजेलोकडून हे काम कुठल्या तरी अज्ञात कुंचल्याने तर घडवले नाही ना असे वाटते. विश्व आणि मानव याच्या उत्पत्तीचा इतिहास चित्रित करताना मायकेलँजेलोने आपली सारी प्रतिभा पणाला लावली आहे. त्यातील शास्त्र, त्यातील सहजता, त्याची हलुवार शैली, त्याचा ओज आणि आवेश, व्यक्तिचित्रणातील ठसठशीतपणा हा साराच आगळा आणि अपूर्व आहे.


मायकेलँजेलो हा रुबेन्ससारखा रंगवेडा कलाकार नव्हे. रुबेन्सचे किंवा राफेलचे रंगप्रेम हा एक वेगळ्या लेखाचा विषय आहे. राफेल आणि रुबेन्स लालभडक रंगाचा अनिवार उपयोग करतात. पण या महान कलाकृती चित्रित करताना मायकेलँजेलोने रंगाची जी उधळण केली आहे ती सौम्य, शीतल अशा चांदण्यासारखी आहे. नोआहच्या स्नायूंचा बलदंडपणा



दाखविण्यासाठी त्याने लाल रंगाची छटा वापरली तर यातील असंख्य नग्न आकृतींसाठी पिंगट सफरचंदी रंगाचा त्याने उपयोग केलाय. हा उपयोग आदाम आणि ईव्ह यांच्या रेखाटनाला तर वेगळेच सौंदर्य प्राप्त करून देतो. हिरवागार रंग तसेच पिवळा रंग, वापरताना तो नारिंगी रंगाशी मिळताजुळता राहील अशी त्याने काळजी घेतली आहे.


मायकेलँजेलोची ही कलाकृती जगातील थोर थोर समीक्षकांच्या प्रेमाचा, आदराचा आणि टीकेचाही विषय आहे. रस्किनने, या चित्रात वैविध्य,

सौंदर्य आणि भावनिकता आहे असे म्हटलेय. मायकेलँजेलोवर एक मोठा आक्षेप म्हणजे त्याचे सर्वच चेहरे एकाच ठशाचे असतात; आणि स्त्रीचे



शरीरसौंदर्य त्याला कधीच आकृष्ट करू शकले नाही. राफेल आणि रुबेन्स-प्रमाणे तो मुग्ध किशोरी कधीही चित्रित करू शकला नाही. त्याची ईव्ह ही थोराड वाटते. पुरुषी वाटते. त्याचे डॉन आणि नाइट हे पुतळे स्त्रियांचे असले तरी त्याची शरीरे पुरुषी वाटतात.

इटालियन चित्रकारानी आणि शिल्पकारांनी ग्रीक शिल्पकाराप्रमाणे सुदर चेहरे निर्माण केले नाहीत पण मायकेलँजेलोचे वैशिष्ट्य असे की, त्याने तुमच्या कारुण्य, दुःख, यातना, चीड, त्वेष, असहाय्यता या साऱ्या भावना व्यक्त केल्या त्या मानवी शरीराच्या द्वारे. त्यासाठी त्याने स्नायू हे माध्यम वापरले. त्यामुळे ' पिएटा ' ही कृती पाहताना ख्रिस्ताचे दुःख हे त्याच्या शरीरातील स्नायूंच्या हालचालीतून साकार झाले आहे. मायकेलँजेलोचा हर्ष हा चेहऱ्यात प्रकट होत नाही तर शरीराच्या रोमारोमात प्रकट होतो. स्त्री-सौंदर्याची मुग्धता त्याला राफेल ( मॅडोना ), व्हिन्सी (लीडा), कॉरेडिओ ( डायना ) यांच्याप्रमाणे साकार करता आली नाही याचे कारण त्याला स्त्री-सौंदर्यापेक्षा पुरुष-सौंदर्याची जास्त आसक्ती होती.



हे सारे दोष असले तरी तुम्ही सिस्टीन चॅपेलमध्ये 'लास्ट जजमेन्ट' पाहून या थोर कलाकारासमोर विनम्र होता— एक अद्भुत, असामान्य आणि अलौकिक पाहिल्याचे समाधान मिळवून.

. १७ .


# रोम ते नेपल्स

मायकेलँजेलोच्या शिल्पकलेने रोम शहराला भारून टाकले आहे यात काही शंकाच नाही. पण त्याच्यानतर रोमवर अधिपत्य गाजवले ते बर्नीनी (१५९८–१६९०) या थोर वास्तुशास्त्रज्ञाने. हा थोर कलाकार जणू रोमसाठीच जन्माला आला असावा एवढे थोर कार्य त्याने रोममध्ये केले आहे.

व्हॅटिकनच्या एकूण आठ पोपची कारकीर्द त्याने पाहिली. त्याच्या शैलीतील बारकावा हा विशेष महत्त्वाचा. स्वतःच्या कलेशी पूर्णतया प्रामाणिक असणारा हा कलाकार म्हणजे रोमचा मानदंड. त्याच्या कलेचा आविष्कार दिसतो तो सेंट पीटर्स चर्चसमोरील मोठ्या प्रचंड चौकात. याला पिआझा म्हणतात. युरोपात जवळ जवळ प्रत्येक महत्त्वाच्या शहरात असे प्रचंड चौक आहेत. असे पिआझा खुद्द रोममध्ये तीन-चार तरी आहेत; पण सेंट पीटर्ससमोरील हा चौक म्हणजे बर्नीनीचा एकूण पर्स्पेक्टिव्ह आणि साधेपणा याचा सुरेख आविष्कार. या चौकात तुम्ही जर का राहिलात तर त्या चौकाचे साधेपण तुमच्या डोळ्यांत भरतेच पण त्याबरोबर सेंट पीटर्सचा भव्यपणा तुमच्या डोळ्यात चटकन भरतो.

व्हॅटिकनमधील स्कॅला रेगिआचे त्याने साकारलेले प्रवेशद्वार असेच काहीसे आगळे आहे. त्यामुळे रोममध्ये तुम्ही कोठेही जा तिथे तुम्हाला जागजागी बर्नीनीची आठवण येईल. नार्वेनीनीचा राजवाडा पाहिल्यावर वास्तुकलेतील भव्योदात्त असा आविष्कार बर्नीनीच करू जाणे असे तुम्ही म्हणाल. नाव्होनाच्या पिआझामध्ये त्याने एक कारंजे उभे केले आहे. युरोपात अशी कारंजाची लयलूट आहे. या कारंजाच्या भोवती त्याने साकार केलेल्या देवदूताच्या प्रतिकृती इतक्या मुलायम आणि सहजसुंदर आहेत की त्या अनेक भावी शिल्पकाराच्या अभ्यासाचा विषय झाल्या.

रोममधील आमच्या तीन दिवसाच्या भ्रमतीत आम्ही पुष्कळ भटकलो. जुन्या रोमन साम्राज्याचे अवशेष अजून रोममध्ये भग्नावस्थेत उभे आहेत. यातील सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे 'कलोसिअम'. हे एक अतिप्रचंड ओपन एअर थिएटर. गोलाकृती रोमन वास्तुकलेचा हा एक आगळा दिमाख.



कलोसिअम हे निम्म पडक्या अवस्थेत आहे. पण जे आहे त्यावरून त्याच्या अवाढव्यपणाची कल्पना येते. एका वेळी पन्नास हजाराहून अधिक रोमन प्रेक्षकासमोर रोमन सम्राट इथे सूडाचे भीषण नाट्य पाहात असत. सिंहाच्या आणि वाघाच्या तोंडी भक्ष्य म्हणून जाणारे ग्लॅडिएटर्स याच थिएटरमध्ये लाखो प्रेक्षकाच्या समोर अत्यंत क्रूरपणे यमसदनी जात. हजारो लोकाचे चीत्कार, हास्य, त्याचे आक्रंदन—त्याचे सारे भाव मुक्तपणे या वास्तूत एके काळी प्रकट होत होते. मध्ययुगीन क्रौर्याचा आणि जुल्मी राजसत्तेच्या रक्तपिपासू क्रीडेचा आविष्कार याच कलोसिअममध्ये घडत होता. याच ठिकाणी सारे रोम जळत असता फिडल वाजवण्यात गर्क असलेला रोमन सम्राट नीरो अनेक वेळा उपस्थित असणार. त्याच्यासमोर एखाद्या बंडखोराचे शरीर भुकेल्या सिंहाने हजारो प्रेक्षकासमोर फाडून खाल्ले असणार.

रोममध्ये अशी अनेक रंगमंदिरे होती. त्यांतील काही थोड्याचेच

भग्नावशेष आता शिल्लक राहिले आहेत. मार्सेलसचे रंगमंदिर कलोसिअम-सारखेच भव्य. चौदाव्या शतकात त्याचे वसतिस्थानात रूपांतर झाले. रोममधील जुनी स्नानगृहे भग्नावस्थेत जागोजाग उभी आहेत. रोमन लोकांची स्नानगृहे हाही अनेक वास्तुशास्त्रज्ञांच्या अभ्यासाचा विषय झालेला आहे.

रोम हे रात्री पाहण्यात मोठी मौज आहे. रात्री या सर्व ऐतिहासिक वास्तूवर प्रकाशझोत टाकलेले असतात आणि शेकडो पर्यटक ठिकठिकाणी जमावाने तिथे गर्दी करतात. पण कलोसिअम रात्री पाहण्यात खरी गमत आहे. क्षणभर वाटते, इथे हजारो रोमन नागरिक जमले आहेत. त्यांचा कलकलाट, आरडाओरडा सुरू आहे आणि तो मानवी क्रौर्याचा खेळ आता लवकरच सुरू होणार आहे. रात्री काही कारंजी पाहिली. रोममध्ये परत यायचे असेल तर एका कारंज्यात नाणे टाकले की तुमची इच्छा पूर्ण होते. आम्हीही पाच-पाच लीरा टाकल्या, परत रोममध्ये यायला मिळावे म्हणून.

रोममध्ये व्हॅटिकन चर्च आणि त्याचे म्यूझियम हे प्रत्येक कलासक्त रसिकाने पाहिलेच पाहिजे. जगातील श्रेष्ठ कलाकारांच्या कलाकृती आणि शिल्पाकृती इथे आहेत.एकूण १४४० दालने या चित्रशाळेत आहेत.या धर्मचित्रांना पाहून आणि चक्क चित्र पाहण्यातच तीन तास पायपीट करून सौभाग्यवती कटाळली. खरे म्हणजे हा कलेचा खजिना पाहण्यासाठी आठवडा पण पुरायचा नाही. पण सगळीकडे ख्रिस्त ख्रिस्त पाहून बायको म्हणाली, 'आता पुरे! कुठे तरी खाऊ या. भूक लागलीय.' म्हणून आम्ही थोडी पायपीट करून एका फ्लोरा फाऊंटनसारख्या चौकात आलो. मोठ्या हॉटेलात जायची सोय नव्हतीच. कारण किमान शंभर रुपये पडले असते. म्हणून रस्त्यावरच एका स्टॉलवर कॉफी आणि सँडविचेस घ्यायचे ठरवले. दोन कॉफी आणि सँडविच मिळून बारा रुपये खर्च केले म्हणजे अगदी मुंबईच्या गेलॉर्ड–इतका दर. म्हणजे स्वस्तच. वाटेत दुकानात वस्तूंची चौकशी केली. स्कॉच व्हिस्की पचेचाळीस रुपयाला, इटालियन वाइन पाच रुपयापासून पचवीस रुपयापर्यंत. वाटेत एक फेरीवाला भेटला. त्याच्याकडे दोन किलो पिच पाच रुपये किलो या भावाने विकत घेतली. म्हटले, हॉटेलात खायला बरे!

रोमच्या भ्रमतीत काही गमतीदार गोष्टी आढळल्या. इथल्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये तांदुळाचे पोहे आणि रवा दिसला. दुकानात अंड्याची टंचाई दिसली. रोममध्ये इंग्रजी बोलणाऱ्या लोकांची फार वाण आहे. त्यामुळे

वाटेत कुणाला काही विचारले तर 'नो इंग्लिस' असे सांगून तुमची बोळवण करतात. आम्ही सध्याकाळी इटालियन पिझ्झा खाण्यासाठी एका हॉटेलमध्ये गेलो. पिझ्झाचा आकार आपल्या ताटाएवढा. पिझ्झा म्हणजे चवदार भाकरी. त्यावर चीज, सॉस, भाजी, नाना प्रकार असतात. म्हणजे बरोबर भाजीची किंवा आमटीची आवश्यकता नाही. आम्ही एक पिझ्झा दोघांत मागवला. त्याला साठ रुपये पडले. पण पोट असे काही जाम भरले की विचारू नका.


पिझ्झा विकणारी छोटी छोटी दुकान इटलीत जागोजाग आहेत. पण तुम्हाला सगळ्या पिझ्झा घ्यायला नको. अर्धा, पाव, असा पिझ्झा लागलीच तव्यावरून गरमागरम करून देतात. आम्ही मुक्कामाच्या शेवटच्या दिवशी अर्धा पिझ्झा खरेदी केला आणि हॉटेलात खोलीत बसून खाल्ला. कारण हॉटेल मिडास पॅलेसमध्ये किमान साध्या जेवणाचे बिल होते माणशी दोनशे रुपये. म्हणजे पॅरिसपेक्षा स्वस्त. पॅरिसला स्वस्तात स्वस्त जेवणाला पाचशे रुपये पडतात. त्यामुळे रोममधील जेवण हे स्वस्तच. पण दोनशे रुपये खर्च न करता आम्ही तीस-चाळीस रुपयात आमची भूक भागवली. जेवल्यानतर टी. व्ही. वर एक इटालियन फिल्म समजून घेण्याचा प्रयत्न केला. पण सभाषण कळेना म्हणून कंटाळून टी. व्ही. बंद करून झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी म्हणजे २२ जुलैला रोमचा सकाळी निरोप घेतला. अर्थात नेहमीचा चहा-पाव आणि ब्रेडचा ब्रेकफास्ट. वाटेत कुठे तरी रस्त्यावरच लंच घ्यायचाय. त्यामुळे आमच्याबरोबरच्या अमेरिकन महिलानी आपल्या पर्समध्ये दोन दोन पाव आणि जामची पाकिटे बिनधास्त टाकली. ते पाहून आमच्या सौभाग्यवतीने निःशकपणे तो मार्ग अनुसरला.

रोमहून नापोली. नापोली म्हणजे नेपल्स. नेपल्सजवळ माउट व्हेसुव्ही-यस हा ज्वालामुखी पर्वत आहे. १८४२ साली त्याचा उद्रेक झाला.-त्यानंतर १९४४ साली. नापोली हे एक रमणीय शहर आहे. नापोली हे इटलीतील मोठे बंदर. वस्ती दहा लाख. आम्ही सकाळी तिथे पोचलो तेव्हा सफाई कामगाराचा सप चालू होता. गाव मुंबईसारखे. पण समुद्राला लगटून. कडक ऊन असल्यामुळे वाळूत सूर्यस्नान करणाऱ्या युवक-युवतींची गर्दी. बदरावर शेकडो छोट्या रंगीबेरंगी लॉचेस. अनेक परकी प्रवासी बदरावर जमा झाले होते.

आमची काप्रीला जाणारी बोट तासाभराने सुटणार होती, त्यामुळे

आम्ही बंदरावर फेरफटका मारायचे ठरवले. बंदरावर कोळी लोक मासे विकत होते. इथे प्रथमच नारळाची कवड विकायला ठेवलेली दिसली. याशिवाय पाव, कोकाकोला, सरबत, शिंपल्याच्या वस्तू याही विकायला ठेवल्या होत्या. रंग सोडल्यास इथले कोळी आणि आमचे खार-दांड्याचे कोळी यांच्या बोलण्या-चालण्यात आणि वागण्यात फारसा फरक दिसला नाही. बंदराला लागूनच नेपल्सचे मासळी आणि भाजीपाल्याचे मोठे



मार्केट होते. भाजीपाला म्हणजे बटाटे, कांदे, कोबी, फ्लॉवर, वांगी, फळांत संत्री, सफरचंदे, कलिंगडे, पीच— मला वाटते मुंबईच्या आमच्या दादरच्या मार्केटात जेवढी विपुल ताजी आणि विविध प्रकारची भाजी मिळते तशी भाजी जगात कुठेच पाहायला मिळत नाही.

आमच्याकडचे पालेभाज्यांचे प्रकार, वांग्याचे प्रकार, भेंडी, पडवळ, शिराळी वगैरे नानातऱ्हेच्या भाज्या युरोपियन लोकांना अज्ञातच आहेत. बाराव्या शतकापर्यंत ही मंडळी कच्चे मांस निखाऱ्यावर भाजून खात होती, आणि तेराव्या शतकापर्यंत यांना सुती कापड ही चीज माहीत नव्हती. त्यामुळे इतर भौतिक सुधारणा कितीही झाल्या असल्या तरी

युरोपियन माणसाकडे भारतीयांची संस्कृती मुळीच नाही. कारण या सुधारलेल्या प्रगत देशात जेवणाचा उच्चांक म्हणजे बटाटे, उकडलेले मांस आणि ब्रेड. त्यामुळे नापोलीतील ती अस्सल युरोपियन मंडई पाहून मन नाराज झाले. त्यामानाने आमच्या मुंबईकर गृहिणी किती तरी सुखी !

भाज्यांचे दर अर्थातच २० ते ३० रुपये किलो असे होते. अडीच रुपयाला एक केळे, तर चार रुपयांना एक लिंबू, मक्याच्या एका कणसाचे सात रुपये, कलिंगड म्हणजे टरबूजाच्या आकाराचे तळहातावर घेता येईल असे पधरा रुपयाचे, असे भाव होते. स्वस्त म्हणजे बीफ, बटाटे आणि वाइन्स. मार्केट अर्थात स्वच्छ आणि गर्दीही कमी होती. शेवटी आम्ही परत बंदरावर आलो आणि रस्त्यावर दहा रुपये खर्च करून दोन कोका-कोलाचेही टिन घेतले आणि काप्रीला जाणाऱ्या विलासनौकेत चढलो.

. १८ .


# काप्री

बारा वाजता आमची विलासनौका काप्रीला जाण्यासाठी निघाली. युरोपातील या सागरी प्रवासी नौका म्हणजे तरती अलीशान उपाहारगृहे. जेवणाखाणाची उत्तम सोय. उत्तम बार. आमच्याबरोबर शेकडो इटालियन उतारू होते. इटालियन उतारू म्हणजे नवरा-बायको, दोन-चार मुले. बायको थोडी स्थूल, सुटलेली. नवऱ्याशी अखड बोलणारी. पोराचे लाड करणारी. आणि अखड खाणे.आमच्याकडील सिंधी मडळींसारखे. याशिवाय अमेरिकन, जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश उतारू होतेच. अमेरिकन मडळी कोका कोला पिण्यात गर्क, तर इटालियन वाइन पिण्यात खूष. जर्मन मडळी बीअर पीत होती. पण एकूण उतारूच्या मानाने पिणारे कमीच. युरोपात व्हिस्की पिण्याची लोकाना सवय नाही. आणि परवडत नाही. स्कॉच व्हिस्की हे जगात सर्वत्र महाग असे पेय. श्रीमंतानाच स्कॉच परवडते. त्यामुळे मजूर आणि मध्यमवर्गीय वाइन आणि बीअरवर भर देतात. इटलीत वाइन तर फार स्वस्त आणि चागली. वाइन तयार करणाऱ्या देशात युरोपात इटली आणि फ्रान्स याची अनेक वर्षांची परपरा आणि स्पर्धा. त्यामुळे जगातील अन्य देशात फ्रेंच आणि इटालियन वाइन्सना प्रचड मागणी आहे.

आमच्या शेजारी एक अमेरिकन कुटुब बसले होते. नवरा-बायको व मुलगी. त्यानी दोन कोक तिघासाठी घेतले. युरोप हे अमेरिकेच्या मानाने फारच श्रीमत आणि महागडे. त्यामुळे इथले खाद्यपदार्थांचे दर पाहून अमेरिकन लोक अचबा करतात. पण युरोपात एक फार चागली सोय आहे. कोणत्याही उपाहारगृहात प्रवेश करण्यापूर्वी काचेतून तुम्हाला मेन्यू कार्ड दिसेल अशा तऱ्हेने चिटकवलेले असते. त्यामुळे आत प्रवेश करण्यापूर्वी तुमच्या खिशाला परवडतय की नाही याचा अंदाज

घेता येतो.

आम्ही तासाभराचा प्रवास करून काप्रीला पोचलो. काप्री म्हणजे इटलीतील एक नंदनवन. एक छोटेसे टेकडीवर वसलेले बंदर.




युरोपातीलच काय, जगातील सारे प्रवासी येतात ते काप्रीला. काप्रीचे आकर्षण म्हणजे ब्ल्यू ग्रोटो. ब्ल्यू ग्रोटो ही समुद्रातील एक नैसर्गिक गुंहा. या गुहेत बोटीने जायचे. जेमतेम लहानशी होडी आत शिरेल एवढेच त्याचे प्रवेशद्वार. आणि आत गेल्यावर सूर्यप्रकाश परावर्तित होऊन गुहेतील पाण्यावर एक आगळा रंग चमचमू लागतो. नीलमण्याशी स्पर्धा करील असा. पण ब्ल्यू ग्रोटोला जाणे नेहमीच शक्य होते असे नाही. कारण हवा चागली नसेल तर तुमचे होडके त्या खवळलेल्या समुद्रातून ब्ल्यू ग्रोटोपर्यंत पोचणे फार अवघड असते. आम्ही काप्रीला पोचलो तेव्हा आम्हाला सागण्यात आले की, दुपारपर्यंत हवा अनुकूल असली तर तुम्हाला ब्ल्यू ग्रोटोचे दर्शन घेता येईल. तोपर्यंत टेकडीवर तुम्ही फ्युनी क्युलर बसने वर जाऊ शकता.

ही बस म्हणजे एका दोराला लटकणारी छोटीशी आगगाडी. ती पंधरा

मिनिटातच वर जाते आम्ही काप्रीला पोचलो तेव्हा दुपारचा दीड वाजला होते. आमच्याबरोबरचे सहप्रवासी पोटोबाची सोय करण्यासाठी इकडे तिकडे भटकू लागले. आमच्या माउंट मेरीच्या जत्रेत जशी गर्दी असते तशी काप्रीला गर्दी. त्यात छोटी छोटी उपाहारगृहे. तसेच मोठ्या उपाहारगृहांनी बाहेरही तंबू टाकून जेवणासाठी टेबले मांडलेली. आम्ही मनाशी विचार केला, टेकडीवर जाऊन सृष्टिसौंदर्य आणि इतर गोष्टी पाहण्यापेक्षा पोटापाण्याची व्यवस्था पाहावी.

त्याप्रमाणे एका बऱ्यापैकी हॉटेलासमोर भव्य तंबूत खुर्च्या मांडल्या होत्या त्यावर स्थानापन्न झालो. वेटरने आमच्यासमोर मेन्यू कार्ड ठेवले. इटालियन स्पगेटी पचाहत्तर रुपये, कोका कोला तीस रुपये,– डोळे पांढरे होणे म्हणजे काय ते समजले. काप्रीला फक्त पन्नास रुपये खर्च करायचे असे आम्ही ठरवूनच टाकले होते. त्यामुळे आम्ही त्या हॉटेलातून माघार घेतली.

युरोपात आमच्याइतकेच काटकसरीने राहणारे आणि वागणारे म्हणजे अमेरिकन लोक. त्यातला एक अमेरिकन आम्हाला भेटला. त्याने पोस्टाच्या जवळ एक छोटा पिझ्झ, फिश, बीअर, कोक अत्यंत स्वस्ताईच्या दरात मिळते अशी अमोल माहिती पुरवली. त्या माहितीनुसार आम्ही आमचा मोर्चा पोस्टा-शेजारील उपाहारगृहाकडे वळवला. दहा बाय बाराच्या खोलीत आमच्या-सारखे तीस पस्तीस लोक गर्दी करून होते. दोन कोक, एक पिझ्झ आणि पोटॅटो चिप्स– एकूण चाळीस रुपयात आमचं पोट भरेल एवढं जेवण मिळाल. म्हणजे दहा रुपये वाचले. ते आइस्क्रीमसाठी खर्च करण्यासाठी ठेवून आम्ही त्या फ्युनिक्युलर मोटरीतून वर काप्रीच्या टेकडीवर गेलो.

वर तर खालच्यापेक्षा जास्त गर्दी. अगदी जत्राच. काप्रीला उन्हाळा मुंबईच्या तोंडात मारील असा. त्यामुळे गुबगुबीत आणि लालबुंद युरो-पियन जोडपी पोशाखात जास्तीत जास्त काटकसर करून तेथे जमा झाली होती. काप्री हे एक निसर्गरमणीय ठिकाण आहे यात शंकाच नाही. दोन हजार फुटावरून खाली पाहिल तर समुद्राच्या निळ्या पाण्यात शेकडो बोटी खेळातल्या बोटीसारख्या दिसत होत्या. लांब दूरवर ब्ल्यू ग्रोटोकडे जाणारे काही साहसी प्रवासी लाटाच्या तांडवाची पर्वा न करता होड्या वल्हवत जाताना दिसले. नाणे टाकून दुर्बिणीतून आसमंतचा देखावा पाहा-ण्याची सोय होती.

वर टेकडीवर छोटीशी वसाहत, अत्यंत निमुळत्या गल्ल्या. पण सारं कसं स्वच्छ आणि निर्मळ. दोन्ही बाजूंनी वेगवेगळ्या वस्तूंची दुकाने, उपाहारगृहे, बार. एखाद्या चित्रात काढतात तशी चित्रविचित्र. आमच्या खिशात द्रव्याची टचाई होती. पण दुकान हिंडून निदान डोळ्याचं पारण फेडावं म्हणून सगळी दुकाने पालथी घातली.

काप्रीचे ते नयनमनोहर दृश्य! सौ.ची रेशमी साडी हा मोठा कौतुकाचा आणि औत्सुक्याचा विषय! लेवाय किंवा रँग्लर जीन परिधान केलेल्या तरण्या लालचुटुक पोरी-- निदान त्या निमित्ताने आमच्याजवळ येत होत्या आणि 'ब्यूटिफुल' म्हणून जात होत्या. इटालियन आणि जर्मन भाषेत त्याचा हा कौतुकाचा उद्‌गार येत होता. त्यामुळे तो 'हाऊ ब्यूटिफुल' याच अर्थाचा असावा असा माझा तर्क.


काप्रीचे ते नयनमनोहर दृश्य! तो गर्द निळा समुद्र-- सारे काही डोळ्यात साठवून आम्ही परत त्या आमच्या फ्युनिक्युलर मोटरीत बसलो आणि घसरगुंडीप्रमाणे दहा मिनिटात खाली आलो. तोपर्यंत तीन वाजून गेले होते. ऊन भयंकर कडक होते. नागपूरची आठवण येईल असे. त्यामुळे उरलेले हजार लीरा म्हणजे दहा रुपये खर्च करून आम्ही रस्त्यावरच आइस्क्रीम घेतले आणि ब्ल्यू ग्रोटोची वाट पाहात थांबलो. थोड्या वेळाने आमचा वाटाड्या जॉन आला आणि त्याने मोठ्या खेदपूर्वक आम्हाला सांगितले की, ब्ल्यू ग्रोटोला जाणे आता अशक्य आहे. समुद्र खवळला आहे आणि जीव धोक्यात घालून नावाडी त्या गुहेपर्यंत जायला तयार नाहीत आणि जे तयार आहेत त्यांचे म्हणणे असे की, आम्ही यायचे तर आमच्या जबाबदारीवर. शिवाय इथून सोरेंटोला जाणारी बोट सहाला सुटणार; तर त्याच्या आत आम्ही परतू याची शाश्वती नाही..

याचा अर्थ ब्ल्यू ग्रोटो आमच्या नशिबात नव्हता. तेव्हा आमच्या दैवाला दोष देत किंवा बोल लावीत आम्ही सोरेंटोला जाणाऱ्या नौकेत बसलो. सोरेंटोला रात्री मुक्काम आणि तेथून दुसऱ्या दिवशी पिझा येथे मुक्काम. हे दोन मुक्काम संपले की आम्ही इटली सोडून फ्रान्सच्या वाटेला लागणार.

सोरेंटोला आम्ही संध्याकाळी सहा वाजता आलो. हे इटलीतील फार नयनमनोहर ठिकाण. युरोपातील अनेक गुलहौशी मंडळी सोरेंटोला येतात. या ठिकाणी गर्द झाडी. त्यामुळे तुमचे 'कारव्हान' घेऊन मुक्काम करायला

कॅंपिंग स्पॉटस सर्वत्र. युरोपात अनेक श्रीमंत लोक आपल्या गाडीला जोडून एक प्रशस्त चार चाकी घरच आपल्या गाडीला जोडतात. या घरात बेडरूम, किचन, हॉल अशी सोय असते. शिवाय पोर्टेबल टी. व्ही., रेडिओ यांचीही व्यवस्था. समुद्रकाठावर असे श्रीमंत लोक आपल्या कुटुंबियांसह या फिरत्या घरासह मुक्कामाला राहतात. काही लोक दोन दिवस म्हणजे वीकएंड घालवतात तर काही गुलहौशी आठवडा आठवडा तिथं मुक्काम करतात.

सोरेंटो हे या संदर्भात फारच नयनमनोहर निसर्गसंपत्तीने समृद्ध असे छोटे गाव. या गावात आम्ही हॉटेल मायकेलँजेलोमध्ये उतरलो. हॉटेल



छोटेसे पण टिपिकल इटालियन. आपल्याकडे सांगली, इचलकरंजी गावांना झाडून पुसून स्वच्छ केली, पेठापेठांत अलीशान दुकाने मांडली आणि उत्साही गौरवर्णीय, शिस्तबद्ध आनंदी युरोपियन प्रवाश्यांना आणि रहिवाश्यांना फेरफटका मारायला लावला तर तुम्हाला सोरेंटोची कल्पना येईल. आम्ही हॉटेलात जाऊन चहा घेतला, वॉश घेतला आणि गावात हिंडायला गेलो. दुकाने छोटीच पण टक लावून पाहावी अशी. आम्ही एका वाइन शॉपमध्ये शिरलो. तिथे वाइनच्या चित्रविचित्र, नाना आकाराच्या रंगीबेरंगी बाटल्या पाहून वाइनसाठी नाही तरी बाटलीसाठी तरी वाइन विकत घ्यावी असा मोह झाला. सहा डॉलरला अशी वाइनची बाटली की ती रिकामी बाटली इथे दोनशे रुपयांना कुणीही आनंदाने घेईल! पैसे असूनही काही

सामान घेण्याचा मोह टाळला आणि विंडो शॉपिंग करून आम्ही परत चालत हॉटेलवर परतलो.

सोरेंटो ही विश्रामनगरी. इथे चिंता—काळजी म्हणून कशाची करायची नाही. आम्ही एका प्रशस्त गल्लीत शिरलो. तिथे फुटपाथवर खुर्च्या-टेबले टाकून युरोपियन स्त्री-पुरुष मद्यपान करीत बसले होते. आमचा वाटाड्या जॉन म्हणाला, युरोप रात्री झोपत नाही. याची साक्ष आम्हाला सर्वत्र पटली. लोक अखंड खातपीत असतात. उद्याची काळजी नाही. सकष्टी नाही किंवा सिद्धिविनायकाला जायची गडबड नाही, किंवा आज मांझो शनिवार आहे हे पण नाही.

आम्ही तिथल्या एका नाइट क्लबमध्ये गेलो. तेथे आम्हाला उत्तम उंची इटालियन वाइन मिळाली. आमच्यासाठी खास नृत्याचे कार्यक्रम होते. अर्थात या लोकनृत्यात फारशी गमत नव्हती. पण वाइन, भात आणि करी यांची मौज उपभोगून आम्ही तो लोकनृत्याचा कार्यक्रम अर्ध्यावरच सोडला. कारण तिथे जमलेली इतर मडळी पहाटे चारला घरी परतण्याच्या बोलीने आलेली. पण आम्हाला तेवढी सवड नव्हती. उद्या जगप्रसिद्ध झुकता मनोरा असणारे गाव— पिझा— ज्याला मराठीत उगाचच आम्ही पिसा म्हणतो— त्या पिझाला जाण्यासाठी सातला जाणे भाग होते.

त्यामुळे त्या कलाकाराना अभिवादन करून आम्ही हॉटेल मायकेलँजेलोकडे परतलो.

. १९ .

# पिझा ते नीसा


सोरेंटोहून सकाळी पाव, अंडे, लोणी आणि दोन कप चहा असा कटाळवाणा पण अत्यावश्यक असा ब्रेक फास्ट पोटात ढकलून आम्ही पिझाच्या वाटेला लागलो. पिझा म्हणजे आपल्या तोंडी बसलेला पिसा. त्याचा इटलियन उच्चार पिझा. सोरेंटोपासून पिझा ६०० किलोमीटर अंतर. युरोपचे अलीशान रस्ते, पोटातील पाणी हलणार नाही अशा मस्त बसगाड्या. यामुळे हा प्रवास मुंबई ते पुणेपेक्षा जास्त सुखकारक. मुंबईहून नाशिकला जाताना खर्डीच्या पुढे वैराण प्रदेश लागतो. पुणे-नाशिक किंवा मिरज-विजापूर हे रस्ते म्हणजे भयानक. ना माणूस ना झाड. युरोपच्या कुशीतून प्रवास करताना मला माझी महाराष्ट्रातील भ्रमती आठवली. रस्त्यावर मैलाचे दगड नाहीत. गावांची नावे नाहीत. प्रवाश्याना बऱ्यापैकी चहा घेता येईल असे स्वच्छ, सुबक हॉटेल नाही. चांदा ते नागपूर या दीडशे मैलाच्या प्रवासात चहा मिळण्याचे एकच ठिकाण. युरोपच्या प्रवासात आमच्याकडची प्रवाश्याची ही दैना फार तीव्रतेने आठवली. आमचे मंत्री, पुढारी आणि कार्यकर्ते नुसती भाषणे करत असतात आणि सरकारी अधिकारी जनहिताचे काम नियमात कसे बसत नाही हे सांगतात. मग त्यांच्या विरुद्ध जाण्याची मुख्यमंत्र्याची पण ताकद नाही. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या चारशे मैलाच्या प्रवासातील युरोपच्या अंतरंगाचे दर्शन, त्याची उद्योगप्रियता, त्याचे वनप्रेम, निसर्गप्रेम, त्याची यांत्रिकी करामत— सारे काही अद्‌भुत आणि विश्वास बसणार नाही असं आगळं वाटलं. या चारशे मैलाच्या प्रवासात आमच्या ड्रायव्हरने एकदाही हॉर्न वाजविला नाही किंवा अन्य कोणत्याही मोटरीचा हॉर्न आमच्या कानी आला नाही. पुणे—मुंबईच्या प्रवासात ट्रकवाले निर्दयपणे गाड्या हाकतात, पाठीमागून येणाऱ्या वाहनाना रस्ता देत नाहीत आणि आमचे स्टेट ट्रॅफिकचे पोलिस

खुशाल झोपा काढीत असतात. रस्त्याची तर दैना विचारू नका. गुजरात, मध्यप्रदेश, म्हैसूर या राज्यातील रस्ते पाहता आमच्या महाराष्ट्रात रस्त्याची दैना तर विचारू नका. सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री करतात तरी काय असा जनतेला प्रश्न पडतो. युरोपच्या प्रवासात साक्षेपाने आढळलेली एक गोष्ट म्हणजे रस्त्यात कोठेही कसलेही वाहन उभे राहिलेले दिसले नाही. सुमारे दोन हजार मैलाच्या प्रवासात रस्त्यात मध्येच एकही व्यक्ती दिसली नाही. राजरस्त्यावर पादचाऱ्याना हिंडण्याची बंदी आहे. वाटेतले डोंगर, शेते, यांचा इंच न् इंच कसल्या न् कसल्या लागवडीने व्यापून टाकला होता. सोरेंटो ते पिझा या रस्त्यावर इटलीची ख्यातनाम विनयार्ड्स आहेत. उत्कृष्ट उंची वाइन बनवणे आणि ती साऱ्या जगाला विकणे हा इटलीचा पिढिजात व्यवसाय आहे. परकी चलन मिळविण्याचे त्याचे एक प्रमुख साधन आहे. इटालीचा या बाबतीतला पिढिजात प्रतिस्पर्धी म्हणजे फ्रान्स. फ्रेंच आणि इटालियन वाइन्सवर पुस्तके लिहिली गेली आहेत. युरोपच्या राजकारणात या मद्यानी फार मोठ्या उलाढाल्या केल्या होत्या. पण फ्रेंचानी द्राक्षापासून जी ब्रँडी बनवली तशी इटलीच्या बनवता आली नाही. फ्रेंच ब्रँडीच्या तोडीस तोड म्हणून ग्रीसने मेटाक्सा या नावाची एक ब्रँडी अनेक वर्षांपूर्वी बाजारात आणली. पण तिला आतरराष्ट्रीय मद्यपी लोकात फ्रेंच ब्रँडीची प्रतिष्ठा मिळाली नाही.

वाटेत एक सुरेख हॉटेल लागले. पाश्चात्य देशात सर्वत्र चाळीस चाळीस मैलावर उत्तम उपाहारगृहे आहेत. आमचे हे उपाहारगृह पाहून मनात आठवली ती आमची एस. टी. बसस्थानकावरील उपाहारगृहे. वाटले, गलिच्छ उपाहारगृहे चालू ठेवणाऱ्या एस. टी. च्या जनरल मॅनेजरला बडतर्फ करावे. पण त्याला अशी उपाहारगृहे असतील हे ठाऊकही नसावे. कारण तो कशाला जातो तिथे चहा प्यायला ? आम्ही या देखण्या, सुबक उपाहारगृहात गाजराची भाजी, पिझा आणि कोको कोला एवढ्या वस्तू साठ रुपयाला खरेदी केल्या. नंतर वाटेत चारच्या सुमारास एका उपाहार-गृहात दोन कप कॉफी घेतली. सहा रुपये म्हणजे फारच स्वस्त. आमच्या ओबेरॉयमध्ये दहा रुपये कॉफीला आणि पंधरा रुपये डोशाला द्यावे लागतात. त्यामानाने इटलीतील कॉफी फारच स्वस्त वाटली आणि चविष्टही वाटली.

पाचच्या सुमारास आम्ही पिझा येथे आलो. गाव लहानस. आमच्या

मिरज-कराडसारखं. पण अंतरंग खार, शिवाजी पार्कसारखं. मिरज-कराडची गलिच्छता नावाला पण नाही. पिझाचा तो प्रचंड झुकता मनोरा अगदी



जवळून पाहिला. चाळीस वर्षांपूर्वी भूगोलाच्या पुस्तकात एक जागतिक आश्चर्य म्हणून कौतुकाने पाहिलेला तो मनोरा प्रत्यक्ष पिझाला जाऊन पाहिला. मोठी गमत वाटली. त्या मनोऱ्याच्या पार्श्वभूमीवर सौभाग्यवतीचे छायाचित्र टिपले. मनोऱ्याच्या भोवती शेकडो दुकाने आहेत. त्यात शखाचे दिवे, पोवळ्याच्या माळा, चामड्याच्या वस्तू मुबलक होत्या. युरोपात अशी सॉवनीर म्हणजे 'भेट वस्तू' विकणारी दुकाने प्रत्येक शहरात आहेत आणि पर्यटक इथून त्या त्या गावच्या वस्तू आठवणीदाखल घेऊन जातात. पिझाला कण्हेरीची झाडे मुबलक दिसली. या भागात पोवळ्याचे वड फार पण पोवळी फार महाग. अंगठीसाठी पोवळ्याचा खडा पाहिजे तर २०० ते १००० रुपयापर्यंत किंमत.

पिझाला आम्ही हॉटेल कॅलिफोर्नियामध्ये उतरलो. आपल्याकडे जुहू हॉटेल किंवा गोव्याचा फोर्ट आग्वादसारखं, पण छोटं. या हॉटेलात

खोल्या लहान आणि प्रथमच इथं आम्हाला आमचे साहित्य-सहवास-मधील मित्र भेटले. ते म्हणजे मच्छर ! पिझाचे हे मच्छर वाद्ग्यासारखेच गानप्रिय आणि चावरे. त्यामुळे आमच्याबरोबरच्या अमेरिकन सहप्रवाश्याची फारच धावपळ झाली. प्रत्येक खोलीत फवारे मारण्याचा सपाटा सुरू झाला. शेवटी आमच्या एका कॅनेडियन मित्राने एक टूट काढला. आपण जेवणानंतर मद्यपान करीत बसू. पाश्चिमात्य देशात जेवणानंतर मद्यपान करण्याची प्रथा आहे. आमच्याकडे जेवणापूर्वी बराच वेळ 'हा प्रकार' चालतो आणि त्यात काहीजण जेवणाच्या पलिकडच्या अवस्थेला पोचलेले असतात. इथं असा मद्यपानाचा आक्रस्ताळी, अस्ताव्यस्त प्रकार नसतो. आमच्या गेरी या कॅनेडियन मित्राने मद्यपानाला बोलावले म्हणून मीही एक स्कॉच व्हिस्कीची बाटली घेऊन गेलो. रात्री दीडपर्यंत आम्ही नाना तऱ्हेच्या विषयावर गप्पा मारीत सौम्य मद्यपान केले आणि आपापल्या खोल्याकडे परतलो. रात्री जेवणात मासे, सूप, आइस्क्रीम होते.

सकाळी नेहमीचा कटाळवाणा नास्ता रिचवून आम्ही फ्रान्सच्या वाटेला लागलो. सकाळी दहाच्या सुमारास आम्ही जिनोआ या गावी आलो. जिनोआ हे गाव प्रख्यात आहे ते अमेरिकेचा शोध लावणाऱ्या ख्रिस्तोफर कोलंबसची जन्मभूमी म्हणून. गावात उतरून आम्ही त्याचे घर पाहायला गेलो. पण इटालियन गावकऱ्याना त्याचे सोयरसुतक नव्हते. त्याच्या घराजवळ जुने कपडे विकणारे विक्रेते दिसले. त्या जुन्या कपड्यात आम्हाला फारसा इटरेस्ट नव्हता. तिथून जवळच नगरपालिकेने कोलंबसचे एक साधेसे स्मारक केले आहे ते पाहिले. त्यानंतर गावातच एका छोट्या टुमदार उपाहारगृहात आपल्याकडे 'वायकीकी' प्रमाणे कॉफी आणि सॅडविच यावर दुपारचे जेवण भागविले. तरी वीस रुपये गेले. सौ. ने पर्समध्ये चॉकोलेट, बिस्किटे आणि सफरचंद ठेवली होती; त्यामुळे बसमध्ये तोंड चालवायला भरपूर मसाला होता. जिनोआहून आम्ही वाटेत साठ-सत्तर बोगदे पाहिले. बोगदे एवढे प्रचंड की चार चार मोटरी दोन्ही बाजूनी ये—जा करतील. त्यातले काही दोन-दोन मैल लांब. आत संपूर्ण गिलावा केलेला आणि उत्कृष्ट प्रकाशयोजना. इटालियन अभियांत्रिकी कलेची ही करामत पाहून मन थक्क होते. या रस्त्यावर केळीची झाडे दिसली. तसेच डाळिंबाची लागवड दिसली. साधारण दोन तासानी आम्ही फ्रान्सच्या सरहद्दीवर आलो. आमच्या मोटरीत इमिग्रेशनचा अधिकारी

आला आणि चार्लीस उतारूपैकी आमचेच पासपोर्ट घेऊन तो कचेरीत गेला. युरोपात इतर कोणत्याही सरहद्दीवर पासपोर्ट तपासणी झाली नाही. अमेरिकन टूरिस्ट म्हटल्यावर 'जा', असा इशारा बेल्जम, इटली, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया या राष्ट्रात मिळाला. जर्मनीत आपल्याला व्हिसा लागत नाही. तसेच कॅनडातही. इथ फ्रान्सच्या सरहद्दीवर आम्हा भारतीयामुळे आमच्या गाडीचा थोडा खोळंबा झाला.

फ्रान्सची हद्द लागताच थोडा वेगळा ट्रान्स्फर सीन. रस्ते स्वच्छ, गावे अधिक टुमदार, श्रीमंत आणि उपाहारगृहे भयानक महाग. युरोपात स्वित्झर्लंडप्रमाणे फ्रान्स हा फार महागडा देश. वाटेत मोनॅको स्टेट लागले. एक लहानसे संस्थान. या संस्थानचा आणि मोनॅको बिस्किटाचा काही संबंध आहे का अशी सौभाग्यवतीने चौकशी केली. कदाचित स्वस्त मिळाली तर अर्धा रत्तल घ्यायचा तिचा बेत असावा. मोनॅको स्टेटची राजधानी म्हणजे मॉन्टे कॉर्लो. ही एक काप्रीसारखी मोहनगरी आहे.




अर्थात काप्रीपेक्षा श्रीमंत आणि विलासी. हे छोटेसे बंदर असल्यामुळे नौकाविहारासाठी सज्ज अशा शेकडो रंगीबेरंगी बोटी किनाऱ्यावर होत्या. युरोपातील हौशी प्रवाश्याची 'या नवनवल नयनोत्सवा' पाहण्यासाठी

आला आणि चाळीस उतारूंपैकी आमचेच पासपोर्ट घेऊन तो कचेरीत गेला. युरोपात इतर कोणत्याही सरहद्दीवर पासपोर्ट तपासणी झाली नाही अमेरिकन टूरिस्ट म्हटल्यावर 'जा', असा इशारा बेल्जम, इटली, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया या राष्ट्रात मिळाला. जर्मनीत आपल्याला व्हिसा लागत नाही. तसेच कॅनडातही. इथे फ्रान्सच्या सरहद्दीवर आम्हा भारतीयामुळे आमच्या गाडीचा थोडा खोळंबा झाला.


फ्रान्सची हद्द लागताच थोडा वेगळा ट्रान्स्फर सीन. रस्ते स्वच्छ, गावे अधिक टुमदार, श्रीमंत आणि उपाहारगृहे भयानक महाग. युरोपात स्वित्झर्लंडप्रमाणे फ्रान्स हा फार महागडा देश. वाटेत मोनॅको स्टेट लागले. एक व्हानसे संस्थान. या संस्थानचा आणि मोनॅको बिस्किटाचा काही संबंध आहे का अशी सौभाग्यवतीने चौकशी केली. कदाचित स्वस्त मिळाली तर अर्धा रत्तल घ्यायचा तिचा बेत असावा. मोनॅको स्टेटची राजधानी म्हणजे मॉन्टे कॉर्लो. ही एक काप्रीसारखी मोहनगरी आहे.




अर्थात काप्रीपेक्षा श्रीमंत आणि विलासी. हे छोटेसे बंदर असल्यामुळे नौकाविहारासाठी सज्ज अशा शेकडो रंगीबेरंगी बोटी किनाऱ्यावर होत्या. युरोपातील हौशी प्रवाश्यांची 'या नवनवल नयनोत्सवा' पाहण्यासाठी

गर्दी झाली होती. त्यामुळे गावातला पाच मैलाचा राजरस्ता पार करायला आम्हाला एक तास लागला. इथं एक प्रख्यात कॅसीनो आहे. कॅसीनो म्हणजे द्यूतगृह. हे द्यूतगृह एखाद्या राजवाड्यासारखे होते. आत प्रवेश करायला पाच फ्रॅन्क. म्हणून आम्ही जुगार कसा खेळतात ते पाहण्याचा मोह टाळला. आमच्या बरोबरच्या अमेरिकन प्रवाश्याची आमच्यासारखीच निरिच्छ वृत्ती दिसली. आता आलोच आहोत तर थोडी चैन करावी म्हणून आम्ही आइस्क्रीम घेतले. चॉकोलेट आणि आइस्क्रीम खावं तर ते युरोपातच. त्याचे नाना प्रकार, नाना स्वाद. युरोपियन लोक अखंड यापैकी एक काही तरी खात असतात.

मॉन्टे कॉर्लोचे ते द्यूतगृह आत कसे रंगीढंगी असेल याची कल्पना मनात करीत आम्ही नीस या गावी आलो. नीस ही फ्रान्समधील एक स्वप्ननगरी. रात्री आम्ही गाव पाहायला म्हणून चालतच बाहेर पडलो. प्रशस्त रस्ते, प्रशस्त पादपथ. प्रत्येक उपाहारगृहासमोरच्या पादपथावर शेकडो स्त्री-पुरुष उत्तमोत्तम रंगीबेरंगी वाइन व पाहात राहाव असं फ्रेंच जेवण याचा समाचार घेत गर्क. इथली म्युनिसिपालिटी उदार असावी. कारण पादपथाचा हा असा उपयोग युरोपात प्रत्येक प्रमुख शहरी दिसला. युरोपियन माणूस रात्री जागतो. चक्क पहाटे चार वाजेपर्यंत. मग त्याची चैनीची रात्र सुरू होते. भविष्याची काळजी नाही. बँकेत पैसे साठवण्याची गरज नाही. गॅस, रॉकेल, अॅडमिशन, ट्रेनमध्ये जागा पकडणे, मुलीचे स्थळ, लॉटरीचे तिकीट, एस. टी.चे रिझर्व्हेशन, संकष्ट चतुर्थी— असल्या चिंता त्याच्यामागे नाहीत. त्यामुळे तो निश्चिंत मनमोकळे जीवन जगतो. आम्ही रात्री जेवण आटोपल्यावर गावात कुठे तरी कॉफी घ्यायला म्हणून बाहेर पडलो. बरोबर आमचे अमेरिकन आणि कॅनेडियन मित्र होते. शहरात आपल्याकडे प्रजासत्ताक दिनाला करतात तशी रोषणाई. 'तशी' म्हटल्याने त्याच्या रोषणाईबद्दल गैरसमज व्हावा. कारण रोषणाई कशी करावी हे त्याच्यापासून शिकावे. वाटेत एका चित्रपटगृहात जेम्स बॉण्डचे फ्रेंच भाषेतले चित्र लागले होते. सिनेमाचे तिकीट तीस रुपये असते. प्रत्येक दुकान हे निऑन साइन्समुळे झगमगत होते. आम्ही एका रस्त्यावरच्या उपाहारगृहात तासभर काढला. अर्धी बाटली बिअर. त्याला पधरा रुपये पडले. आमच्या आश्चर्यचकित मुद्रेकडे पाहून वेटरने 'नीस' हे पॅरिसपेक्षा फार स्वस्त आहे असे समजावून दिले.



सकाळी नास्ता करून आम्ही केन या गावी आलो. त्याचा उच्चार केन्स असाही करतात. हे एक फ्रान्सचे महत्त्वाचे बंदर. केन म्हणजे वेणुग्राम. इथे बाबूंची झाडे पुष्कळ आहेत. त्यामुळे त्याला हे नाव पडले असे आम्हाला एका जाणत्याने सांगितले. केनच्या सागरी तीरावरून जाताना चक्क मरीन लाइन्सची आठवण झाली. सानफ्रान्सिस्कोसारखी ही घरे. समुद्र किनाऱ्यावर इथला प्रचंड विमानतळ. शहर मोठे टापटिपीचे, श्रीमंत आणि ढंगदार. स्वतःचे आगळे व्यक्तिमत्त्व असणारे. केनला आम्ही बाजारात हिंडलो. इथल्या मासळी मार्केटात कोळंबी आणि गुजल्या पाहून सौभाग्यवतीला सिटीलाइटसमोरच्या मासळी मार्केटची आठवण झाली. काही ठिकाणी तर मोठमोठ्या काचेच्या टबात पोहणारी कोळंबी ठेवली होती. काय ग, ताजी आहेत का ? असं विचारायला नको आणि तिने वसदिशी अंगावर पण यायला नको. सर्वसाधारण भाजीचा भाव वीस रुपये किलो. फक्त पीच स्वस्त. म्हणजे सहा रुपये किलो. दुपारी आम्ही आमच्या अमेरिकन मित्राच्या नादाला लागून एका फ्रेंच उपाहारगृहात शिरलो. तिथ

सॅलड आणि बिअर. बरोबर तळलेल्या बटाट्याच्या काचऱ्या. सॅलड म्हणजे कच्चा कोबी, टोमॅटो आणि त्यात व्हिनीगर. या जेवणाला एकूण दोनशे रुपये पडले. शिवाय पोट भरलं नाही ते नाहीच. मेन्यू फ्रेंचमध्ये, वेटर्स फ्रेंच, त्यामुळे जेवण काय आहे ते कळायला मार्ग नव्हता. त्यामुळे सॅलड हा परिचयाचा शब्द दिसल्यावर तेवढं मागवलं. आमच्या अमेरिकन मित्रांनी तेच केलं.

रात्री हॉटेलात भात, बीफ, सूप आणि आइस्क्रीम हा बेत. सौ.ने विनोबाचे स्मरण करून बीफ बाजूला सारले.

सकाळी आम्ही नास्ता घेतला. फ्रान्समधील एक गमत म्हणजे त्याच्या लाबोडके ब्रेड. क्रिकेटच्या बॅटच्या लांबीचे आणि आकाराचे ब्रेडसुद्धा मिळतात. इथ अमेरिकन बायकानी आमच्या सौ.ला एक गमत समजावून दिली. एक सत्तर वर्षांची म्हातारी आणि वीस वर्षांचा तरुण एकत्र ब्रेक-फास्ट घेत होती. युरोपात अशी रंगेल म्हाताऱ्या बायकाच्या म्हातार-चाळ्याची दृश्ये दिसतात. अनेक बेकार तरुण या श्रीमत म्हाताऱ्या बायाना आपली संगत देतात. पण ही पोरे रात्री ती म्हातारी झोपली की बाहेर सटकतात. ही माहिती आम्हाला कॅनेडियन मैत्रिणीने पुरवली. हा म्हातारीचा श्रृगारविषय सर्वांना बसमध्ये बराच काळ पुरला. आता आम्ही निघालो तो ग्रेनोबलच्या वाटेने.

याच वाटेने सम्राट नेपोलियन एल्बा बेटातून परत फ्रान्समध्ये आला. आमचा गाईड नेपोलियन कसा आला आणि कोणत्या गावाने त्याचे कसे स्वागत केले हे सागत होता. आणि मला आठवल ते वि. ल. भावे याचे फार लहानपणी वाचलेले चक्रवर्ती नेपोलियन हे चरित्र.

. २० .

# पॅरिसच्या मार्गावर

ग्रेनोब्लहून सकाळी नास्ता करून बाहेर पडलो तो वाटेतला एक अत्तराचा कारखाना पाहायला. फ्रेंच अत्तरे विश्वविख्यात. त्याचा सुगंध, त्याच्या बाटल्यांचे चित्रविचित्र आकार, आणि त्याच्या किंमती नुसत्या पाहात बसाव्यात. या अत्तराच्या कारखान्यात वेगवेगळ्या फुलापासून सेंट्स कसे तयार करतात हे काळजीपूर्वक पाहिले. हा कारखाना सुवासाच्या घमघमाटाने भरून गेला होता. त्यामुळे नंतर एका खोलीत निरनिराळ्या सेंटसचे नमुने आम्ही आमच्या नाकाला लावू लागल्यानंतर आमच्या नाकी नऊ आले. कारण आम्हाला सगळ्या अत्तराचा सुगंध एकसारखा वाटू लागला. अर्थात विक्रेत्या बाया आम्हाला प्रत्येक सेंटमधील सूक्ष्म फरक समजावून देत होत्या. आमचे ज्ञान वाढविण्यासाठी हा त्यांचा प्रपंच नव्हता तर आम्ही काही बाटल्या खरेदी कराव्या म्हणून. पण आम्ही नाके मुरडून आमची नापसंती व्यक्त केली. आलोच आहोत तर काही तरी घ्या म्हणून सौ.च्या आग्रहास बळी पडून मी एक साबणाची वडी खरेदी केली.


दुपारचे जेवण वनभोजनाचे. त्यामुळे वाटेत ७०० लोकवस्तीच्या एका छोट्या खेड्यात आम्ही थांबलो खरेदी करायला. ऐतिहासिक चित्रपटात शोभेल असे ते गाव होते. चारी बाजूना खंदक, भोवती कोट, शिरायला अरुंद रस्ता आणि आत शिरताच दोन छोटी दुकानं. इतकी स्वच्छ, टापटिपीची आणि सर्व तऱ्हेच्या मालाने खच्चून भरलेली. आम्ही ब्रेड, पाव, चीज, बीअरच्या बाटल्या, सफरचंद आणि केक्स एवढ्या वस्तू साधारण पन्नास रुपये खर्च करून घेतल्या. या वस्तू एवढ्या स्वस्तात मिळतील याची कल्पना नव्हती. आमची खरेदी आटोपून नेपोलियन ज्या मार्गाने पॅरिसला गेला त्याच मार्गाने आम्ही पॅरिसला निघालो.

फ्रान्स हा युरोपातील एक रमणीय देश. या शब्दाचा आपण इतका वापर केलाय की, आमच वालावल, नेरूर, चिपळूण आणि गणपती-पुळेही आपण रमणीय म्हणतो. अर्थात कोकणातल्या रखरखत्या ओसाड प्रदेशाच्या तुलनेने या ठिकाणाना रमणीय म्हटलेच पाहिजे. पण फ्रान्सची रमणीयता लक्षात घेतली तर वालावल, गणपतीपुळे हे ओसाड प्रदेश मानावे लागतील. पाच कोटी २० लाख लोकसंख्या असणाऱ्या या छोट्या देशाची कीर्ती आणि इतिहास फारच महान आहे. फ्रान्सचा इतिहास तर अनेक अद्‌भुत प्रसगानी रोमाचकारी झालेला आहे. नेपोलियनसारखा सम्राट या भूमीत जन्मला तर युरोपातील राज्यक्राती प्रथम या देशाने घडवली. व्हिक्टर ह्यूगो, बाल्झाक, मोलियर, ड्यूमा, व्हॉल्तेर, रोमा रोला, झाला, सार्त्र, आद्रे जीद, कामू, कार्बूझीए, लुईपाश्चर ही नुसती नामावळी वाचली तरी मन थक्क होऊन जाते.

औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर असलेल्या या राष्ट्राच्या आर्थिक विकासाचा माथा आहे शेती. टॉमॅटो, कॉली फ्लॉवर, बीट, सफरचद, द्राक्षे याची विपुल निर्मिती करणारा देश म्हणून फ्रान्स युरोपात प्रख्यात आहे. डुकराची पैदास हा आणखी एक ग्रामोद्योग. फ्रान्समध्ये १ कोटी डुकरे आहेत. तर अन्य गाई—बैलाची सख्या दोन कोटी आहे. (या सदर्भात भारताची गुराची सख्या किती आहे हे सागावे म्हणून मजजवळ असलेले 'भारत— १९७७–७८' हे पुस्तक चाळले तर त्यात ही माहिती नाही. गेली पचवीस वर्षे हे पुस्तक भारत सरकार प्रकाशित करते. मजकूर तोच. पण दरवर्षी आकडे बदलतात. पण जिथे आकडेच नाहीत तिथे बदलण्याचा किंवा नवे घालण्याचा त्रास कोण घेतो?) फ्रान्सचा आणखी एक महत्त्वाचा उद्योग म्हणजे मत्स्योद्योग. तसेच मधाचे उत्पादन. फ्रान्समधील दहा हजार चौरस मैलाचे क्षेत्रफळ केवळ विन यार्डखाली आहे. आग्नेय फ्रान्समध्ये शांपेनला अनुकूल अशी द्राक्षे निपजतात. फ्रेंच शांपेनची ख्याती साऱ्या जगात आहे. (मुबईतील फाइव्ह स्टार हॉटेलात शापेनच्या बाटलीला चारशे रुपये पडतात.)

फ्रान्समधील ८० टक्के जमीन शेतीखाली आहे. खनिज सपत्तीतही फ्रान्स मागे नाही. बॉक्साइट, कोळसा आणि लोखड ही महत्त्वाची खनिजे. फ्रान्सला विजेची टंचाई नाही. ही वीज जलविद्युत प्रकल्पातून निर्माण होते. बॉक्साईट आणि युरेनियमच्या उत्पादनात फ्रान्स हा युरोपातील अग्र-

क्रमांकाचा देश. ब्रिटन व जर्मनीच्या खालोखाल फ्रान्स हा केमिकल इंडस्ट्रीत आघाडीवर आहे. शांपेन, ब्रँडी आणि वाइन; तसेच चीज, बिस्किटे



आणि मिठाई यांची निर्यात करणारा प्रमुख देश. इटली आणि जर्मनी-प्रमाणे फ्रान्स हा मोटर उत्पादनात आघाडीवर आहे. रेनॉल्ट ही फ्रेंच कार युरोपात लोकप्रिय आहे. केमिकल्स आणि फर्टिलायझर याच्या उत्पादनात जर्मनीनंतर फ्रान्सचा दुसरा क्रमांक लागतो.

फॅशन्सच्या बाबतीत फ्रान्सचा पहिला नंबर अजून कोणी हिरावून घेतलेला नाही. जगातील अनेक धनपती आणि त्यांच्या धनिणी पॅरिसमध्ये येऊन आपली नटण्यामुरडण्याची हौस भागवतात. अर्थात एका बऱ्यापैकी फ्रॉकला दहा ते पन्नास हजार रुपये पडतात. फ्रेंच शिफॉन, सॅटिन आणि वेल्वेट हे युरोपातील श्रीमंत स्त्रियांना परवडते. बोटी बांधणे आणि विमाननिर्मिती ही फ्रान्सच्या उद्योगशीलतेची आणखी एक निशाणी.

३२ टक्के फ्रेंच लोक कारखान्यात काम करतात तर १७ टक्के व्यापारात. ९५ टक्के लोक कॅथॉलिक पंथाचे. फ्रान्समधील रस्ते आणि वाहतूक केवळ उत्कृष्ट म्हणून चालणार नाही तर रेल्वेचा प्रवास अत्यंत सुखकारक, जलद आणि वक्तशीर. नॅशनल हायवे एक हजार मैलांचा आहे. इथली दुकाने सकाळी नऊ ते सातपर्यंत उघडी असतात. फ्रेंचांना सायकल ही फार

प्यारी आहे. युरोपात प्रत्येक रस्त्याच्या कडेला सायकल स्वारांसाठी आणखी एक छोटा रस्ता बांधलेला असतो. फ्रेंच लोक तसे खादाड नाहीत. त्यामानाने ब्रिटिश, जर्मन यांचा नास्ता जेवढा ठणठणीत तसा फ्रेंचांचा नास्ता अगदी नाजूक. इथं चहा-कॉफीचं वेड मुळीच नाही.

फ्रान्समध्ये कालव्यांचे जाळे आहे. त्यामुळे रस्त्यावरच्या वाहतुकीवर ताण कमी. फ्रान्सच्या कलाकौशल्याचे, राजकारणाचे, संस्कृतीचे केंद्र म्हणजे पॅरिस. युरोपातील एक ख्यातनाम शहर. जगात सगळ्या शिक्षिताच्या कानावरून गेलेले. पॅरिस म्हणजे गंमत, मौजमजा, स्वच्छंदपणा असा एक समज आहे. तो तितकासा खरा नाही. पॅरिस ही एक सुंदर नगरी आहे. अलीशान, पण सोज्ज्वळ—खानदानी. न्यूयॉर्कसारखी बकाल नाही. युरोपच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगाची ही नगरी साक्षीदार आहे. जुन्या—नव्याचा असा अपूर्व संगम असणारे नगर जगात अन्यत्र नाही. कोणत्याही नागरिकाला अभिमान, नव्हे आदरभाव, वाटावा असे. आणि हा अहंकार फ्रेंचांच्या रोमरोमात भरलाय. युरोपात स्पॅनिश स्त्रिया जशा देखण्या तसे फ्रेंच पुरुष देखणे. ऐन तारुण्यात व्हिक्टर ह्यूगो हा एखाद्या ग्रीक देवतेसारखा सुंदर दिसायचा म्हणे. फ्रेंच लोक तसे मनमोकळे नाहीत. ते अहंकारी, संकुचित राष्ट्राभिमानी आणि स्वभाषेवर नितान्त प्रेम करणारे. पॅरिसमध्ये इंग्रजी भाषा येणारे लोकही नो इंग्लिश म्हणून सांगतात. त्यांना अन्य भाषा शिकावी असे वाटत नाही आणि गरजही भासत नाही. फ्रेंच भाषाशुद्धीची चळवळ प्रमुख्याने फ्रेंच भाषेतील अन्य शब्द काढून टाकण्यासाठी आहे.

पण तुम्हाला खरा फ्रान्स, खरे फ्रेंच वातावरण आणि जेवण पाहायचं असेल तर पॅरिसच्या बाहेर गेलं पाहिजे. ग्रामीण फ्रान्स हा निसर्गसौंदर्याने ओतप्रोत नटलेला, मनमोकळा, आनंदी आणि गुल्जार आहे.

फ्रान्सचे अंतरंग आम्ही पाहिले ते फारच मनोवेधक होते. वाटेत दृष्ट काढावी अशी लहान लहान खेडी लागत. जणू काय भातुकलीच्या खेळात मांडावीत किंवा एखाद्या सिनेमाच्या सेटसाठी लावावीत अशी. काही खेड्यात कौलारू घरे पण दिसली. फ्रेंच लोकांना फुलांचे वेड आहे. अर्थात हे वेड सर्व युरोपियन लोकांना आहे. त्यामुळे वाटेत मोठमोठ्या फुलबागा दिसत होत्या.

आम्ही वाटेत एका आडवाटेला आमची बस थांबवली. युरोपात प्रवासात

सर्वत्र असे पिकनिक करणाऱ्या लोकांसाठी खास ' थाबे ' तयार केले आहेत. तेथे तुम्ही आरामात गाडी पार्क करून दुपारचे लंच घेऊ शकता. आम्ही बरोबरचे सामान घेऊन एका निवान्त ठिकाणी पथाऱ्या माडल्या. ब्रेड, चीज, बटर, सफरचंद, बीअर याचा समाचार घेण्यास प्रारंभ केला. अर्थात आपापसांत खाद्यवस्तूंची देवाणघेवाण झाली. खाणे झाल्यानंतर सर्वांनी कचरा आपापल्या पिशव्यांत भरला. त्यामुळे आम्हालाही ही शिस्त पाळावी लागली आणि तो बसमधील कचऱ्याच्या पेटीत टाकला. आणि वाटेत एका ठिकाणी कॉफी घेऊन संध्याकाळी आम्ही पॅरिसला पोचलो. युरोपमधील आमच्या प्रवासाचे हे अखेरचे ठिकाण !

• २१ •

# पॅरिसची नवलाई

१९६८ सालच्या नाताळात मी आठ दिवस पॅरिस येथे मुक्काम केला होता. लंडनला विमानात चढता चढता अचानक कवी वसंत बापट भेटले. पण पॅरिसच्या मुक्कामात परत त्यांची भेट झाली नाही. मी पॅरिसमध्ये आहे हे कळताच मला आवर्जून भेटले ते दिनकर साक्रीकर. त्यांच्या सहवासात एक संध्याकाळ फार चांगली गेली. त्यामुळे पॅरिसला दहा वर्षांनी जाताना मला दहा वर्षांपूर्वीच्या स्मृती जागृत झाल्या. त्या वेळी एअरपोर्ट टर्मिनल आणि माझं हॉटेल यांत दोन मैलांच अंतर असूनही अगदी मुंबईच्या टॅक्सी ड्रायव्हरप्रमाणे त्याने माझ्याकडून चक्क चाळीस फ्रँक्स म्हणजे ऐंशी रुपये वसूल केले होते. त्या वेळी रोममध्ये तर यापेक्षा वाईट अनुभव आला होता. त्यामुळे एक अनुभविक प्रवासी म्हणून मी पॅरिसमध्ये परत येत होतो. आम्ही संध्याकाळी सहा वाजता पॅरिसला आलो. सीन नदीच्या काठावर दुतर्फा वसलेले हे शहर सर्वार्थाने रमणीय आहे. युरोपात येणारे सगळे परदेशी प्रवासी दोन शहरे पाहावयास अनिवार उत्सुक असतात. ती दोन शहरे म्हणजे पॅरिस आणि रोम. रोमला जशी एक थोर प्राचीन परंपरा आहे तशी पॅरिसला पण आहे. पण रोमने ती परंपरा टिकवली नाही. आमच्याकडे दिल्लीसारखी रोमची अवस्था आहे. दिल्ली हे राजधानीचे शहर असेल पण ती देशाची सांस्कृतिक राजधानी नव्हे. चित्रपट, नाट्य, संगीत, नृत्य, चित्र आदी कलांचे माहेरघर असणारी शहरे म्हणजे मुंबई आणि कलकत्ता. येथे रोज काही तरी नवे घडत असते. पॅरिसची तशीच तऱ्हा. पॅरिस म्हणजे युरोपची सांस्कृतिक राजधानी. त्यामुळे पॅरिसला भेट देण्याची, ते शहर पाहण्याची साऱ्यांनाच अनिवार उत्सुकता असते. टॉम ॲपलटन या बोस्टनच्या विनोदी लेखकाने एकदा म्हटले होते ' गुड अमेरिकन्स व्हेन दे डाय गो टु

पॅरिस.' अमेरिकनच काय पण जगाच्या कानाकोपऱ्यातील पर्यटक १७ व्या शतकापासून पॅरिसकडे आकर्षिले जात आहेत. जीन आर्प सारखा शिल्पकार, पिकासो आणि जार्जेस ब्रॅक हे अफलातून चित्रकार, नग्न मानवी शरीरातील सौंदर्य टिपणारा हेन्री मॅतीस, मॉरिस उत्रीलोसारखे आगळ्या विश्वात रंगलेले चित्रकार, मादेलीन रेनॉद सारखी सतत वीस वर्षे फ्रेंच रंगभूमीवर चमकलेली अभिनेत्री, सार्त, कामू, आन्द्रे जीद, आंद्रे मॉर्लास्क, अशी एकाहून एक सरस अशा विश्वविख्यात लेखकाची नामावळी ही सारी पॅरिसभोवती गुफली गेली आहे.

१४ व्या लुईच्या जमान्यापासून पॅरिस शहराने आपली ही कीर्ती आजतागायत कायम राखली आहे. चौदावा लुई हा एक रसीला राजा होता. त्याची सौंदर्यदृष्टी अत्यत चोखदळ होती. तो कलाचा जाणकार आणि चाहता होता. त्याचे कपडे, वेषभूषा, त्याचे राजवाडे, त्याचे चित्रकार, त्याचे कवी, सगीतकार हे पाश्चिमात्य जगाला वाटणारी एक अपूर्वाई होती. राजा स्वतः काय किंवा त्याच्या राण्या अथवा रखेल्या काय, त्याची नवी वेशभूषा ही युरोपातील चर्चेचा विषय असे.

पॅरिसच्या या नवनवलाईच्या फॅशन्समधील पुढारीपणा हिसकावून घेण्याचे अनेक प्रयत्न झाले. १८ व्या शतकात लडन शहराने पुरुषाच्या वेशभूषेत आघाडी मारली. अजून या प्रातात लडन हे मागे पडलेले नाही. लडन, डब्लिन आणि न्यूयॉर्क येथील स्त्रियाचे कपडे शिवणाऱ्या फॅशन मेकर्सनी पॅरिसला या प्रातातून हुसकावून लावण्यासाठी जग जग पछाडले पण ते सारे फसले.

याचे कारण या धद्याची पॅरिसची परपरा फारच जुनी आहे. तसे म्हटले तर, युरोपातील इतर राष्ट्रात चागले शिंपी, सुतार, सोनार नाहीत असे नाही; पण त्याना कुणालाच पॅरिसमधल्या कलाकाराची सर नाही. कारण या कला त्यानी परंपरेने जोपासल्या आहेत. जपानमधील 'सिको' हे घड्याळ आज कितीही नावाजले जात असले तरी स्विस कारागिरीचे पार-परिक कसब त्याच्यापाशी नाही. त्यामुळे पाथेक फिलिप्ससारखे घड्याळ (किंमत ५ लाख रु. पर्यंत) ऑर्डर नोंदवल्यानतर त्याच्यासाठी एक वर्ष वाट पाहण्याची ब्रिटनच्या राणीची तयारी असते. त्यामुळे जगातील अत्यत धनाढ्य लोकानी पॅरिसमध्ये आपला पैसा नुसता उधळलाय. त्यात भारतीय संस्थानिक आघाडीवर होते. पण पॅरिसची फॅशन अमर्याद आहे.


कपडे, अत्तरे, फर्निचर, दागिने यामुळे केवळ श्रीमंताचाच नव्हे, जगातील थोर थोर कलाकारानाही पॅरिसचा मोह सुटला नाही. ख्यातनाम शिल्पकार ऑगस्त रोदीन याचा खाजगी सचिव म्हणून रेनर दिल्के हा प्रख्यात जर्मन कवी केवळ पॅरिसच्या मोहाने येथे राहिला. ह्याच पॅरिसमध्ये सिल्वीया बीच या अमेरिकन बाईने जेम्स जॉईसच्या मागे लागून त्याच्याकडून 'युलीसिस' ही कादंबरी लिहवून घेतली. याच जेम्स जॉईसचा सेक्रेटरी म्हणून १९३० मध्ये इथे सॅम्युएल बेकेट राहिला आणि यानेच काही वर्षांनी आपले ते नामवत 'वेटिंग फॉर गोदो' हे नाटक लिहिले.

पॅरिसची मोहिनी ही अशी आहे. फ्रन्कॉईस सॅगन नावाच्या १८ वर्षांच्या पोरीने एक छोटी कादबरी लिहून आठवड्याच्या आत लाखो रुपये आणि कीर्ती मिळवली ती याच पॅरिसमध्ये.त्यामुळे पॅरिस म्हणजे फॅशन आणि फॅशन म्हणजे पॅरिस, असा पॅरिसचा युरोपातील लौकिक. पण काल्ची फॅशन आज शिळी होते. या फॅशनच्या जगात कमालीची स्पर्धा आणि गुप्तता असते. आज पॅरिसमध्ये १० प्रमुख ड्रेसमेकर्स आहेत. चॅनेल आणि लानविन हे ड्रेसमेकर्स तर चाळीस वर्षांहून जुने. हा धदा अर्थात पुरुषाचा. तरुण पुरुषाचा. हे १० ड्रेसमेकर्स वर्षाला एकूण पन्नास कोटी रुपयाचा धदा करतात. या ड्रेस मेकर्समधील डिझायनर्स हे फ्रेंचच असतात असे नाही. बालेनसिआगा हा जगातील सर्वोत्कृष्ट ड्रेस डिझायनर. हा स्पॅनिश आहे. या दहा ड्रेस मेकर्सखेरीज पॅरिसमध्ये शेकडो छोटे छोटे शिंपी आहेत. फ्रेंच स्त्रिया या छोट्या शिंप्याकडून आपले कपडे शिवून घेतात. आता अमेरिकन लोकाप्रमाणे पॅरिसमध्येही रेडिमेड कपड्याची साथ आली आहे.

पण पॅरिसचे हे कलाप्रेम पॅरिसच्या वृत्तपत्रातही आढळते. आमच्याकडे वाङ्मयीन अथवा कलाजीवनातील घटनाकडे वृत्तपत्रे आणि त्यांचे उप-सपादक फार उपेक्षेने पाहतात. अशा घटनांना पहिल्या पृष्ठावर कधीच स्थान मिळत नाही. पण पॅरिसमधील 'ला मोंदे' सारखे दहा लाख खप असणारे वृत्तपत्र फ्रान्सच्या कलाजीवनातील घडामोडी अगत्याने पहिल्या पानावर 'कव्हर स्टोरी' म्हणून छापते.

अशा या पॅरिसला मी दहा वर्षांनी परत येत होतो. आमचे हॉटेल नोहोटेल पॅरिस हे एखाद्या राजवाड्यासारखे होते. प्रशस्त एअर कंडिशंड खोली, टी. व्ही., छोटा रेडियो, स्वतंत्र मॉर्निंग अलार्म, उंची कार्पेट, अत्याधुनिक स्नानगृह, सार कस चकचकीत. सध्याकाळी आम्ही हॉटेलात

जेवण घेतलं. फ्रेंच ओनियन सूप, सॅलेड आणि आइस्क्रीम हे स्वस्तातले स्वस्त जेवण म्हणजे माणशी शंभर रुपये. त्यातल्या फ्रेंच ओनियन सूपने



पोट भरले. सूपची किंमत ३० रुपये. अर्धं पातेलभर. ते कांदा, अंडे, चीज याचे मिक्श्चर असलेले ते सूप पिता पिता दमछाक झाली. जेवण घेऊन आम्ही दोघंजण जवळ असलेल्या ट्यूब स्टेशनकडे गेलो. पॅरिसची भूमिगत रेल्वे ही युरोपात सर्वांत सोयीची. पॅरिसमध्ये तीनशे रेल्वे स्टेशन्स आहेत. यावरून या रेल्वेच्या एकूण प्रचंड व्यापाची कल्पना यावी. पण तिकिट एक फ्रॅन्क; मग तुम्ही हवं तिथ जा. मी ऑपेरा स्टेशनची दोन तिकिटं

काढली. ऑपेरा म्हणजे आपल फ्लोरा फाउन्टनसारख मध्यवर्ती ठिकाण. या ठिकाणाहून लुव्हर, नोत्रदाम, वेगवेगळी थिएटर्स, शॉपिंग सेंटर्स फार जवळ आहेत. आम्ही ऑपेरा स्टेशनच्या बाहेर आलो तर पॅरिस नुसते दिव्यानी न्हाऊन निघाले होते. असा लखलखाट, किंबहुना याच्यापेक्षा जास्त, अमेरिकेत लासव्हेगास या गावातच आहे. पण पॅरिसची तुलना या सदर्भात टोकियोशी होईल. पॅरिसमधील रात्र हा एक गमतीचा विषय आहे. १९६८ साली मी पॅरिसच्या कानाकोपऱ्यात, गल्लीबोळात आठ दिवस भटकलोय. त्यामुळे ऑपेरा भागातील नामांकित छोटीमोठी उपाहारगृहे, थिएटर्स मला ठाऊक होती. आम्ही दोघानी एखादी फ्रेंच फिल्म पाहावयाचे ठरवले. तिकीट माणशी तीस रुपये. त्यातल्या त्यात सोवळा सिनेमा निवडला. पण तो भयानक होता. पात्राच्या अगावर कपडे नव्हते आणि बेडरूम्स सीन्सची ल्यलूट होती. पार्श्वभूमी होती जगलाची. त्यामुळे कपड्याची गरज नसावी. आमच्याकडे आउटडोअर शूटिंगला स्टुडियो सेटस लावायचा खर्च वाचतो तर इथ आउटडोअर शूटिंगला कपड्याचाही खर्च वाचतो ! या सिनेमाचे कथानक आणि त्याचे परीक्षण करणे म्हणजे स्वतःवर खटला ओढवून घेणे; म्हणून त्या फदात मी पडत नाही.

पॅरिस हे न्यूयॉर्कसारखे धोकादायक शहर नाही. न्यूयॉर्कमध्ये सहानंतर घरी परतलेच पाहिज. भर दिवसा लिफ्ट देण्याच्या निमित्ताने जनता पक्षात केन्द्रीय मन्त्रिपदावर असणाऱ्या पण त्या वेळी खासदार असणाऱ्या एका पुढाऱ्याला अमेरिकन तरुणानी लुबाडले होते. पॅरिस त्यामानाने सुरक्षित. त्यामुळे हॉटेलात आल्यावर टी. व्ही. लावला. टी. व्ही.वर एक अमेरिकन फिल्म फ्रेंच भाषेत दाखवली जात होती. थोडा वेळ टी. व्ही. पाहिला आणि झोपी गेलो

सकाळी ९ वाजता पॅरिस शहर पाहण्याची टूर होती. वाटेत पॅरिस-मधील पेडर रोडसारखा एक विभाग दिसला. दरमहा भाडे वीस हजार रुपये, तरी पण जागा मिळत नाही. पॅरिसमधील डिपार्टमेंटल स्टोअरर्स एखाद्या राजवाड्याच्या स्टाइलचे आहेत. त्यातील तळमजल्यावर महिलाचा विभाग होता. अत्तरे, मेअकपचे सामान. तिथे सुदर ललनाचे मधमाश्यासारखे थवे जमले होते. चॅनल फाइव्ह हे त्यामानाने सर्वात स्वस्त फ्रेंच सेंट. पण त्याची लहान बाटली दोनशे रुपयाना. साधारण दोनशे ते पाच हजार रुपयापर्यंत अत्तराच्या कुप्याची किंमत. त्यातल्या काही सेंटच्या

कुप्या या आतील अत्तरापेक्षा देखण्या होत्या. त्यानंतर आम्ही एफेल टॉवरजवळ आलो. आमच्याजवळ एक धंदेवाईक फोटोग्राफर आला. या लबाड लोकांनी गेल्या वेळेस मला एका फोटोपायी शंभर रुपयांचा फटका घातला होता. त्यामुळे या वेळी मी त्या फंदात पडलो नाही. एफेक टॉवर ही एक अद्‌भुत यांत्रिकी चमत्कार आहे. त्याच्यावर विजेच्या पाळण्याने जायचे आणि वरच्या रेस्टोरॉंमध्ये कॉफी घ्यायची. खिशात पैशाची चणचण असल्यामुळे एफेक टॉवरला दुरूनच आदराने नमस्कार केला.

त्यानंतर नोत्रदाम हे पॅरिसमधील ख्यातनाम चर्च. व्हिक्टर ह्यूगोची हंच बॅक ऑफ नोत्रदाम ही कादंबरी आणि त्यावरील चार्लस लाफ्टनचा सुरेख भूमिका असलेला चित्रपट डोळ्यासमोर उभा राहिला. हे गॉथिक रचनेचे चर्च मोठे वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचे वैशिष्ट्य हे की त्याने फ्रान्सच्या इति-हासातले सारे चढउतार पाहिले. अर्थात कलोनच्या कॅथीड्रलची भव्यता याला नाही. नोत्रदामहून पॅरिसला आम्ही एक चक्कर मारली. नेपोलिनचे स्मारक, पॅरिसमधील नाट्यगृहे, फ्रेंच अकादमीची इमारत आणि हे सर्व आटपून आम्ही मापेन ॲण्ड वेब या ख्यातनाम जवाहिऱ्याच्या दुकानात आलो. येथे घड्याळे, रत्ने आणि सेंटस याची लयलूट होती. ओमेगाचे घड्याळ किमान हजार रुपये, रत्नहार किंमत किमान लाख रुपये पाहून बरे वाटले. या दुकानात जगभरच्या श्रीमंताची ऑर्डर आगाऊ नोंदलेली असते. नुसता डोळ्यांना त्रास म्हणून आम्ही तिथून सटकलो.

तिथून ऑपिरा जवळ. तसेच लुव्हर ही ख्यातनाम आर्ट गॅलरी जवळ. पॅरिस ही चित्रकाराची पंढरी. तर लुव्हर ही चित्रशाळा म्हणजे अगदी चित्र रसिकाची काशी. इथं जगाच्या कानाकोपऱ्यातून रसिकांची दाटी झालेली सर्व जागतिक कीर्तीच्या थोर कलाकाराची ख्यातनाम चित्रे इथे आहेत. नेपोलिन आणि चौदावा लुई याच्या चित्रलालसेतून हा खजिना निर्माण झाला. ही चित्रशाळा संपूर्ण पाहावयाची म्हणजे पूर्ण चार मैल चालावे लागते. ही पदयात्रा मी आठ वर्षांपूर्वी अनेक वेळा केलीय. यातील शिल्प-कलेचा विभागही अत्यंत समृद्ध आहे. आमच्या सौ.चे या दालनातून त्या दालनात प्रवास करता करता पाय थकले. तिचं म्हणणं, इथं आताच सरकते ठेवावे. पण लुव्हर पाहणे हा एक अलौकिक अनुभव आहे यात शंकाच नाही. मी सौ.ला ' मोना लीसा ' हे चित्र दाखवले. लिओनार्दो द

व्हिन्सीचे हे गाजलेलं चित्र. अत्यंत साध्या फ्रेममध्ये. ते पाहायला चित्र-भाविकांची प्रचंड गर्दी. त्यामुळे हे चित्र नक्कीच श्रेष्ठ कलाकृती असणार याची सौ.ला खात्री पटली. त्यानंतर व्हीनस या सौंदर्यदेवतेचा पुतळा दाखवला. एका शेतकऱ्याला नांगरट करताना सापडलेला हा पुतळा. हस्तहीन पण खराखुरा कल्याकित. त्याचे सौंदर्य त्याच्या निरागसपणात आहे. व्हीनसनंतर आम्ही इजिप्शियन विभागात फेरफटका मारला. तिथे दमलेल्या आमच्या सौ.ने एका शिलाखंडावर बैठक मारली. चित्रे पाहायला एवढी रपेट करावी लागते हे तिला अगोदर ठाऊक असते तर तिने इथे यायचा बेत बदलला असता.

लुव्हरपासून आम्ही चालतच परत ऑपेरा भागाशी आलो. पॅरिसमध्ये कमालीची महागाई आहे. बऱ्यापैकी म्हणजे आमच्या गेलॉर्ड, खायबर यासारख्या उपाहारगृहात जेवायचं म्हणजे माणशी पाचशे रुपये हवेत. पॅरिसमधल्या तारे उपाहारगृहात जायचे तर शंभर रुपये हवेत. आणि मॉडर्न लंचहोममध्ये जायचे तर पन्नास रुपये हवेत. त्यामुळे आम्ही एअर इंडियाच्या कचेरीच्या शेजारी असलेल्या एका छोट्या पॅरिस टाईप लंच-होममध्ये जेवण घेतले. त्यानंतर पॅरिसमधील मोठमोठ्या दुकानांचे ' विंडो शॉपिंग ' केले. एका मद्यविक्रेत्याच्या दुकानात शिरलो आणि सव्वीस रुपयाला एक शँपेनची बाटली घेतली. पॅरिसमध्ये यायचे आणि शँपेन प्यायची नाही म्हणजे काय ? अर्थात ही शँपेन रात्री प्यायची असे ठरविले. वाटेत एका दुकानात ब्रेड, बटर, जॅम, काही फळे, कोकाकोला एवढे किरकोळ पदार्थ १०० रु. ला विकत घेतले आणि परत हॉटेलवर आलो. हॉटेलच्या लाउंजमध्ये थोडा वेळ भटकलो, एफेल टॉवरची एक प्रतिकृती घेतली आणि रूममध्ये जाऊन शँपेन थंड करण्यासाठी बर्फ मागवला. शँपेन ही एका बर्फाने भरलेल्या छोट्या बकेटमध्ये ठेवून थंड करायची आणि मगच प्यायची. पधरा मिनिटात हॉटेलचा वेटर बर्फ घेऊन आला. त्याचे बिल त्याने समोर ठेवले. अशोक हॉटेलमध्ये चार रुपयाला मिळणारा बर्फ इथे दहा रुपयांना मिळत असावा अशी माझी कल्पना. पण बिल होते. ५१ रुपयाचे. त्यावर चार रुपये टिप म्हणजे २६ रुपयाच्या शँपेनसाठी ५५ रु.चा बर्फ असा व्यवहार झाला. सौभाग्यवतीने मी बाहेरून विकत आणलेली कोकची बाटली फोडली आणि त्यात थोडा बर्फ टाकून थोडे पैसे वसूल केले. पाहा स्त्रियांचा हिशोबीपणा !

रात्री आमचे सर्व पर्यटकाचे निरोप भोजन होते. त्याला आणखी वीस डॉलर्स खर्च होता. आम्ही दुसऱ्या दिवशी रात्री मौलिन रुज या ख्यातनाम नाइट क्लबच्या कार्यक्रमासाठी ऐंशी डॉलर्स भरले असल्यामुळे हा निरोप भोजनाचा प्रसग टळला. तरी पण ड्रायव्हर आणि आमचा मार्गदर्शक याना टिप म्हणून तीस डॉलर्स द्यावे लागले.

रात्री फ्रेंच टी. व्ही. वरचे कार्यक्रम पाहिले. दुसऱ्या दिवशी नास्ता करून ट्यूब रेल्वेने परत ऑपेराला गेलो. फ्रेंच चित्रपट पाहण्याचे धैर्य नव्हते. कारण आम्ही पाहिलेला एक फुलीचा होता. पण इतर जवळ जवळ सगळे चित्रपट तीन तीन फुल्याचे होते. त्यामुळे पॅरिसमधील डिपार्टमेन्टल स्टोअर्स पाहण्यात आम्ही वेळ घालवला तसेच मोठमोठ्या उपाहारगृहातून बाहेर लावलेले पदार्थांचे दर पाहिले. आणि त्यामुळे अन्नावरची काही काळ वासना गेली म्हणा ना ! कारण एका हॉटेलात सपूर्ण लचचा दर होता साडेपाचशे रुपये. इतके असूनही आत गर्दी कमालीची होती. त्यामुळे एका छोट्या उपाहारगृहात जेवण घेतले. 'सूप' खेरीज बाकीचे पदार्थ काय आहेत हे कळावयास मार्ग नव्हता आणि त्या फ्रेंच वेटरला आम्हाला नक्की काय पदार्थ हवेत ते सागता येईना. शेवटी सॅलड, ऑमलेट, ब्रेड हे अनुमान धपक्याने मागवले. सॅलड म्हणजे कोबीचा पाला. किंमत वीस रुपये. कच्च्या भाजीपाल्याचा आहार हा प्रकृतीला हितकारक असतो हे सूत्र ध्यानी घेऊन आम्ही त्या पाल्यावर ताव मारला. ऑम्लेट आणि ब्रेड आणि लोणी याला एकूण सव्वाशे रुपये देऊन आम्ही ट्यूबने परत आलो.

रात्री 'मौलीन रुज' हा विश्वविख्यात नाइट क्लब पाहण्याचा कार्यक्रम १९६८ साली मी 'लिडो' हा नाइट क्लब पाहिला होता. पॅरिसमध्ये लिडो, मौलिन रूज आणि फॉलिस बर्जे असे तीन नाइट क्लब्स. आज या क्लबातील कार्यक्रम पाहण्याची माणशी फी चारशे रुपये. आम्ही रात्री ९ वाजता निघालो. आमच्याबरोबरीच्या पन्नास अमेरिकन पर्यटकापैकी पाचच लोक आमच्या या रगलेली रात्र पाहण्याच्या कार्यक्रमात सामील झाली. वाटेत एक छोटासा नाइट क्लब पाहिला. त्यात वेगवेगळ्या प्रकारची नृत्ये, कसरती, विदूषकाची कामे. त्यात एका नटाने एक सुरेख एकपात्री कार्यक्रम करून दाखवला. त्याने युरोपातील प्रत्येक राष्ट्रातील लोकगीताची झलक दाखवली. अर्थात हे एक सुरेख विडबन होते. त्यातल्या प्रत्येक विड-

बनाचे प्रेक्षकानी कौतुक केले. पण इटालियन आणि अमेरिकन गीताचे विडबन फारच सुरेख होते.



त्यानतर आम्ही अकराच्या सुमारास एका मौलीन रुजच्या आवारात शिरलो. आत पहिला कार्यक्रम चालू होता. त्यामुळे आम्हाला अर्धा तास बाहेर रागेत उभे राहावे लागले. 'मौलीन रुज'चे वातावरण लिडोसारखेच. साधारणपणे दोन हजार प्रेक्षक बसतील अशी व्यवस्था. आम्ही ज्या टेबला-जवळ बसलो होतो तेथे निम्मे पर्यटक जपानी होते. नाइट क्लब किंवा कॅबेरेसबधी तुमच्या मनात ज्या कल्पना असतात त्या नाहीशा होतात. त्याभानाने आपल्याकडचे कॅबेरे हे फार बीभत्स आणि घाणेरडे. त्यात कोणतीही कलात्मकता नाही. मौलीन रूजमध्ये एकाच वेळी स्टेजवर सुमारे १५० तरुणी येतात. टॉपलेस. पण त्याचे नृत्य पाहताना त्यात बीभत्सपणा आहे असे वाटले नाही. आकाशातून पऱ्या खाली उतराव्या अशा तऱ्हेने त्या अतराळातून खाली येत होत्या. त्याची वेशभूषा प्रत्येक नृत्यात बदलत होती. देशोदेशींची लोकनृत्ये— त्यातील इजिप्शियन आणि अरबी नृत्याचे कार्यक्रम— तर स्तिमित करणारे होते. या समूहात एक निग्रो गायिका होती. तिचा आवाज तर विलक्षण गोड आणि धारदार. तासभर

तिने सारे वातावरण धुद करून टाकले. मध्येच कसरतीचे कार्यक्रम झाले यात कसरतीची नृत्येही होती. हे सारे कार्यक्रम कोणत्याही सर्कशीपेक्षा चित्तथरारक आणि चित्तवेधक झाले. विशेषत: एक प्रौढ नर्तक आणि नर्तकी यानी अर्धा तास तर सारे प्रेक्षागृह नुसते गुंगवून टाकले. त्यानतर स्टेजवर शेवटी एक प्रचड चौकोनी काचेची वरणी. दहा बाय दहाच्या आकाराची. पाणी भरलेली. त्यात एका एका डॉल्फीनबरोबर एका नर्तकीने जे नृत्य केले ते लाजवाब होते.

हे कार्यक्रम चालू असता वाटेल तेवढी शँपेन प्यायला फुकट मिळत होती. पण अस असूनही प्रेक्षक सयमी, दाद देणारे आणि रसिक होते. हा धुद रगलेल्या रात्रीचा कार्यक्रम पहाटे तीनला सपला. एका स्वप्नदृश्यातून जागे झालो की काय असे सर्वांना वाटले. सारे काही अद्भुत— लोकविलक्षण. वर्षानुवर्षांची परपरा जागती ठेवणारे हे पॅरिसचे कलाकार— धन्य त्याची !

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही आठ वाजता पॅरिस सोडले. वाटेत उरलेली फ्रेंच नाणी एका कॉफीगृहात सपवली. कॅलेहून इग्लिश खाडी पार करून डोव्हरला जाणे, वाटेत कस्टम इमिग्रेशन— फक्त आम्ही इंडियन, आम्हाला युरोपात काय कुठेही तसे स्टेटस नाही, त्यामुळे जणू काय गुन्हेगार— त्यामुळे पासपोर्टची तपासणी. डोव्हरला तर इमिग्रेशनवर असणाऱ्या बाईने कारण नसताना वाटेल ते प्रश्न विचारले. मी तिला सागितले, बाई ग, तू फुकट राहा म्हणून सागितलेस तरी मला तुझ्या देशात राहायचं नाही. चार तारखेला मी जातोय अमेरिकेला. तू कसलीही चिंता करू नकोस. अर्थात हे तिने पासपोर्ट परत दिल्यानतरच मी तिला ऐकवले.

डोव्हर ते लडन दोन तासाचा प्रवास. तेथून गाडीने इप्समला सहाच्या सुमारास परतलो.

आमचा युरोपचा प्रवास सपला. एक वेगळ जग फार जवळून पाहण्याचा आनद मिळाला. तीन हजार मैलाचा प्रवास आम्ही मोटरने केला आणि अजब दुनिया पाहिली. ती माणस, त्याची शिस्त, त्याची स्वच्छता, त्याची उद्योगप्रियता, त्यांची श्रीमती, त्याची बेफिकिरी, त्याच खाण-पिण, नाचण, झोकून देण— सार काही वेगळ होत.

आठवल ते आमच दारिद्र्य. आमची अस्वच्छता, आमच्या मंत्र्याचे दौरे, घोषणा आणि आश्वासने !

अ. क्रमांक २३०३५ ८०५

. २२ .

# निरोप

लंडनला चार दिवस रेखा आणि सुरेशचा पाहुणचार घेतला आणि आम्ही वॉशिंग्टनमार्गे न्यूयॉर्कला गेलो.

न्यूयॉर्कच्या विमानतळावर आमचा मुलगा विजय हा आमच्या स्वागतासाठी आलाच होता.

न्यूयॉर्कला आठ दिवस राहून नंतर आम्ही मिआमी, ह्यूस्टन, लास, वेगास, लॉस एंजेलिस, शिकागो, डेट्राइट, वॉशिंग्टन, नायगारा, टोरॅन्टो, मॉन्ट्रिअल आणि अखेर शेवटी न्यूयॉर्क असा दौरा केला होता.

न्यूयॉर्कला चिरंजिवाच्या सहवासात चार दिवस राहून अखेर सप्टेंबर १९७८ ला आम्ही मुंबईस परतलो.

ह्या प्रवासवर्णनात अमेरिकेचे प्रवासवर्णन नाही. कारण मुळातच प्रवासवर्णन लिहू नये असे मला वाटत होते. पण माझी पत्नी सौ. कला हिचा हट्ट आणि नवशक्ती दैनिकाचे त्या वेळचे कर्तृत्ववान संपादक आणि माझे मित्र श्री. पु. रा. बेहरे यांचा आग्रह, यामुळे हे लिखाण झाले. हे प्रवासवर्णन नवशक्तीत प्रकाशित होत असता अनेक मित्रांनी आणि वाचकांनी त्याबद्दल अनुकूल प्रतिक्रिया व्यक्त केली.

माझे ज्येष्ठ मित्र श्री. ग. पा. परचुरे, आणि त्यांचे चिरंजीव आप्पा परचुरे यांच्यामुळे हे पुस्तक देखण्या स्वरूपात बाहेर पडत आहे. आमचे चित्रकार मित्र श्री. श्याम जोशी यांची सुरेख सजावट आणि सुलभ मुद्रणालयाचे संचालक आमचे देवकाका यामुळे हे सारे यथासांग पार पडले.

-o-